# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार १२ जून २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ १०







# महायुतीचे सरकार आणण्यात आमचा वाटा, पण आता पश्चाताप

## ■ महादेव जानकर बच्चू कडू यांच्या उपोषणस्थळी ■

**अमरावती /प्रतिनिधी :** महायुती सरकारला सत्तेची घमेंड आली आहे. कारण हे सरकार 'इव्हीएम' घोटाळा करून सत्तेत आलेले आहे. राज्यातील शेतकरी, वंचित, दलित, आदिवासी या घटकांकडे दुर्लक्ष करत आहे, पण आम्हाला शहीद व्हायला भाग पाडू नका, असा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर यांनी मोझरी येथे दिला.

माजी आमदार बच्चू कडूंच्या आंदोलनाला महादेव जानकर यांनी पाठिंबा दिला, त्यावेळी ते बोलत होते. गेल्या आठ जून पासून मोझरी येथे बच्चू कडू यांचे उपोषण सुरू



असून आज उपोषणाच्या चौथ्या दिवशी महादेव जानकर यांनी बच्चू कडू यांची उपोषणस्थळी भेट घेतली. यावेळी बोलताना महादेव जानकारांनी महायुतीवर जोरदार टीका केली. जानकर म्हणाले, महायुतीला सत्तेत आणण्यात आमचा मोठा वाटा आहे. पण याचा आता पश्चाताप होतोय, यासाठी मी शेतक-यांची माफी मागतो. महायुतीचे सरकार सत्तेत आल्यापासून शेतकरी, दलित, ओबीसी या समाजाकडे दुर्लक्ष करत आहे, समाजाचा निधी हा रस्त्यासाठी खर्च करत आहे. हे लबाड सरकार आहे. यांना सत्तेच्या बाहेर बसवले पाहिजे, असे आवाहन शेतक-यांना जानकर यांनी केले.सरकार जाती-जातीत आणि धर्मा-धर्मात भांडणे लावून शेतक-यांच्या(पान २ वर)

# शहरी नक्षलवादाच्या नावाखाली सरकारचा संघटना संपवायचा प्रयत्न-रविकांत तुपकर

**अमरावती /प्रतिनिधी :** माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफीसह संबंधित १७ मागण्यांसाठी मोझरी येथे सुरू केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला समर्थन देण्यासाठी उपोषणस्थळी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आज हजेरी लावली.

या सरकारला शहरी नक्षलवादाच्या नावाखाली सगळ्या संघटना संपवायच्या आहे. त्यामुळे शेतकरी संघटना टिकवून ठेवणे ही आपली सर्वांची मोठी जबाबदारी आहे, असे रविकांत तुपकर म्हणाले. बच्चू कडू यांच्या प्राणांतिक उपोषण आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. आज बुधवारी, ११ जून रोजी दुपारीक्रांतिकारी शेतकरी संघटनेचे



अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी आंदोलनाला भेट देउन आपला पाठिंबा दर्शवला. तसेच सरकारने घोषणा केल्याप्रमाणे कर्जमाफी केलीच पाहिजे, त्यासाठी बच्चू कडू यांच्या खांद्याला खांदा लावून आम्ही लढू, असे तुपकर म्हणाले. तुपकर म्हणाले, सरकारला शहरी नक्षलवादाच्या नावाखाली सगळ्या संघटना संपवायचा(पान २ वर)

# 26 तलाठ्यांचा काळा कारनामा; 35 कोटी हडपले

**जालना :** जालन्यातील अतिवृष्टी अनुदान घोटाळ्याचा अंतिम अहवाल चौकशी समितीने जिल्हाधिका-यांना सादर केला आहे. जिल्ह्यात ३४ कोटी ९७ लाख रु पयांच्या रकमेचा घोटाळा झाल्याचे चौकशी समितीच्या तपासात समोर आले आहे. समितीच्या तपासात २६ कर्मचारी दोषी आढळले असून अंबड तालुक्यातील १५ तर घनसावंगी तालुक्यातील ११ कर्मचा-यांचा यात समावेश आहे. दरम्यान, या ३४ कोटी ९७ लाख रु पयांपैकी आतापर्यंत एकूण ५ कोटी ७४ लाख रु पयांची वसुली झाली असल्याची माहिती जालन्याचे जिल्हाधिकारी (पान २ वर)

# 'अ, ब व क' वर्ग महानगरपालिकेंना राज्य सरकारकडून प्रभाग रचना करण्याचे आदेश

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या



हालचालींना वेग आला असून येत्या काही दिवसांमध्ये या निवडणुकींसाठी कार्यक्रम जाहीर होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तर दुसरीकडे आता या निवडणुकीसाठी महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना प्रभाग रचना करण्याचे आदेश राज्य सरकारकडून देण्यात आले आहे. 'अ, ब व क' वर्ग (पान २ वर)

# 'जनमाध्यम'चे किशोर आपटे यांना एक्सलन्स अॅवॉर्ड



पत्रकारितेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार प्रदान

**मुंबई/प्रतिनिधी-** जनमाध्यम चे मुंबई मंत्रालय विशेष प्रतिनिधी व ज्येष्ठ पत्रकार किशोर आपटे यांना मीडिया असोसिएशन ऑफ इंडियाचा पत्रकारितेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी दिला जाणारा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे विधिमंडळ वार्ताहर संघ व मंत्रालय प्रतिनिधी पत्रकार संघाचे पदाधिकारी दिलीप सपाटे,दीपक भातुसे यासह सर्वांनी अभिनंदन केले आहे.

मिडिया असोसिएशन ऑफ इंडिया(माई) च्या अध्यक्षा शीतल करदेकर आणि सरचिटणीस चेतन काशीकर यांच्या हस्ते उत्कृष्ट पत्रकारिता एक्सलन्स अॅवॉर्ड स्विकारताना ज्येष्ठ पत्रकार किशोर आपटे यांच्यासोबत मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे कार्यवाह दिपक भातुसे, कार्यकारिणी सदस्य खंडुराज गायकवाड, माजी अध्यक्ष प्रविण पूरो, ज्येष्ठ सदस्य विलास मुकादम उपस्थित होते.

# 36 संस्थाचालक पोलिसांच्या रडारवर

## सचिव, मुख्याध्यापकांची झोप उडाली

**नागपूर/प्रतिनिधी :** सध्या शिक्षण विभागातील मोठा घोटाळा उघडकीस आल्याने ३६ शिक्षण संस्थाचालक संस्थाचालकांनी शाळांमध्ये नियुक्ती करवून शासनाचे वेतन चालू करवून घेतले. त्यामुळे खळबळ



उडाली आहे.दहावी-बारावीच्या निकालांत नागपूरचा क्रमांक मागील काही वर्षांपासून खालीच असल्याचे दिसून आले आहे. मुळात आता पोलिसांच्या रडारवर असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, अधिकारी व संस्थाचालकांच्या हातमिळवणीतून पावणेसातशेहून अधिक नियमबा शालार्थ आयडी जारी करण्यात आले. ज्यांना शिकवतादेखील येत नाही, अशा शिक्षकांची याला शिक्षण विभागातील अधिकारी व शिक्षण संस्थाचालक मोठ्या प्रमाणावर कारणीभूत असल्याची बाब समोर आली आहे. अपात्र मुख्याध्यापक नियुक्तीच्या प्रकरणात पोलिसांनी भंडारा येथील शिक्षण संस्थाचालक चरण चेटुले याला ताब्यात (पान २ वर)

# एसटीच्या सर्व बस होणार इलेक्ट्रिक



**पुणे /प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील प्रवाशांमध्ये लालपरी ही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी बसबाबत मोठी घोषणा केली आहे. प्रताप सरनाईक हे पुण्यामध्ये बोलत होते. यावेळी त्यांनी एसटीमधील सर्व बस या इलेक्ट्रिक करण्यात येणार आहेत. तसेच पुढील १० वर्षांमध्ये टप्प्याटप्प्याने सर्व जुन्या बस बंद केल्या जाणार असल्याची माहिती दिली आहे.दरम्यान, गावागावांमधील प्रवासासाठी सर्वजण एसटी बसचा पर्याय निवडतात. गावामधील शाळा व कॉलेजमध्ये (पान २ वर)

# वटपौर्णिमेच्या दिवशीच पतीचा निर्घृण खून

**सांगली/प्रतिनिधी :** शरीरसंबंधाबाबत असलेल्या भीतीतून वटपौर्णिमेच्या रात्रीच पत्नीने झोपेत असलेल्या पतीच्या डोक्यात कु-हाडीने वर्मी घाव घालून खून केल्याची घटना मंगळवारी रात्री साडे बारा वाजण्याच्या सुमारास



कुपवाडमध्ये घडली. अनिल तानाजी लोखंडे (वय ५३, रा. प्रकाशनगर, गल्ली नंबर ६, अहिल्यानगर, कुपवाड) असे मृताचे नाव आहे. कुपवाड पोलिसांनी पत्नी राधिका अनिल लोखंडे (वय २७) हिला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, मृत अनिल लोखंडे हे गवंडी काम करीत होते. त्यांची पहिली पत्नी वैशाली हिचे दोन वर्षांपूर्वी आजाराने निधन झाले आहे. अनिल यांना काजल व शिवानी या दोन (पान २ वर)

## बीडची 'सोनम'!

# पतीचे अपहरण; हात-पाय मोडले, माहेरच्यांची साथ

**बीड /प्रतिनिधी :** एकीकडे सासरच्यांच्या छळाला कंटाळून सूना आत्महत्या करण्याच्या बातम्या सातत्याने कानावर पडत असताना बीडमध्ये मात्र या उलट प्रकार घडला. पती पत्नीचा वाद विकोपाला केला आणि नंतर पत्नीने माहेरच्या मंडळींना बोलावून पतीला बेदम चोपलं. त्यामध्ये पतीचा दोन्ही पाय आणि हात मोडले. रामहरी मोरे असं पतीचं नाव असून अनुसया काकडे असं पत्नीचं नाव आहे. याप्रकरणी बीड ग्रामीण पोलिस स्थानकात पत्नीसह चौघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीडच्या ग्रामीण पोलिस ठाणे हद्दीत ही घटना घडली आहे. पत्नीने माहेरच्या मंडळींना बोलावून पतीचे अपहरण केले आणि त्याला बेदम (पान २ वर)











# सुकमात दोन नक्षलवादी ठार

## ५ लाखांचे बक्षीस होते

**रायपूर-** छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यात नक्षलवाद्यांविरोधात सुरक्षा दलांनी मोहिम सुरू केली आहे. आज पुन्हा एकदा चकमक झाली. या चकमकीमध्ये दोन नक्षलवाद्यांचा खात्मा झाला आहे. कुकनार पोलीस ठाणे परिसरातील जंगलात मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांकडून एक स्वयंचलित शस्त्रही जप्त करण्यात आले आहे. याबाबत सुकमाचे एसपी किरण चव्हाण यांनी माहिती दिली. ते म्हणाले की, चकमक आणि शोध मोहीम सुरू आहे. ठार झालेल्या दोन नक्षलवाद्यांमध्ये एका महिलेचाही समावेश आहे. आज ११ जून २०२५ रोजी सकाळी, बंदी घातलेल्या सीपीआय माओवादी संघटनेच्या नक्षलवादी असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे, कुकानार पोलिस ठाणे कर्मचारी आणि सुकमा डीआरजी यांचे संयुक्त पथक शोध मोहिमेसाठी रवाना झाले. ही शोध मोहीम दुपारी २ वाजता सुरू झाली, त्यादरम्यान सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये अनेक वेळा गोळीबार झाला. ठार झालेल्या नक्षलवाद्यांमधील एकाची ओळख पटली आहे. तो पेद्रास येथील स्थानिक संघटनेचा कमांडर आहे. त्याच्यावर (पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

● सीटवर गाद्या नाहीत
● तुटलेली शौचालये, झुरळे;
● 5 दिवसांनी 4 रेल्वे अधिकारी निलंबित

# अमरनाथला जाणा-या BSF जवानांना जीर्ण ट्रेन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमरनाथ यात्रेसाठी ड्युटीवर जाणा-या १२०० बीएसएफ जवानांनी ट्रेनची वाईट अवस्था पाहून त्यात चढण्यास नकार दिला. रेल्वे मंत्रालयाने या ५ दिवस जुन्या प्रकरणात ४ रेल्वे अधिका-यांना निलंबित केले आहे.६ जून रोजी सैनिकांना त्रिपुराहून अमरनाथला जायचे होते. नॉर्थ ईस्ट फ्रंटियर रेल्वे (एनएफआर) कडून सैनिकांना पुरवण्यात आलेल्या ट्रेनच्या खिडक्या आणि दरवाजे तुटलेले होते.ट्रेनचा व्हिडिओही आता समोर आला आहे. त्यातील शौचालय तुटलेले आहे, लाईट नाही. सीटवरील गाद्याही गायब आहेत.





जमिनीवर झुरळे दिसत आहेत. सैनिकांनी नकार दिल्यानंतर, १० जून रोजी दुसरी ट्रेन उपलब्ध करून देण्यात आली.अमरनाथ यात्रेकरूंच्या कर्तव्यासाठी सैनिकांना काश्मीरला पोहोचायचे होते. ज्या ट्रेनने त्यांना प्रवास करायचा होता त्याची तपासणी बीएसएफ कंपनी कमांडरने केली. ट्रेनची स्थिती पाहून त्यांना धक्का बसला.रेल्वेच्या डब्यांची अवस्था खूपच वाईट होती. सैनिकांना एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी नेण्यासाठी त्यांचा वापर करता येत नव्हता. तपासणीनंतर असे आढळून आले की डबे अनेक महिन्यांपासून वापरले गेले नव्हते.प्रत्येक डब्यात तुटलेल्या वस्तू पडलेल्या होत्या.

ट्रेनच्या खिडक्या आणि दारांना छिद्रे होती. बहुतेक सीट मातीने माखलेले होते. ट्रेनच्या अनेक डब्यांमध्ये बल्ब किंवा वीज कनेक्शन नव्हते. भारतीय रेल्वेच्या एनएफआर झोनच्या एका वरिष्ठ अधिका-याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, ६ जून रोजी निघणारी ट्रेन रद्द करण्यात आली आहे. कारण बीएसएफने ट्रेनमधील त्रुटींवर तीव्र आक्षेप घेतला होता. यामुळे आता त्यांना दुसरी ट्रेन देण्यात आली आहे. मंगळवारी नवीन ट्रेन रवाना करण्यात आली.पहिल्यांदाच अमरनाथ यात्रा ३८ दिवसांसाठी आयोजित केली जात आहे. ती ३ जुलै ते ९ ऑगस्ट दरम्यान चालेल. ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या दिवशी छडी मुबारकने ती संपेल. गेल्या वर्षी ५२ दिवसांच्या तुलनेत यावर्षी यात्रेचा कालावधी ३८ दिवसांपर्यंत कमी करण्यात आला आहे. पहिल्यांदाच, केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (CAPF) यांच्या देखरेखीखाली असलेल्या ताफ्याच्या सुरक्षेसाठी जॅमर बसवले जात आहेत. सशस्त्र दलांच्या ५८१ कंपन्या तैनात केल्या जातील. सुमारे ४२००० ते ५८,००० सैनिक तैनात केले जातील.यात्रा मार्गावरील यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी जम्मू आणि काश्मीरमध्ये १५६ कंपन्या आधीच तैनात करण्यात आल्या आहेत, तर १० जूनपर्यंत ४२५ नवीन कंपन्या तैनात केल्या जातील. भाविकांना खांद्यावर घेऊन जाणा-या घोड्यांची पडताळणी केली जाईल. गुन्हेगारी रेकॉर्ड असलेल्यांना पोनी/पिठू सेवा चालवण्याची परवानगी दिली जाणार नाही यात्रेकरू ज्या घोड्यांवर आणि खेचरांवरून प्रवास करतील त्यांना देखील टॅग केले आहे जेणेकरून जर ते मार्गावरून भटकले तर त्यांना रिअल टाइममध्ये ट्रॅक करता येईल. रस्ते उघडण्याच्या पार्ट्या, धमक्यांवर त्वरित कारवाई करण्यासाठी जलद कृती पथके, बॉम्ब निकामी करणारे पथके, K9 युनिट्स (विशेषत? प्रशिक्षित स्निफर डॉग) आणि ड्रोन पाळत ठेवली जातील.

पान १ व १० वरून

## महायुतीचे सरकार आणण्यात

प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करत आहे. कारण हे सरकार अदानी, अंबानीचे आहे. हे सरकार शेतक-यांचे नाही तर हे भांडवलदारांचे सरकार आहे, असा गंभीर आरोप जानकर यांनी केला. जर या सरकारला अद्दल घडवायची असेल तर आपण सर्वांनी बच्चू कडूंना पाठिंबा दिला पाहिजे. म्हणूनच मी आज बच्चू कडू यांना पाठिंबा द्यायला आलो आहे, असे जानकर म्हणाले. आंदोलनाला अनेक नेत्यांचा पाठिंबा मिळत आहे. शेतक-यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, शेतमजुरांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याला विमा संरक्षण मिळावे, शेतमजुरांचे आर्थिक हित जपण्याकरिता स्वतंत्र मंडळाची उभारणी व्हावी, लागवड ते कापणीपर्यंतच्या सर्व शेतीकामांचा समावेश महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत करावा. हे शक्य नसल्यास तेलंगणाच्या धर्तीवर एकरी १० हजार रुपयांची मदत देण्यात यावी. रासायनिक खतांप्रमाणे सेंद्रिय तसेच मेंढी खतालादेखील अनुदान देण्याची तरतूद करण्यात यावी, दुधातील भेसळ रोखत गाईच्या दुधाला ५० रुपये तर म्हशीसाठी ६० रुपये प्रतिलिटर असा दर निश्चित करावा, या मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी हे आंदोलन सुरू केले आहे.

## शहरी नक्षलवादाच्या नावाखाली

आहे, संघटना टिकवून ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. बच्चू कडू यांच्या सोबत शेतकरी राहिला तर निश्चितच कर्जमुक्ती होउ शकते. जो कर्जमुक्ती की बात करेगा वही झेडपी पें राज करेगा हा नारा लावणे गरजेचे. पैशात मते विकत घेणे, ही पद्धत मोडावी लागणार आहे. शेतक-यांचे आंदोलन हे जातीपातीचे आंदोलन नाही. आपल्या आंदोलनासाठी आपणच सेलिब्रिटी असून आपल्याला आता पुढे यावे लागणार आहे. ज्या ज्या वेळी शेतक-यांचे आंदोलन उभे राहते त्या त्या वेळी जातीयवादी गिधाडे पुढे येतात. हे आंदोलन मोठे करून सरकारकडून कर्ज मुक्ती करून घेउ, असे रविकांत तुपकर म्हणाले.

## 26 तलाठ्यांचा काळा कारनामा;

श्रीकृष्ण पांचाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. जालन्याच्या अंबड आणि घनसावंगी तालुक्यात तहसीलदारांचे ल?गिन, पासवर्डचा गैरवापर करून तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायकांनी अतिवृष्टी आणि गारपिटीचे अनुदान हडप केल्याचा प्रकार समोर आला होता. या प्रकरणाच्या चौकशीसाठी ८ सदस्यांची समिती नेमण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास पूर्ण केल्यानंतर समितीने आपला अहवाल आज जिल्हाधिका-यांना सादर केला आहे. या प्रकरणी चौकशी समितीने ७९ कोटींची रक्कम अक्षेपित काढली होती. त्यापैकी ७२ कोटी रुपयांची समितीने चौकशी केली असून ३४ कोटी ९७ लाख रुपयांची रक्कम अपहारित असल्याचे या चौकशीत निष्पन्न झाले असल्याची माहिती जालना जिल्हाधिका-यांनी दिली.

## 36 संस्थाचालक पोलिसांच्या

घेतले व त्यानंतर केवळ मुख्याध्यापकच नव्हे, तर शिक्षण संस्थाचालकदेखील यात सहभागी असल्याचे समोर आले. पोलिसांनी या गुन्ह्यासोबतच अपात्र शालार्थ आयडीच्या गुन्ह्यातदेखील सखोल तपास केला आहे. तीन उपसंचालक, शिक्षणाधिकारी यांच्यासह दोन्ही गुन्ह्यांत १८ जणांना अटक झाली.त्यांच्या चौकशीतून अनेक मोठे खुलासे झाले आहेत. यातूनच पोलिसांना ३६ शिक्षण संस्थाचालकांची नावे मिळाली आहेत. या सर्व शिक्षण संस्थाचालकांनी मागील अनेक वर्षांपासून अर्थपूर्ण व्यवहार करत पात्रता किंवा क्षमता नसलेल्या शिक्षकांची नियुक्ती केली. त्यानंतर प्रशासनातील अधिका-यांच्या मदतीने त्यांचे शालार्थ आयडी तयार करून त्यांचे वेतन सुरू करवून दिले. हे सर्व संस्थाचालक आता एसआयटीच्या रडारवर आहेत. त्यांच्यासह शिक्षणसंस्थांचे सचिव, मुख्याध्यापक यांच्यावरदेखील लवकरच मोठी कारवाई होण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सुरुवातीला सायबर पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यात ५८० जणांचे शालार्थ आयडी नियमबा पद्धतीने काढल्याचे समोर आले होते. मात्र एसआयटीने केलेल्या तपासात हा आकडा आता वाढला आहे. शिक्षण उपसंचालक कार्यालय, शिक्षणाधिकारी किंवा छाननी समितीसमोर कुठलाही प्रस्ताव न देता ६८१ जणांचे शालार्थ आयडी प्राप्त करण्यात आल्याचे चौकशीतून समोर आले आहे. या रॅकेटमध्ये सरकारी पातळीपासून शिक्षणसंस्था चालकांपर्यंतची मोठी चेन आहे. एसआयटीकडून विविध मार्गांनी तपास सुरू आहे. त्यामुळे नियमबा शालार्थ आयडीप्रमाणेच अपात्र शिक्षक, रॅकेटमध्ये सहभागी असलेले संस्था सचिव, मुख्याध्यापक यांची यादीदेखील वाढण्याची शक्यता आहे. ६८१ शिक्षकांना लवकरच प्रत्यक्ष चौकशीसाठी बोलविण्यात येणार आहे. त्यातून या रॅकेटमध्ये आणखी कोण सहभागी आहे, हे नव्याने समोर येणार आहे. नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाल्यानंतर पूर्व विदर्भातील शालेय क्षेत्राला मोठे हादरे बसण्याची शक्यता आहे.

## एसटीच्या सर्व बस

जाण्यासाठी एसटीचा वापर केला जातो. सगळ्यांची आवडती लालपरी आता मॉडर्न होत आहे.राज्यातील सर्व एसटी बस आणि डेपो अद्ययावत करण्याचे सरकारने हाती घेतले आहे. पुढील दोन महिन्यांत काम सुरू होणार असून सुरक्षा आणि स्वच्छता याचा विचार करून काम केले जाईल, असे आ□ासन मंत्री प्रताप सरनाईकांनी दिले. एसटी खात्यात ५ हजार बस घेणार असून त्यापैकी एक हजार बस या इलेक्ट्रिक घेण्याचे संकेत त्यांनी दिले. पुढील काही वर्षांत एसटीच्या सर्व बसेस इलेक्ट्रिक असतील. २०२९ पर्यंत ताफ्यात २५ हजार बसेस दाखल होणार आहेत, अशी माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.पुण्यातील एका कार्यक्रमामध्ये परिवहन मंत्री प्रताप सरनाईक उपस्थित होते. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला असून एसटी महामंडळाचे पुढील पूर्ण नियोजन सांगितले आहे. पुढे ते म्हणाले की, सरनाईक यांनी या स्मार्ट बसमध्ये सर्व आवश्यक सेवा-सुविधा आणि सुरक्षितता यंत्रणा असतील असे स्पष्ट केले स्वारगेट घटनेच्या पार्श्वभूमीवर, बाहेरील व्यक्ती बसमध्ये सहजपणे प्रवेश करू शकणार नाहीत, अशी यंत्रणा बसमध्ये असावी. तसेच आग किंवा इतर घटना घडल्यास तातडीने प्रतिसाद देणारी यंत्रणा बसमध्ये असणे आवश्यक असल्याचेही देखील मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे. प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, एसटी महामंडळाला सध्या ११ हजार कोटींचा संचित तोटा असून, यावर श्वेतपत्रिका काढणार आहे.

## वटपौर्णिमेच्या दिवशीच

मुली आहेत. त्यांची लग्ने झाल्याने त्या दोघी सासरी राहतात. अनिल लोखंडे हे एकटेच घरी राहत होते. त्यांच्या जेवणाचे हाल होत असल्यामुळे नातेवाइकांनी त्यांचे दुसरे लग्न करण्याचे ठरविले.नातेवाइकांनी वडी (ता. खटाव, जि. सातारा) येथील बाळकृष्ण इंगळे यांची मुलगी राधिका हिच्याशी लग्न ठरवले. राधिका हिला जन्मापासून गर्भाशयाची पिशवी नसल्यामुळे मुलबाळ होणार नाही, असे डॉक्टरांनी सांगितले होते. अनिल यांना हा प्रकार सांगण्यात आला होता. त्यानंतर नातेवाईकांच्या संमतीने दि.२३ मे २०२५ रोजी माधवनगर येथील मंदिरात दोघांचे लग्न लावून दिले. अनिल व राधिका यांचे लग्न होउन अठरा दिवस झाले. दि.१० जून रोजी वटपौर्णिमेनिमित्त राधिका हिला तिचा मावस भाउ गणेश यांच्या घरी अनिल लोखंडे यांनी सोडले. रात्री ९.३० च्या सुमारास अनिल हे राधिकाला घेउन जाण्यासाठी आले. दोघेही रात्री १०.३० वाजेच्या सुमारास अहिल्यानगर येथे घरी गेले.राधिका हिला शरीरसंबंध ठेवण्याची इच्छा नव्हती. परंतू इच्छा नसतानाही शरीरसंबंध ठेवण्यासाठी अनिल बोलत होते. मंगळवारी पती अनिल शरीरसंबंध ठेवण्यास भाग पाडतील, हा विचार मनात येउन त्याची राधिकाला भीती वाटू लागली. त्या कारणावरून दोघांत वाद झाला. त्यानंतर पती अनिल झोपण्यासाठी अंथरुणावर पडले. त्यावेळी पाणी पिण्यास किचन रूममध्ये जाण्याचे नाटक करून राधिकाने येताना कु-हाड आणली. त्यानंतर अनिल यांच्या डोक्यात कु-हाड घालून त्यांचा खून केला.राधिकाने तिचे नातेवाईक गणेश दुबळे यांना रात्री साडे बाराच्या सुमारास फोन करून हकीकत सांगितली. गणेश यांनी मृत अनिल यांचे पुतणे मुकेश लोखंडे (रा. वसंतदादा कारखाना, जुनी क?लनी) यांना कळवले. त्यानंतर नातेवाईकांनी अहिल्यानगर येथे अनिल लोखंडे यांच्या घरी तातडीने धाव घेतली. मुकेश लोखंडे यांनी तातडीने कुपवाड एमआयडीसी पोलिसांना ही माहिती दिली. मिरजचे पोलिस उपअधीक्षक प्रणील गिल्डा, सहायक निरीक्षक दीपक भांडवलकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. संशयित राधिका हिला ताब्यात घेउन पंचनामा केला. संशयित राधिका हिने पोलिसांना खुनाची कबुली दिली आहे. एमआयडीसी पोलिसांनी तिला अटक केली आहे.

**प्रतिकाराची संधीच नाही-**नातेवाईक व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली तेव्हा अनिल लोखंडे हे अंथरुणावर रक्ताच्या थारोळयात पडले होते. शेजारी रक्ताने माखलेली कु-हाड होती. अनिल यांना प्रतिकाराची संधी न देताच राधिकाने त्यांचा खून केल्याचे चौकशीत स्पष्ट झाले.

**आदल्या दिवशी नकार-** सोमवारी पती अनिल यांनी शरीरसंबंध ठेवण्यास सांगितले होते, तेव्हा तिने नकार दिला होता. तसेच त्यांना अडवले होते. परंत मंगळवारी ते शरीरसंबंध ठेवतील अशी तिला भीती वाटत होती. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला. अखेर तिने पाणी पिण्यास जाण्याचे नाटक करून कु-हाड आणून पतीवर वार केले.

## पतीचे अपहरण; हात-पाय मोडले,

मारहाण केली. या मारहाणीत पतीचे दोन्ही पाय आणि एक हात फ्रॅक्चर झाला. रामहरी मोरे याचा विवाह मागील वर्षी अनुसया काकडे हिच्यासोबत झाला होता. परंतु घरगुती कारणावरून दोघांचे सातत्याने भांडण होत होते. त्यामुळे हे पती-पत्नी विभक्त राहत होते. अशातच रामहरी मोरे आपले सामान घेण्यासाठी पत्नीच्या घरी गेला असता या दोघांचे पुन्हा भांडण झाले. भांडणाचा वाद विकोपाला जात असल्याचे लक्षात येताच रामहरी मोरे यांनी घरातून काढता पाय घेतला आणि ते आपल्या गावी निघाले. मात्र त्याच वेळी पत्नीने तिच्या माहेरच्यांना बोलावून घेतलं. तिच्या माहेरच्या मंडळींनी रामहरी मोरेचे रस्त्यावरुन अपहरण केलं आणि त्याला बेदम मारहाण केली.

## सुकमात दोन नक्षलवादी

**५ लाखांचे बक्षीस** -होते. महिला नक्षलवाद्याची ओळख अजूनही पटलेली नाही. या चकमकीनंतर सुरक्षा दलांना हत्यारे सापडली आहे. यामध्ये एक इन्सास रायफल, एक १२ बोर रायफल, तसेच इतर शस्त्रे, दारूगोळा आणि स्फोटके जप्त करण्यात आली आहेत. अतिरिक्त सहाय्यक पथके तैनात करण्यात आली आहेत. याआधी सुकमा जिल्ह्यात झालेल्या आयईडी स्फोटात अतिरिक्त पोलिस अधीक्षक आकाश राव गिरीपुंजे यांचा मृत्यू झाला होता. एएसपी गिरीपुंजे कोणत्याही गस्त घालत असताना कोंटा-एराबोरा रस्त्यावर दोंड्राजवळ आयईडी स्फोट झाला. यामध्ये सुकमा जिल्ह्यातील कोंटा विभागाचे एएसपी आकाश राव गिरीपुंजे गंभीर जखमी झाले.

## 'अ, ब व क' वर्ग महानगरपालिकेंना

महानगरपालिकांची प्रभाग रचना करण्याबाबत राज्य सरकारने आदेश दिले आहे. यामध्ये पुणे, नाशिक, ठाणे, पिंपरी- चिंचवड, कल्याण, छत्रपती सभाजीनगर सारख्या महानगरपालिकेंचा समावेश आहे. पुढील चार महिन्यात स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता या प्रक्रियेला वेग आला आहे. राज्य सरकारच्या या आदेशानंतर ज्या महानगर पालिकेमध्ये निवडणुका नियोजित आहे त्या महानगर पालिकेमध्ये आता प्रशासकीय पातळीवर निवडणुकींची प्रक्रिया सुरु होणार आहे. 'अ, ब व क' वर्ग महानगरपालिकांच्या बाबतीत प्रभाग रचनेचे प्रारुप तयार करण्याच्या अनुषंगाने सदस्य संख्या निश्चित करुन प्रभाग रचनेचे प्रारुप तयार करणे ही जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची असेल अशी माहिती देखील राज्य सरकारकडून देण्यात आली आहे. राज्य सरकारने दिलेल्या माहितीनुसार, प्रभाग रचना जनगणनेच्या लोकसंख्येच्या आधारे करण्यात येणार आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५ मधील तरतुदीनुसार निवडणुकीकरिता प्रभाग रचना शासनाने, राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने करावयाची आहे. तसेच या नियमाअंतर्गत प्रत्येक प्रभागातून शक्यतो चार, किमान तीन आणि कमाल पाच सदस्य निवडले जातील अशी तरतूद २०२४ च्या अधिनियमानुसार करण्यात आली असल्याची माहिती देखील राज्य सरकारकडून देण्यात आली आहे. यामुळे आता पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवीमुंबई, पिंपरी चिंचवड, छ. संभाजीनगर, यासह इतर सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत.

## सरकारला सळो की

या आंदोलनाला पाठींबा द्यावा आणि एक दिवस ठरवून संपूर्ण महाराष्ट्र बंद ची हाक द्यावी.आम्ही वाहनांचे एकही चाक हलू देणार नाही. मी माझी ताकद बच्चू कडूच्या मागे उभी करण्यास तयार आहे.मागण्या मान्य न झाल्यास आम्ही रस्त्यावर उतरू. कुणी येथे जात आणू नये,पक्ष आणू नये, सर्वांनी शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी एकत्र लढाई उभारली पाहिजे,असेही त्यांनी सांगितले.

**आम्ही मरण पत्करू,झुकणार नाही- बच्चू कडू**

आम्ही मंत्री असतानाही शेतकऱ्यांचा आवाज उचलला होता. पालकमंत्री बावनकुळे दमदाटी सारखं वागले, याचा आम्ही निषेध करतो. आम्ही मरण पत्करू पण झुकणार नाही. बावनकुळे म्हणाले की, आम्ही पाच वर्षात केव्हाही कर्जमाफी देणार आहोत. पण केव्हा देणार हे त्यांनी सांगावं. मुख्यमंत्री मागणी पूर्ण करत नाही. तुम्हाला जाहीर करावंच लागेल. असंही बच्चू कडू म्हणाले.

## स्तनदा माता मृत्यू प्रकरणी

मागील पाच दिवसापासून तिची प्रकृती खराब झाल्याने प्राथमिक उपचार स्थानिक पातळीवर सुरू होते. मंगळवारी तिची प्रकृती चिंताजनक झाल्यामुळे तिला स्थानिक डॉक्टर आणि समुदाय आरोग्य अधिकारी यांनी उपचारासाठी अचलपूर महिला व बाल रुग्णालयात दाखल केले. जिथे अर्धा तासात रवीनाचा मृत्यू झाला. मृत्यूचे नेमके कारण अजून पर्यंत स्पष्ट झाले नाही आहे. शवविच्छेदन नंतर सत्य समोर येणार आहे. दरम्यान रवीना ची आई शांती हरिश्चंद्र कासदेकर यांनी आरोग्य विभागावर हलगर्जीपणाचा आरोप केला आहे. त्यांचे म्हणणे आहे की वेळेवर ॲम्बुलन्स उपलब्ध होती, पण डॉक्टर नव्हते. त्यामुळे रवीनाची प्रकृती अजून बिघडली आणि तिचा मृत्यू झाला. यामुळे तिची बारा दिवसाची मुलगी आईच्या मायेपासून पोरकी झाली आहे. याला आरोग्य विभाग जबाबदार आहे. त्यांनी यासाठी जबाबदार डॉक्टरवर कार्यवाहीची मागणी केली आहे. शांति कासदेकर यांच्यासोबत नागापूर गावातील नागरिकांसह कुटुंबीय उपजिल्हा रुग्णालयात धडकले. यामुळे तिथे गोंधळ निर्माण झाला होता. माजी आमदार राजकुमार पटेल यांनी सुद्धा कुटुंबीयांना न्याय देण्याची मागणी केली. प्रकरणाची गंभीरता पाहून ठाणेदार अशोक जाधव तिथे आले. त्यांनी कुटुंबीयांना कारवाईचे आश्वासन दिले आणि आधी अंतिम संस्कार करण्यास सांगीतले. पण कुटुंबीय आपल्या मागण्यांवर ठाम होते. त्यामुळे परिस्थिती तणावपूर्ण झाली होती. मेळघाटमध्ये आरोग्यसेवा सुधारण्यासाठी लाखो रुपये खर्च करण्यात येत आहे. पण येथे आरोग्य विभागाच्या उपाययोजनेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

## नांदगाव शहरात घरफोडी

यांच्या घरी जिन्याच्यावर चढई केली असता उघड्या खिडकीतून हालचाल दिसल्याने घरातून आवाज देताच चोरटे तिथून पळून गेले. डॉ .बनसोड यांच्या दवाखान्याच्या मेन गेटचे चोरट्यांनी कुलूप तोडले. सीसीटीव्ही कॅमेरे असल्याचे चोरट्यांच्या लक्षात आल्याने तिथून त्यांनी पळ काढला असावा असे सांगण्यात आले. घटनेची माहिती मिळताच नांदगाव पोलीसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला. घटनेची अधिक चौकशी नांदगाव पोलीस करीत आहे.

## २ हजार ५८८ कोटी ५५

केले. त्यानंतर नियोजन भवनात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एकाचवेळी ऑनलाईन पध्दतीने विविध विकास कामांचा शुभारंभ झाला.अकोला येथील तहसील, तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या अद्ययावत इमारतीचे तसेच महिला व बालविकास भवनाचे लोकार्पण झाले. पूर्णा नदीवरील काटीपाटी बॅरेज प्रकल्पाचे भूमीपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. सुमारे ४५४.६२ कोटी रूपयांच्या निधीतून सिंचनाची व्यवस्था निर्माण होऊन शेतकरी बांधवांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून कृषी संशोधनाचा वारसा असलेल्या अकोला भूमीत २४९.४१ कोटी रूपये खर्चून बांधण्यात आलेल्या पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाच्या इमारतीचा कोनशिला समारंभही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने झाला.अकोला शहरात अमृत २.० योजनेत ६२९.०६ कोटी रू. निधीतून मलनि:सारण (टप्पा-१) चे काम, तसेच शहरासाठी १८.९९ कोटी रू. निधीतून प्रधानमंत्री ई-बस सेवा योजनेत ई-बस डेपो व चार्जिंग स्टेशनचे भूमिपूजन झाले. त्याचप्रमाणे, १५ कोटी रू.निधीतून अद्ययावत सांस्कृतिक भवन, सुमारे ९.९६ कोटी रू. निधीतून ऑलिंपिक दर्जाचा तरणतलावाचा कोनशिला समारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. 'हायब्रीड ॲन्युइटी'अंतर्गत मुर्तिजापूर-दहिगाव-गुडधी-उमरी- अकोला राज्य महामार्ग २८४, तसेच अकोला-मलकापूर- कानशिवणी-मोरगांव काकड- बोरगांव खुर्द जिल्हा प्रमुख मार्गाची सुधारणा ४१०.१० कोटी रू. निधीतून होणार आहे. त्याचे भूमिपूजन यावेळी झाले. त्याचप्रमाणे, उकळी बाजार-नेर- नांदखेड- किनखेड राज्य महामार्ग २७८, किनखेड ते दहिहंडा महामार्गाची सुधारणा, अकोट मतदारसंघातील राज्यमार्ग क्र.४७ रावेर, पातूर्डा, पिंपळगाव, खांडवी, जळगाव जामोद- हिवरखेड- अकोट या मार्गावरील (रंभापूर ते हिवरखेड ते वारखेड भाग) सुधारणा ३११.४४ कोटी निधीतून होत आहे. बार्शिटाकळी शहरात ९.९९ कोटी रू. निधीतून मुख्य रस्ता होत आहे. या कामांचे भूमिपूजन झाले.सर्वोपचार रुग्णालयात १५१.५६ कोटी रू. निधीतून नवीन वॉर्ड इमारतीचे बांधकाम करण्यात येणार आहे. यामुळे रुग्णांसाठी सुविधा निर्माण होणार असून त्याचे भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.अकोला येथे १२९.२३ कोटी निधीतून पोलीस अधिकारी व कर्मचा-यांसाठी दक्षतानगर येथे २४६ निवासस्थाने व परिसर विकासकामांमुळे कर्तव्याप्रती २४ तास बांधील असणा-या पोलीसांसाठी निवासाची सोय निर्माण होणार आहे. तसेच ५ कोटी खर्चाचे अकोला तालुका क्रीडा संकुल या कामांचे कोनशिला अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

मूर्तिजापूर तालुक्यातील हिवरा कोरडे, तसेच पारद येथे ३३/११ केव्ही उपकेंद्राचे भूमिपूजन व बार्शिटाकळी तालुक्यातील भेंडीमहाल येथे ४५ कोटींच्या १० मेगावॅट क्षमतेच्या व रेडवा गाव येथे ९ कोटींच्या २ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. अकोला जिल्ह्यातील अकोला व अकोट या दोन शहरांमध्ये ९ कोटी रू. निधीतून सीसीटिव्ही प्रकल्पाचे लोकार्पणही यावेळी झाले. प्रारंभी पालकमंत्री तथा राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर आणि जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी मेळघाटातील प्रतिकृती भेट देऊन मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमात विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांच्या अकोला विमानतळ येथे आगमनप्रसंगी पालकमंत्री ॲड. फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरिष पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार किरण सरनाईक, माजी राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील, जिल्हाधिकारी अजित कुंभार आदींनी स्वागत केले.

## चोरीच्या दोन दुचाकीसह

हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी रेकॉर्ड धारी आहे. आणखीन काही गुन्हे त्यांच्याकडून उखड होण्याची शक्यता आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, सागर पाटील, कल्पना बारवकर, सहायक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सीमा दाताळकर यांच्या नेतृत्वात हेड कॉन्स्टेबल छोटेलाल यादव, शैलेश अर्डक,किशोर अंबुलकर, नईम बेग, अख्तर पठाण, संजय भारसाकडे, नरेश मोहरील, रामकृष्ण कांगडे, रुपेश काळे, मयूर बोरकर, सायबर सेलचे अनिकेत वानखडे यांनी केली.

## दर्यापूर तालुक्यात वादळी

नुकसान झाले आहे. रामागढ येथे गोठ्याची भिंत कोसळून अशोक लोणकर या शेतकऱ्यांचा बैल मृत्यू पावला. ऊमरी ममदाबाद येथे झाड कोसळून एका बैलांचा मृत्यू झाला आहे. तर ऊमरी ईतबारपुर येथील दोन घरांची टिनपत्रे उडाली आहे. चांडोळा येथेही निंबाचे झाड गोठ्यावर कोसळल्याने अनिल वारुळकर यांचे नुकसान झाले आहे. अनेक गावांमध्ये विद्यूत तारा तुटल्या असून विद्यूत पोलही वाकले आहेत. परिणामी अनेक गाव-खेड्यातील विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. तर दुसरीकडे वादळी वाऱ्याने काही गावांमधील शेतकऱ्यांची दाणादाण उडाली आहे. दर्यापूर शहरातील नगरपरिषद क्षेत्रात समाविष्ट झालेल्या हद्दवाढ साईनगर आदी भागात काही ठिकाणी पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था नाही.त्यामुळे पावसाचे पाणी साचून आहे.

**झाडे कोसळली, दर्यापूर ते अकोला मार्ग बंद-**वादळी वाऱ्यासह कोसळलेल्या पावसामुळे नांदरून ते अकोला मुख्य मार्गावर ठिकठिकाणी झाडे पूर्णतः कोलमडली असून वाहतुकीला फटका बसला. वाहतूक काही वेळेपूरती ठप्प झाली होती. तसेच बससेवा बंद आहे. नांदरून ते अकोला मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचाऱ्यांना प्राचारण करण्यात आले आहे.

## विद्यार्थिनीच्या आत्महत्या प्रकरणी

प्रकरणात प्रतीकचा मित्र प्रथमेश अढाऊ याला अटक केली आहे. तिच्या इतर मित्रांना पण विचारपूस केली जात आहे. आता या प्रकरणात काय नवीन समोर येते याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहे.

## राष्ट्रीय किसान मोर्चाचा

हमखास हजर असतात.' मोर्चाच्या वतीने आमदारांना विचारण्यात आले की, 'तुम्ही विधानसभेत शेतकऱ्यांच्या समस्या कधी, किती वेळा, आणि कोणत्या मुद्यांवर मांडल्या? त्याचे काही पुरावे तुमच्याकडे आहेत का?' मात्र याबाबत कोणतेही ठोस उत्तर मिळाले नाही, असा आरोप मोर्चाच्या नेत्यांनी केला.या घेराव आंदोलनामध्ये राजकुमार वानखडे, अशोकराव नन्नावरे, दामोदरराव खापरे, जीवन इंगळे, अफसर अली, मिलिंद गजभिये, चंद्रशेखर तायडे, प्रेम गजभिये, सुरज इंगळे, हिम्मत मोहेकर, राजेश हिवराळे, संदीप इंगोले, अमरसिंग जावरकर, दिवाकर भिसे, धना जामूनकर, राजकुमार सावलकर, अरुण बेठेकर, परसराम खांडवे, रमेश अवतारे, सिद्धार्थ पाखरे, विष्णू राऊत, परमेश्वर बेटेकर, पुरुषोत्तम खांडवाये, बळीराम जावरकर, उल्हास चव्हाण, माणिक गवते, बानू गवते, राहुल गजबे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

## पीडीएमसी समोर तरुणावर

म्हणून तरुणीचा शर्ट ओढला. त्यामुळे चेतनने प्रवीणला मारहाण केली तर आरोपीने आपल्याजवळील चाकू काढून त्याच्या डोक्यावर हल्ला केला. या हल्ल्यामध्ये चेतन गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. तरुणीच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.


महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम
सिव्हील लाईन, वाशिम

ई-मेल - **washim.ee@mahapwd.gov.in** दुरध्वनी क्र.०७२५२-२३२३३४

ई-निविदा सुचना १० सन २०२५-२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून बी-१ नमुन्यातील निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करणारे नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **https://maharashtra.etenders.in** येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत रु.लक्ष |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुका येथे तहसीलदार निवासस्थानाचे बांधकाम करणे | ६६७२६५०-०० |
| २. | वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुका येथे तहसीलदार निवासस्थानाचे बांधकाम करणे | ६६९५८४५-०० |
| ३. | वाशिम जिल्ह्यातील वाशिम तालुका येथे तहसीलदार निवासस्थानाचे बांधकाम करणे | ६६६१७१६-०० |
| ४. | वाशिम जिल्ह्यातील वाशिम तालुका येथे उपविभागीय अधिकारी यांचे निवासस्थानाचे बांधकाम करणे | ६६६१७१६-०० |
| ५. | वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुका येथे उपविभागीय अधिकारी यांचे निवासस्थानाचे बांधकाम करणे | ६६९५८४५-०० |
| ६. | जिनियो अंतर्गत जिल्हा रुग्णालय वाशिम परिसरात लॅन्ड स्केपिंग करणे | ३०९३९३०-०० |
| ७. | जिनियो अंतर्गत मंगरुळपीर येथे व्यायाम शाळेचे बांधकाम करणे (मजुर कामगार सहकारी संस्था राखीव संवर्ग) | ११९३७१९-०० |
| ८. | जिनियो अंतर्गत मंगरुळपीर येथे शासकीय टेक्निकल सेकंडरी स्कूल करीता कंपाऊंड वॉलचे बांधकाम करणे (मजुर कामगार सहकारी संस्था राखीव संवर्ग) | १२९६९११-०० |
| ९. | रिसोड वार्ड क्र.२ मध्ये डॉ.रवि मोरे यांचे घर ते कडुजी रनजावे यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता व ड्रेनचे बांधकाम करणे व महात्मा फुले नगर दत्त मंदिराजवळ टिन शेडचे बांधकाम करणे (फेरनिविदा) | १३९१५१२-०० |
| १०. | रिसोड वार्ड क्र.१० मध्ये पठाणपुरा ते जाकिया मस्जिद ते निसार भाई यांचे घरापर्यंत व पठाणपुरा ते रेहानभाई ते राजा पठाण यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता व ड्रेनचे बांधकाम करणे (फेरनिविदा) | १३८०६१३-०० |
| ११. | रिसोड वार्ड क्र.१० मध्ये महिंद्रा डॉक्टर यांचे घर ते अस्लम पठाण यांचे घरापर्यंत व वार्ड क्र.९ माणिक-नगर ते बिस्लीला भाई यांचे घर ते अल्ताफ भाई यांचे घरापर्यंत अंतर्गत सिमेंट कॉंक्रिट रस्ता व ड्रेनचे बांधकाम करणे (फेरनिविदा) | १३८५५३९-००<br>१३८५५३९-०० |
| १२. | रिसोड वार्ड क्र.५ मध्ये पोलीस स्टेशन ते गोपाल कासट ते मिल व सरजित राऊत यांचे घर ते मारोती-मंदिरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे बांधकाम करणे (फेरनिविदा) | १३९५०१८-०० |
| १३. | वाशिम जिल्ह्यातील नवीन दक्षता व गुण नियंत्रण कार्यालयाकरीता आऊट सोर्सिंग करणे | २६९८०२५-०० |

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक ११.०६.२०२५ ते दिनांक १८.०६.२०२५
ई-निविदा उघडणे - मा.कार्यकारी अभियंता, सा.बां.वाशिम यांचे कार्यालयात दिनांक २०.०६.२०२५ वेळ ११.०० वा.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे--
१. **http://mahapwd.com**
२. **https://mahatenders.gov.in**
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
कार्यकारी अभियंता, वाशिम कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र.३७९८/ई-निसु-१०/मंत्रालय/निली/२५-२६ दि.३०.०५.२०२५
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम

स्वाक्षरी/-
(शुभम जोशी)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम

जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ गुरुवार, १२ जून २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com

# कारंजा नगर परिषदचा भोंगळ कारभार

■ प्रशांत ठाकरे ■

**कारंजा : दि. ३ जानेवारी २०२२ रोजी कार्यरत असलेल्या नगर परिषदेचा कार्यकाळ संपल्यामुळे नाममात्र प्रशासक नियुक्त होऊन सर्व कारभार मुख्याधिकारी यांच्याकडे वर्ग झाला. तत्कालीन मुख्याधिकारी यांनी १४ वा वित्त आयोग निधी सन २०१९-२० अंतर्गत राष्ट्रीय महामार्गावर विद्युत पथदिवे व त्याकरिता खांब उभारण्याची परवानगी नाही, अशा ठिकाणी खांब उभे करण्यासाठी जवळपास २ कोटि रुपयाचा निधी खर्च केला. सद्यस्थितीमध्ये आजरोजी २ कोटि रुपये खर्च करून राष्ट्रीय महामार्गावरील एकही पथदिवा सुरु झाला नाही.**

## ☐ शासकीय निधीचा दुरुपयोग, २ कोटींचा निधी व्यर्थ खर्च
## ☐ सखोल चौकशीची नागरिकांची मागणी

सविस्तर वृत असे की, सन २०१९-२० अंतर्गत नगर परिषद,कारंजा (लाड) या स्थानिक स्वराज्य संस्थेला १४ व्या वित्त आयोगांर्तगत मूलभूत अनुदान प्राप्त झाले. या प्राप्त निधीतून सार्वजनिक रस्ते, जागा व इमारत या ठिकाणी दिवाबत्ती करणे या कामाकरिता प्रस्ताव सादर केला. सादर केलेल्या प्रस्तावास दि. ३० ऑगस्ट २०१९ रोजी मुख्य अभियंता, (विद्युत), मुंबई यांनी अंदाजपत्रकाची तांत्रिक पडताळणी करणेबाबत मंजुरात दिली. या पत्रानुसार 'प्रोव्हायडींग स्ट्रीट लाईट टू दि रोडस इन कारंजा सिटी' या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम पाच कोटी सत्याहत्तर लक्ष बासष्ठ हजार तीनशे सत्यांएंशी रुपये(५,७७,६२,३८७/-) किमतीच्या प्रस्तावास मान्यता दिली. मुख्य अभियंता, (विद्युत), मुंबई यांनी तांत्रिक मान्यता प्रदान करताना दिलेल्या पत्रातील मुद्दा क्र. ७ नुसार 'सदर कामासाठी शासनाच्या इतर विभागाकडून आवश्यक प्रमाणपत्रे/ ना-हरकत इ. पूर्तता करूनच पुढील कार्यवाही करावी' असे नमूद केले आहे. दि.२४ डिसेंबर २०१९ रोजी तत्कालीन मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी प्रशासकीय मान्यता प्राप्त होण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांना पत्र सादर केले. या पत्राच्या अनुषंगाने दि. १३ फेब्रुवारी २०२० रोजी जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता आदेश संबंधित नगर परिषदेला प्रदान केला. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबंधितांनी बाकी सोपस्कार पार पडून निविदेद्वारे निवड केलेल्या कंत्राटदारांना दि. ३० मार्च २०२२ रोजी प्रत्यक्षात कामाचे आदेश म्हणजेच वर्क ऑर्डर देण्यात आली. कामाची मागणी करणे, कामाला तांत्रिक मान्यता मिळणे, कामाला प्रशासकीय मान्यता मिळणे व प्रत्यक्षात काम सुरू करण्याबाबत आदेश देणे ह्या सर्व प्रक्रिया सन २०१९-२० ते सन २०२१-२२ या कालावधीत पार पडल्या.

दि. ३० मार्च २०२२ रोजी काम सुरु करण्याबाबतचे आदेश देतांना नगरपरिषद प्रशासनाने कोणत्याही प्रकारे अन्य प्राधिकरणाची ना हरकत किंवा पथदिवे बसविण्या बाबत परवानगी प्राप्त केली नाही. पथदिवे बसविण्याचे काम प्रगती पथावर असताना उपविभागीय अभियंता राष्ट्रीय महामार्ग उपविभाग क्र. १, सा.बां.परिसर अकोला यांनी दि. ०८ जुन २०२२ रोजी पत्र पाठवून संबंधित काम थांबवण्याबाबत सूचना दिल्या. या पत्राच्या अनुषंगाने नगरपरिषद प्रशासनाने वराती मागून घोडे हाकलत दि. १३ जुन २०२२ रोजी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग, अकोला यांना पथदिवे बसण्याकरिता परवानगी मिळणेबाबत पत्र सादर केले. संबंधित प्राधिकरणाने कोणत्याही प्रकारची राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्यावर पथदिवे बसविण्याकरिता नगर परिषद प्रशासन कारंजा (लाड) यांना परवानगी दिली नाही. उलटपक्षी दि. ०५ ऑक्टोंबर २०२३ व दि.१६ ऑक्टोंबर २०२३ रोजी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग अमरावती यांनी पत्राद्वारे 'कारंजा खेर्डा मूर्तिजापूर राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ सी या रस्त्यावर विनापरवानगी लावण्यात आलेल्या पथदिव्यांना काढून टाकण्याबाबत.' सक्त सूचना देऊन, ताकीद दिली. त्यानुसार या रस्त्यावरील लावलेले पथदिव्याचे खांब हटविण्यासाठी दि. २३ जानेवारी २०२४ रोजी ८ लक्ष ३० हजार रुपयांचे कंत्राट देण्यात आले.



राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर पथदिवे लावण्याबाबत संबंधित कंत्राटदाराला काम सुरू करण्याबाबत आदेश दि. ३० मार्च २०२२ रोजी दिल्यानंतर दि. २१ जुन २०२२ ते दि. १७ नोव्हेंबर २०२२ पर्यंत या कालावधीमध्ये संबंधित कंत्राटदारांना कामाच्या स्वरूपात देयक अदा करण्यात आले. अदा करण्यात आलेल्या देयकाची एकूण रक्कमेची बेरीज एक कोटि चौऱ्याहत्तर लक्ष चौदा हजार सहाशे पाच रुपये एवढी आहे. तसेच कारंजा खेर्डा रस्त्यावरील पथदिवे हटविण्यासाठी खर्च केलेले आठ लक्ष रुपये वेगळेच आहे. या प्रकारे जवळपास दोन कोटी रुपयाचा निधी राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील पथदिवे लावण्यासाठी खर्च करण्यात आला, अदा करण्यात आला. परंतु आज रोजी राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर नगरपरिषद प्रशासनाने लावलेल्या पथदिव्यावर एक सुद्धा दिवा लावलेला नाही. संबंधित बाबीची चौकशी केली असता नगरपरिषद प्रशासनाला राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर पथदिवे लावण्याची परवानगी नसल्याची माहिती प्राप्त झाली.

नगरपरिषद प्रशासनाला परवानगी नसताना राष्ट्रीय महामार्गावर पथदिवे उभारण्याकरिता जवळपास २ कोटि रुपयांचा निधी खर्च केला. नगर परिषदेला जनतेच्या सोयी सुविधेसाठी उपलब्ध, प्राप्त झालेल्या निधीचा दुरुपयोग करण्याची परवानगी अधिकार कोणत्या अधिकाराने प्राप्त झाला हा प्रश्न निर्माण होत आहे.

२ कोटि रुपये खर्चून संबंधित रस्त्यावर एकही दिवा नगर परिषद प्रशासनाला लावता आला नाही, हे आजरोजीचे कटू सत्य आहे. जनतेच्या सोयी, सुविधा व विकासासाठी प्राप्त निधीचा दुरुपयोग करण्यास तत्कालीन मुख्याधिकारी, तत्कालीन नगर अभियंता व तत्कालीन विद्युत अभियंता जबाबदार आहे. नगर परिषदेच्या मुख्याधिकारी व नगर अभियंत्याला आपल्या कार्यक्षेत्रामध्ये, अधिकारामध्ये कोणता भाग येतो, कोणता भाग येत नाही या बाबीचे सुद्धा भान नसावे, माहिती नसावी ही आश्चर्यजनक बाब आहे. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ नुसार सत्ता, अधिकार आणि स्थानाचा गैरवापर करणे म्हणजे भ्रष्टाचार आहे. भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा नुसार भारतीय दंडविधानातील कलम १६१, १६५ हे प्रशासकीय भ्रष्टाचाराशी संबंधित आहे. या कायद्यानुसार/कलमानुसार भ्रष्टाचार हा दखलपात्र गुन्हा आहे. तत्कालीन अधिकाऱ्यांनी दोन कोटी रुपयांच्या निधीचा दुरुपयोग करून स्वतःचा आर्थिक फायदा, लाभ घेतल्याची शंका निर्माण होत आहे. संबंधित प्रकरणी सखोल चौकशी होऊन दोषी अधिकाऱ्यांना दंडात्मक शिक्षा व्हायला हवी या प्रकारची चर्चा जनमानसात सुरू आहे. वरिष्ठ अधिकारी या प्रकरणी जनतेच्या मागणीला कितपत दाद देतात, हे बघणे औस्तुक्याचा विषय ठरणार आहे.

## पालखी सोहळ्याच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त करावा – मनीष मंत्री



■ प्रतिनिधी | वाशिम ■

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनांची अंमलबजावणी व्हावी; वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस यंत्रणा सक्रिय होणे अत्यावश्यक**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर भगवान विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्यभरातून लाखो वारकरी दरवर्षी पालख्या घेऊन पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. अशाच प्रकारे काही महत्त्वाच्या पालख्या वाशिम जिल्ह्याच्या हद्दीतूनही जात असतात. या पार्श्वभूमीवर, प्रत्येक पालखी सोहळ्याला सुरक्षा व वाहतूक व्यवस्थेचा योग्य चौक बंदोबस्त करावा, अशी ठाम मागणी भाजपा वाशिम शहराध्यक्ष मनीष मंत्री यांनी वाशिम जिल्हा पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यासंदर्भात स्पष्ट सूचना दिल्या असून, प्रशासनाने त्याची तत्काळ अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. पालखीमध्ये अनेक वेळा २०, ५०, १०० ते ४०० पर्यंत महिला व पुरुष वारकरी सहभागी असतात. हे सोहळे जिल्ह्यातील राज्य महामार्ग, अंतर्गत रस्ते, गावातील मार्गांद्वारे मार्गक्रमण करत असताना अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी, अराजकता, अनुचित घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रत्येक पालखीच्या मार्गावर पोलिस बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण, चौक नजरदारी व वेळेवर कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे.

'कोणतीही अनुचित घटना घडू नये, वारकऱ्यांची सुरक्षितता अबाधित रहावी, हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. पोलिस प्रशासनाने कोणतीही ढिलाई न ठेवता तात्काळ योग्य बंदोबस्त करावा,' असे आवाहन मंत्री यांनी यावेळी स्पष्ट शब्दांत केले.

## राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज अकोल्यात



■ प्रतिनिधी | अकोला ■

**जिल्ह्यातील विकास कामांबाबत आढावा बैठक**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत उद्या (१२ जून) जिल्ह्यातील विकासकामांची आढावा बैठक नियोजनभवनात होणार आहे.

त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : स. ९.३५ वा. शिवणी विमानतळ, अकोला येथे आगमन व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण, जिल्हाधिकारी कार्यालय येथे ९.४५ वा. आगमन, स. १० वा. अकोला व वाशिम जिल्ह्यातील विविध विकासकामे तथा योजनांच्या अंमल बजावणीबाबत जिल्हास्तरीय आढावा बैठक, दु. १२ वा. पत्रकार परिषद, नंतर मोटारीने पक्ष कार्यालयाकडे प्रयाण, दु. १२.३० वा. महानगर कार्यालय, न्यू क्लॉथ मार्केटसमोर, अकोला येथे राखीव, दु. १२.५५ वा. शिवसंभव, कौलखेड रस्ता, नवे आरोग्यनगर, हिंगणा फाटा, अकोला येथे आगमन, दु. १२.५५ ते १.४५ राखीव, दु. १.४५ ते नागरिक व कार्यकर्त्यांच्या भेटी, नंतर पोलीस लॉन्सकडे रवाना, दु. २.३० वा. पोलीस लॉन्स येथे आगमन व कार्यकर्ता मेळावा, दु. ४ वा. खामगावकडे प्रयाण.

## आ.सई डहाके यांचे हस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा नगरपरिषद हद्दीतील विविध भागात ७ कोटी रुपये विकास कामांचे भूमिपूजन कारंजा मानोरा विधानसभा मतदार संघाच्या आमदार सईताई डहाके यांचे हस्ते ८ जून रोजी संपन्न झाले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष नरेन्द्र गोलेच्छा तसेच माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके,भाजपा शहराध्यक्षा प्राजक्ता माहितकर,काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



आम. सईताई डहाके यांचे अथक प्रयत्नातून जिल्हा नियोजन समिती वाशिम अंतर्गत कारंजा नगर पालिका हद्दीतील ७ कोटी रुपयांच्या विकास कामाचा भूमिपूजन सोहळा, त्यांच्या हस्ते रविवार ८ जून रोजी पार पडला.लक्ष्मी नगर मधील संतोष ढाकूलकर घर ले गजानन पवार घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे ४२,३७,४६६ रुपये, सुपलदास नगर मधील गुळदे घर ते देवळे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे ६१,१९,३६५ रुपये, रमाबाई कॉलनी मधील गजानन काजळे घर ते सावंत घर ते दिलीप चव्हान यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे ५८,०३,४४६ रुपये,दत्त कॉलनी येथील देशमुख घर ते ?ड. खंडागळे ते बन्सोड न.प. कॉलनी येथे काँक्रीटरस्ता व नाली बांधकाम करणे ४९,४६,८९० रुपये, महावीर कॉलनी मुर्तीजापूर रोड येथील कथे ते बोरकर यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे ४८, ५३२,६२३ रुपये, महावीर कॉलनी येथील ताठे घर ते डॉ.रवी ठाकरे यांचे घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे ३२.८९,४८० रुपये,महावीर कॉलनी येथील मुंदे घर ते अवघन यांचे घरापर्यंत कॉकीट रस्ता व नाली बांधकाम करणे रुपये,महावीर कॉलनी येथील पांडे घर ते राठोड घर दत्त कॉलनीमध्ये कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे ४०,४३,७७४ रुपये, वनदेवी मंदीर बाय पास येथे सभागृह बांधकाम करणे १६,००,५६९ रुपये, मनवर ते सुधाकर नाईक वैभव लक्ष्मी कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे १४,२२,१८३ रुपये,शिक्षक कॉलनी मधील हनुमान नंदीर ते शिरे सर घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे ३६,८१,५३६ रुपये, मातंगपुरा कारंजा येथे सामाजीक सभागृह बांधकाम करणे १६,३२,९२० रुपये , मंगरूळ वेश ते रामासावजी चौकापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे १,२८,१०,४७९ रुपये,(लक) वेळ दुपारी १:१५ वाजता १४), कारंजा जि. वाशिम येथील मंगरुळ वेश ते शिवाय नमः मठ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे १०,३२,२७१ रुपये, कारंजा नगर परिषद हद्दीतील नगरपरिषद शाळामध्ये शौचालय बांधकाम करणे ६६,२८,३३१ रुपये अशा एकूण ७ कोटी रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन आमदार श्रीमती सईताई प्रकाशदादा डहाके यांचे हस्ते करण्यात आले.यावेळी माजी नगराध्यक्ष नरेन्द्र गोलेच्छा, माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, डॉ.राजीव काळे, उत्तमराव ताथोड,विजय काळे ,भाजपा शहराध्यक्ष प्राजक्ता माहितकर,सविता काळे

अमित संगेवार संदीप कुन्हे तसेच भाजपा पदाधिकारी व महायुती घटक पक्षाचे पदाधिकारी इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.आयोजित भूमिपूजन कार्यक्रमाला महायुतीचे पदाधिकारी व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## निकृष्टआवारभिंतींची तक्रार घेण्यास अधीक्षक अभियंत्यांचा नकार

■ समिर ठाकूर ■

अकोला : गोरक्षण रोडवरील महापारेषण कंपनीच्या अधिनस्थ असलेले १३२ केव्ही उपकेंद्राच्या आवारभिंतीच्या कामात अनियमितता झाली असल्याची रीतसर मुद्देसुद ( स्पीडपोस्टने ) पाठविलेली तक्रार घेण्यास अधीक्षक अभियंता अमरावती यांच्या कार्यालयाने चक्क नकार दिल्याने या आवारभिंत निर्मितीत कनिष्ठ ते वरिष्ठ सर्वांचेच हात ओले असल्याची शक्यता आता बळावली आहे.




याबाबत सविस्तर वृत्त असे की, गोरक्षण रोडवर महापारेषण कंपनीचे १३२ केव्ही चे उपकेंद्र आहे. उपकेंद्र परिसर हे अतिसंवेदनशील प्रकारात मोडत असल्याने याठिकाणी सहज कोणालाही प्रवेश मिळू नये या दृष्टिकोनातून सुरक्षेच्या हेतूने याठिकाणी असलेली आवारभिंत ही उंच करीत त्यावर तार फेन्सिंग करण्याच्या कामाला मुंबई मुख्य अभियंता ( स्थापत्य परिमंडळ ) यांच्या कार्यालयाने कामाला मंजुरात सुद्धा दिली. विशेष म्हणजे आता ही मंजुरात संशयाच्या भोवऱ्यात अडकली असून या आवारभिंतीचे काम करण्यापूर्वी त्याचे कोणते स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले ? त्याचा रिपोर्ट काय ? तो अंदाजपत्रकासोबत जोडण्यात आला काय ? यावर कोणीही बोलण्यास तयार नाही. चार फुटाच्या असलेल्या या जुन्या आवारभिंतीवर थेट आणखीन भिंत बांधून ती तब्बल अकरा फूट उंचीपर्यंत वाढविली आहे. त्या ४० - ५० वर्ष जुन्या झालेल्या जीर्ण भिंती या सदर उभारलेल्या भिंतींचे वजन पेलू तरी शकणार का ? हा फार मोठा यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. तर या सर्व प्रश्नांना अनुसरून स्पीडपोस्टने पाठविण्यात आलेल्या मुद्देसुद तक्रारीला स्वीकारण्यास अमरावती स्थित असलेल्या अधीक्षक अभियंता कार्यालयाने चक्क नकार दिल्याने या प्रकरणात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले असल्याची चर्चा रंगली आहे. तर दुसरीकडे या निविदा आणि कामासंबंधित टाकण्यात आलेल्या माहिती अधिकाराचे सुद्धा उत्तर देण्यात टाळाटाळ करणाऱ्या या अमरावती कार्यालयाच्या पारदर्शकतेवर अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. एकंदरीत या आवारभिंतीच्या कामाचे योग्य ते परीक्षण थर्ड पार्टी ऑडिट करून केल्यास कामाचा दर्जा सुद्धा उघडकीस येणार आहे.

### अपूर्ण कामाचे पूर्णत्व प्रमाणपत्र

*गोरक्षण रोडवरील महापारेषण कंपनीच्या अधिनस्थ असलेले १३२ केव्ही उपकेंद्राच्या आवारभिंतीच्या अपूर्ण कामाचे पूर्णत्व प्रमाणपत्र देण्याच्या प्रताप स्थानिक सहाय्यक अभियंता, अतिरिक्त अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांनी केला आहे. पूर्णत्व प्रमाणपत्र देत या कामाचे देयक सुद्धा कंत्राटदारास अदा करण्यात आल्याने संबंधित अधिकारी वर्गाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून या सर्व कामांची सखोल चौकशी होण्याची मागणी आता करण्यात येत आहे.*

### कार्यकारी अभियंत्यांकडेच अधीक्षक अभियंता पदाचा चार्ज

या कार्यालयाचे कार्यकारी अभियंता सागर जारे यांच्याकडे अधीक्षक अभियंता ( स्थापत्य मंडळ ) असा पदभार असल्याची माहिती आहे. त्यामुळे सदर कामावर देखरेखीचे काम दोन्ही पदाकडून हिरवी झेंडी देण्याचे काम हे एकटे अधीक्षक अभियंता सागर जारे हेच करीत असल्याचे दिसून येते. म्हणूनच सदर कामाप्रकरणी अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयाकडे आलेली तक्रार स्वीकारण्यात आली नसल्याचे बोलले जात आहे.

मलकापूर तालुक्यातील धरणगाव येथील २२० केव्ही उपकेंद्रातील अंतर्गत डांबरी रस्त्याच्या कोट्यावधी रुपयांच्या कामात सुद्धा अश्याच प्रकारची अनियमितता सदर मालपाणी कंत्राटदाराने केली असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून प्राप्त आहे. तर या कामासंबंधीत असलेली सुरक्षा ठेवीची रक्कम सुद्धा कंत्राटदाराला परत करण्यात आली असल्याची माहिती आहे. परिणामी

सदर प्रकरणात बुलडाणा स्थापत्य विभागातील सहाय्यक अभियंता आणि अकोला विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी मोठ्या प्रमाणात मलिदा लाटला असल्याची चर्चा यानिमित्ताने कार्यालय परिसरात रंगली आहे.

## कारंजा नगर पालिकेतील अभियंत्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कारंजा नगर पालिकेत अभियंता म्हणून कार्यरत असलेल्या विजय घुगरे यांच्याविरोधात एका तरुणीने गंभीर आरोप करत वाशिम पोलिस ठाण्यात बलात्काराची तक्रार दाखल केली आहे. त्या तक्रारीवरून अभियंता घुगरे यांचे विरोधात शहर पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपी सध्या फरार असून, पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे.

वाशीम शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, पीडित तरुणीचा आरोप आहे की, २०२२ सालापासून घुगरे यांनी लग्नाचे आमिष दाखवत तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप केला आहे.या प्रकरणी ९ जून २०२५ रोजी वाशिम शहर पोलिसांनी अभियंता विजय घुगरे यांच्याविरोधात भारतीय दंड संहितेच्या (BNS) कलम ११५(२), ३५१ (२,३), ३५२ आणि ६९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक निलेश जाधव करत आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे समजते. पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी विविध ठिकाणी तपास सुरू केला आहे.षनिवृत्तीला काही महिन्याचा कालावधी शिल्लक असताना आंबटशौकीन अभियंता घुगरे यांच्या 'रासलिला ' या प्रकरणाने चव्हाट्यावर आल्याची जिल्हाभरात चर्चा सुरू आहे.अभियंता घुगरे यांना 'या' प्रकरणातून बाहेर काढण्यासाठी त्यांचे लाभार्थी असलेले अनेक समर्थक तन, मन, धनाने पुढाकार घेत असल्याची शहरात चर्चा आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक १९७ ■ गुरुवार, १२ जून २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा वर्ध्यात टायर जाळून प्रहराचा रास्तारोको

## -आंदोलनस्थळी पोलिसांची धावाधाव



**वर्धा जनमाध्यम-** माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी सुरु केलेल्या आंदोलन वेगळे वळणावर असताना, मुख्यमंत्र्यांनी त्याकडे पाठ फिरवली असल्याने, वर्ध्यातील प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून बजाज चौकातील उड्डाण पुलावर टायर जाळत तीव्र रास्तारोको आंदोलन करण्यात आले.यावेळी पोलीस विभागाची मोठ्या प्रमाणात धावाधाव बघायला मिळाली.

शेतकऱ्यांना कर्जमाफी, हमीभाव मिळवा व वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी अमरावती जिल्ह्यातील गुरुकुल मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहेत.अनेकांनी त्या आंदोलनाला पाठींबा दिला आहे.शेतकऱ्यांच्या हिता करिता आंदोलन सुरु असूनही,राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चक्क त्या आंदोलनाकडे पाठ फिरवली असल्याने, वर्ध्यातील प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष विकास दांडगे यांच्या नेतृत्वात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बजाज चौकातील उड्डाण पुलावर टायर जाळत तीव्र आंदोलन करीत रास्तारोको केला.यावेळी आंदोलन होत असताना,जवळपास दीड तास हिंगणघाट व यवतमाळ मार्गावरील वाहतूकीची कोंडी झाली होती. आंदोलनाची माहिती मिळताच, पोलिसांनी धाव घेत आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले.

**आंदोलन स्थळी पोलिसांची धावाधाव**

प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने बजाज चौकातील उड्डाण पुलावर टायर जाळत आंदोलन करण्यात आले असल्याची माहिती मिळताच, शहर पोलीस, एसडीपीवो,स्थानिक गुन्हे शाखा, डी बी पथक व वाहतूक शाखेचे कर्मचारी हजर झाले होते. आंदोलन शेवटच्या टप्प्यात असताना, पोलिसांनी हजेरी लावली. आणि आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले.

**पुलाचा शुभारंभ होण्या आधीच पोलीस विभागाने सुरु केला मार्ग-** आंदोलन सुरु असताना, दीड तास वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे आंदोलनकर्त्यांना पोलीस ठाण्यात पोलीस वाहनाने घेऊन जाण्यासाठी बंद असलेला रस्ता मोकळा करीत त्यावरुन आंदोलनकर्त्यांना घेऊन जाण्यात आले.उड्डाण पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून,लवकरच उद्घाटन करण्यात येणार होते,पण पोलीस विभागाने बंद असलेला मार्ग मोकळा केला. त्यानंतर पुलाचा सुरक्षा रक्षकाकडून पुन्हा मार्ग बंद करण्यात आला.

# घरकुलचे लाभार्थी उपाशी, रेती तस्कर तुपाशी !

## कानगावच्या रेती माफियांची बल्लेबल्ले

**वर्धा जनमाध्यम -** जिल्ह्यातील कापशी घाटातून रेतीची अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची चर्चा आहे. घरकूल लाभार्थ्यांना परवानगीने रेती देणे सुरू असले तरी त्या पावती व्यतिरिक्तही कापशी आणि पोटीच्या घाटातून मोठ्या प्रमाणात वाळूची चोरटी वाहतूक होतांना दिसते. कानगावच्या तस्करांनी टी.पी.पावतीच्या माध्यमातून अधिकाऱ्यांशी संगणमत करुन अर्थात खिसे भरुन रेतीची उचल मोठ्या प्रमाणात करण्याची? सवलत दिल्याची गोपनीय माहिती? आहे.

या भागात रेती माफिया मंडळींनी अनेक जागी ठिय्या मांडल्याचे बोलल्या जाते. खऱ्या गरजू घरकूल लाभार्थ्यांना रेती मिळण्याऐवजी रेती तस्करांनी मनाजोगा भाव मिळत असल्यामुळे रेतीची उचल दुसरीकडेच केल्याचे समजते. महसूल आणि पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे,कीं जाणूनबुजून कानाडोळा केल्या जातो'रामजाने' असे अनेक लाभार्थी म्हणतांना दिसतात,एवढे नक्की!



वर्धा नदीच्या कापशी, पोटी, झगडी घाटातून अवैध रेतीची वाहतूक सर्रास सुरू होती. दरम्यान, महसूल आणि पोलिस प्रशासनाने यावर आळा घातल्याचे सांगितल्या जात आहे. रेतीची वाहतूक रात्री गुपचूप सुरूच असल्याचे थेट दिसते, त्यामुळे रेतीचे भाव वधारलेत ?. परिणामी, घरकूल लाभार्थ्यांना रेती मिळणे दुरापास्त झाले, अनेकांची घरे बांधण्याची स्वप्न स्वप्नच राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने घरकूल लाभार्थ्यांनी रेती उपलब्ध करून द्यावी ,अशी मागणी होत आहे. प्रशासनाने घरकुल लाभार्थ्यांनी रेतीसाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे सुचविले होते. त्या अनुषंगाने लाभार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज सादर करून पावती मिळवली. लाभार्थ्यांना दोन ट्रॅक्टर रेती मोफत देण्याचे फर्मान काढले. परंतु , ट्रॅक्टर मध्ये रेती भरणे आणि वाहतुकीचा खर्च लाभार्थ्यांनाच करावा लागतो.त्यासाठी रेतीची एक ट्रिप ५ हजार पर्यंत पडते. गत आठवड्यात लाभार्थ्यांनी रेतीची उचल केली. परंतु रविवार आणि सुट्टीचे दिवस वगळून, पाऊस असल्यामुळे काही दिवस त्यात खंड पडला. गेले त्यामुळे या सर्कलमधील घरकुल लाभार्थ्यांना अद्यापही रेती मिळू शकली नाही. प्रशासनाने रेतीची उचल थांबवल्यामुळे अनेक घरकुल लाभार्थी टी पी पावती असूनही रेती पासून वंचित आहे. त्यांना रेती कधी मिळणार ? असा प्रश्न कायम आहे. रेती वाटपाच्या वेळी काही ट्रॅक्टर चालकांनी महसूल प्रशासनाला हाताशी धरून टी.पी पावती न खतावता रेतीची उचल केली असे बोलल्या जाते.काही घाटातून घरकुल लाभार्थ्यांना रेती न देता दुसऱ्यांनाच विकल्याचे समजते.त्यात कानगाव सर्कलमधील रेतीमाफीयांनी मोठी कमाई केल्याचे चर्चेत आहे.

घरासमोर रेती घर मालकावर करा गुन्हा दाखल

राज्य शासनाच्या रेती निर्मिती धोरणाच्या शासन निर्णयाने घरकुल लाभार्थ्यांना रेती मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी शासन दरबारी येत आहे, मात्र शासन याकडे दुर्लक्ष करीत रेतीमाफीयाला सहकार्य करीत असल्याचे निर्दनास आले आहे, जिल्हाधिकारी मॅडम आपण रेती माफिया विरोधात कारवाई न करता ज्यांच्या घरासमोर रेती दिसते त्या घरमालकावर गुन्हा दाखल करा जेणेकरून पुन्हा घरमालकच रेती बोलवणार नाही तर रेती माफीयाची रेतीच जाणार नाही,

# ॲलोपॅथिक दवाखान्याला आग, लाखोंचे नुकसान

## -शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज





**तळेगाव (श्या. पं.) जनमाध्यम :** भारसवाडा येथील ॲलोपॅथिक दवाखान्याला आग लागून लाखोंचे नुकसान झाले. ही घटना मंगळवारी रात्री १० वाजताच्या सुमारास घडली. शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत दवाखान्यातील कुलर, खिडया, पडदे, इलेट्रिक फिटिंग, वॉटर कूलर, पंखे, खुर्च्या जळून खाक झाल्या. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. आष्टी येथील अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करीत आग आटोयात आणली. पोलिसांनी घटनास्थळी तत्काळ धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. नवनियुत जिल्हा आरोग्य अधिकारी बेले यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सोबत घेऊन घटनास्थळाची पाहणी केली.

# वर्धा जिल्ह्यातील महसूल विभागाच्या प्रश्नांवर आज मुंबईत बैठक

## आज महसूल मंत्री यांच्या दालनात होणार बैठक

**वर्धा जनमाध्यम :** महसूल विभागाअंतर्गत प्रलंबित असलेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी पालकमंत्री यांच्या पुढाकारातून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आज गुरुवार दि १२ जून रोजी मुंबई येथे सायंकाळी ४.३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

अनेक वर्षांपासून महसूल विभागांतर्गत अनेक प्रश्न प्रलंबित असल्याने नागरिकांच्या सतत तक्रारी पालकमंत्री यांना प्राप्त होत आहे. सदर प्रकरणे राज्य शासनाशी संबंधित असल्याने पालकमंत्री यांनी त्या अनुषंगाने बैठकीसाठी पुढाकार घेतला होता. बैठकीला महसूल व वन विभागाचे अधिकारी तसेच नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी उपस्थित राहणार आहे. तसेच स्थानिक स्तरावरील महसूल विभागाचे अधिकारी देखील व्हीसी द्वारे बैठकीत सहभागी होतील. बैठकीत जिल्ह्यातील फ्लॅट धारकांना फ्लॅटनिहाय वरटिकल सातबारा, वर्धा शहरातील रामनगर येथील निवासी भूखंडधारकांचे भूखंड नियमाकुल करून त्यांना पट्ट्यांचे वाटप, वर्धेतील साने गुरूजी नगर येथील जुना सर्वे क्र. २१३ व नवीन सर्वे क्र. ५३ च्या भूखंडधारकांचे भूखंड गुंठेवारीत नियमाकुल करणे, गजानन नगरी अंतर्गत प्लॉट घेतलेल्या शहरी व ग्रामीण भागातील भूखंड धारकांना नियमाकुल करून सातबारा पुर्नरूज्जीवित करून देणे, सावंगी मेघे येथील सर्व्हे क्र. मधील ०.४० हेक्टर आर गुंठेवारी प्रकरण तसेच अन्य प्रलंबित प्रश्नांवर बैठकीत चर्चा होणार असून यावर तोडगा करण्यासंदर्भात विवार विनिमय करण्यात येणार आहे.

# काकरमल येथे शेतकऱ्याने घेतला गळफास

**धारणी/प्रतिनिधीः-** काकरमल गावातील मानसू बाटू बेठेकर (वय ४५) या शेतकऱ्याने आज बुधवारी ११ जून रोजी सकाळच्या सुमारास घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.



मिळालेल्या माहितीनुसार, मानसू बेठेकर हे सकाळी नेहमीप्रमाणे शेतावर गेले होते. काही वेळाने ते घरी परतले आणि काही क्षणातच त्यांनी घरात गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना उघडकीस येताच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्राथमिक माहितीनुसार, सततची नापिकी, वाढते कर्जबाजारीपण, आणि आर्थिक अडचणी या कारणांमुळे त्यांनी आत्महत्या केली असावी, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. पोलीस पाटीलांनी घटनेची माहिती संबंधित प्रशासन व पोलिसांना दिली असून पुढील तपास सुरू आहे.

या घटनेने गावात शोककळा पसरली आहे. सरकारने अशा शेतकरी आत्महत्यांच्या घटना गांभीर्याने घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन देण्याच्या पालकमंत्र्यांच्या सूचना



**वर्धा जनमाध्यम :** राज्य शासनाच्या दि.८ एप्रिल २०२५ तसेच ३० एप्रिल २०२५ च्या वाळू, रेती निर्गती धोरणाच्या शासन निर्णयान्वये घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच ब्रास रेती मोफत वाटप करावयाची आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केल्या.

जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांना बांधकामासाठी तसेच इतर स्थानिक वापरासाठी वाळू उपलब्ध करुन देण्याकरीता व वाळू धोरण योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थी व जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने जनजागृती होण्याकरीता करीता पालकमंत्री डॉ.भोयर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या.

जिल्ह्यात स्थानिक वापरासाठी ६१ वाळूगट राखीव ठेवण्यात आलेले असून त्याद्वारे स्थानिक तसेच घरकुल लाभार्थ्यांना १४ हजार २१८ ब्रास वाळू उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार ९४३ लाभार्थ्यांना ४ हजार ४५० ब्रास वाळू उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच उर्वरीत १० हजार ३०२ लाभार्थ्यांना ३५ हजार २३ ब्रास वाळू शासन निर्णय दि.३० एप्रिल २०२५ प्रमाणे वितरीत करण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ.भोयर यांनी दिले. बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, उपवन संरक्षक हरविर सिंह, उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे, जिल्हा खनिकर्म अधिकारी श्रीकांत शेळके व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका

# पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी नियोजन करा- राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक तयारीचा आढावा**

**वर्धा जनमाध्यम :** आगामी काळात होणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व नगर पालिकांच्या निवडणूका पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी व मतदारांना मतदान केंद्रावर उत्तम सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी चांगले नियोजन करा, अशा सूचना राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर पालिका निवडणूक तयारीच्या आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ३१६ ग्रामपंचायती तसेच पंचायत समिती, जिल्हा परिषद व ६ नगर परिषदेच्या निवडणूका घेण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने आढावा घेण्यात आला. बैठकीला जिल्हाधिकारी वान्मथी सी., ग्राम पंचायत निवडणूक प्राधिकारी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीपती मोरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी अनील गावीत, वर्धाचे उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे, आर्वीचे विश्वास शिरसाट, हिंगणघाटचे आकाश अवतारे, नगर पालिका प्रशासन अधिकारी सौरभ कावळे, परिविक्षाधिन उपजिल्हाधिकारी विनायक पाटील, वर्धेचे मुख्याधिकारी विजय देशमुख तसेच सर्व तालुक्याचे तहसिलदार उपस्थित होते.

ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रातील प्रभाग रचना २०११ च्या जनगणनेच्या आधारावर होणे आवश्यक असून निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ईव्हीएम मशीनची उपलब्धता करुन ठेवावी. आवश्यकता पडल्यास निवडणूक आयोगाकडून किंवा इतर राज्यातून उपलब्ध करुन घ्याव्यात. निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार एक किंवा दोन टप्प्यात निवडणूक कार्यक्रम घेण्यात येईल, असेही यावेळी दिनेश वाघमारे यांनी सांगितले.

महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती औद्योगिक नगरी अधिनियमांतर्गत नगर परिषद व नगर पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी २०११ च्या जनगणनेनुसार सदस्य संख्या व प्रभाग रचना करावी, अशाही सूचना यावेळी दिनेश वाघमारे यांनी केल्यात.

# पेरण्याची घाई करू नये, कृषी विभागाचा सल्ला

## -१५ जुननंतरच मोसमी पाऊस सक्रीय होण्याचा अंदाज

**वर्धा जनमाध्यम :** राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. तर राज्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून, शेतकरी मच्छिमार बांधवांनी दक्षता घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

'राज्यातील सर्व भागात पंधरा जून नंतर मोसमी पाऊस सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पंधरा जून नंतरच पावसाची मार्गक्रमण होण्यासाठी सक्रिय वातावरण निर्मिती होण्याची शक्यता आहे. राज्यातील सतरा जिल्ह्यात पंचवीस टक्के पेक्षा कमी, बारा जिल्ह्यात पंचवीस ते पन्नास टक्के, चार जिल्ह्यांत पन्नास ते पंच्याहत्तर टक्के तर एका जिल्ह्यात शंभर टक्के हुन अधिक पाऊस झाला आहे. राज्यातील विविध विभागांत खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेखा साठा उपलब्ध आहे.

**मोसमी पाऊस तीन चार दिवसांत सक्रिय**

मोसमी पाऊस येत्या तीन ते चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे. दक्षिण व्दीपकल्पीय भारताच्या भूभागातील कर्नाटकात १२ ते १५ जून दरम्यान आणि कोकण आणि गोवा येथे १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पहण्याची शक्यता आहे, अशी माहिती वेधशाळेने सांगितले, मोसमी कापसाच्या मार्गक्रमणासाठी अनुकूल वातावरण निर्मिती होण्याची शक्यता येत्या तीन ते चार दिवसांत आहे. त्यानुसार मध्य महाराष्ट्रात बारा जून रोजी मराठवाडातील काही भागात बारा ते चौदा जून दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा येथे बारा आणि पंधरा जून दरम्यान मुसळधार तर १३, १४ जून रोजी अति मुसळधार पाऊस पहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात १३ ते १५ जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. वीजांच्या गडगडाटांसह वादळ होत असताना खुल्या मैदानावर काम करु नये, वीजा होताना झाडांच्या खाली आशरा घेऊ नये, वीजेची आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे वीज पुरवठा खंडित करून ठेवावीत, ओढा, तलाव, नदी आदी पाण्याच्या खोतातून तरकाळ बाहेर पडावे, वीज वहन करणाऱ्या सर्व वस्तूंपासून दूर राहावे, अशा सूचना यांनी केल्या.

# रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त पंच परिवर्तनावर काम करूः सौरभ लांडगे

## पत्रकारांशी औपचारिक संवाद

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे शताब्दी वर्ष असून सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी शताब्दी वर्षानिमित्त पंच परिवर्तन सांगितले आहे. त्यामुळे या शताब्दी वर्षात विविध उपक्रम राबविण्यात येणार असून सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, स्वदेशी आणि नागरिकत्वाचे वेध या पंच परिवर्तनावर स्वयंसेवक काम करणार असल्याची माहिती रा. स्व. संघाचे अमरावती विभाग प्रचार प्रमुख सौरभ लांडगे हे ११ जून रोजी स्थानिक मदन मोहन धर्मशाळेत पत्रकारांशी औपचारिक संवाद साधताना बोलत होते. यावेळी अमरावती महानगर प्रचार प्रमुख केदार गोगरकर, नगर संघचालक डॉ. प्रसाद देशमुख, नगर कार्यवाह अक्षय शिंगरूप, सार्थक आहुजा, हिरेन जानी उपस्थित होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने सहा उत्सव साजरे करण्यात येतात. या उत्सवातून राष्ट्रीयत्त्व जागविण्याचे काम करण्यात येते. वर्धा जिल्ह्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ८४ शाखा आहेत. वर्धा नगरमध्येही वेगवेगळ्या शाखा आहेत. सध्या व्यस्ततेत वाढ झालेली आहे. त्यामुळे शाखांमध्येही बदल झालेले आहेत. सामाजिक बदलाच्या माध्यमातून सामाजिक बदलांचा प्रयत्न करण्यात येतो. मात्र, झाडं जेवढी महत्त्वाची तेवढाच मानव विकासही महत्त्वाचा असतो, असेही सौरभ लांडगे म्हणाले.


## जाहीर नोटीस

माझे पक्षकार श्री सुमित प्रकाशराव वाघमारे हे मौजा सेलू तहसील सेलू जिल्हा वर्धा नगरपंचायत सेलू मौजा क्रमांक १६७ पह क्रमांक १५ शेत सर्वे क्रमांक १३१ जुना व नवीन ८३ मधील सँक्शन प्लॉट क्रमांक दोन ज्याचा एरिया ४१ .८०चौरस मीटर चे मालक आहात सदर मालमत्तेची चतुर सीमा येणेप्रमाणे पूर्वेस मुख्य सिमेंट रोड पश्चिमेस दत्ता मेघे ग्रामीण रुग्णालय उत्तरेस बालाजी कृषी केंद्र दक्षिणेस सिंधी खरेदी सहकारी संस्था .माझ्या पक्षकाराने सदर मालमत्ता श्रीकृष्ण मारोतराव चापले यांच्याकडून दिनांक ०४.०४.२०१९ रोजी दस्त क्रमांक ५८३ /२०१९अन्वय विकत घेतली आहे .माझ्या पक्षकाराकडून सदर मालमत्तेची मूळ मूळ लिंक विक्रीपत्र दिनांक २०.०२.१९९० दस्त क्रमांक १६२ /१९९०व मूळ लिंक विक्रीपत्र दिनांक ३०.११.१९८४दस्त क्रमांक ५४ ,/१९८४ हरवले आहे .माझ्या पक्षकाराने सदर मालमत्तेचा विकण्याचा सौदा अक्षय भारतराव मस्के यांच्यासोबत केलेला आहे तसेच श्री मस्के यांनी टाटा कॅपिटल हाउसिंग इथे कर्जासाठी अर्ज केला आहेकरिता सदर नोटीस द्वारे आपल्या सर्व जनतेस तसेच शासकीय निम शासकीय कार्यालयास सुचित करण्यात येते की जर कोणालाही उपरोक्त कामात काही उजर असल्यास किंवा वरील ओरिजनल सेलडीड मिळून आल्या ते त्यांनी खालील पत्त्यावर नोटीस प्रकाशित झाल्याच्या सात दिवसात कळवावे अन्यथा त्यानंतर कोणताही आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही,

ठिकाण - वर्धा

ॲड. आर. आर. तिवारी रामनगर वर्धा.

मो, नं. ९९२२४२६१६८

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# ठाकरे बंधू सोबत येणार?

## महायुतीची धाकधूक वाढली; मुकाबला करण्यासाठी रणनीती ठरली

**मुंबई-** ठाकरे बंधू एकत्र येण्याची चर्चा सुरु असताना महायुतीच्या गोटातून महत्त्वाची बातमी येत आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ठाकरे ब्रँड धोक्यात आलेला आहे. त्यातच आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधीही लागण्याची शक्यता आहे. ठाकरे ब्रँड टिकवण्यासाठी दोन्ही बंधू सोबत येऊ शकतात. तशी चर्चा गेल्या दीड महिन्यांपासून सुरु आहे. त्यामुळे मुंबईत ठाकरेंचा मुकाबला करण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी कंबर कसली आहे.

मुंबई महापालिकेवरील वर्चस्व कायम राखण्यासाठी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे जोरदार प्रयत्न सुरु आहेत. विधानसभा निवडणुकीत दणका बसल्यानंतर उद्धव यांनी राज यांच्यासोबत जुळवून घेण्याचे संकेत दिले आहेत. विशेष म्हणजे दोन्ही बंधूंनी मनोमिलनाच्या दृष्टीनं सकारात्मक विधानं केलेली आहेत. त्यामुळे मुंबईत शिवसेना उबाठा आणि मनसे यांच्या युतीची शक्यता वाढली आहे. ही घडामोड पाहता महायुतीनं त्यांना टक्कर देण्यासाठी रणनीती



आखली आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्यास त्याचा सर्वाधिक परिणाम मुंबईत दिसू शकतो. त्यामुळे महायुती मुंबई महापालिकेत सोबत लढण्याची शक्यता आहे. तशा हालचाली महायुतीच्या गोटात सुरु झालेल्या आहेत. ठाकरे बंधू एकत्र आल्यास मराठी मतदारांमध्ये भावनिक लाट निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत महायुतीमधील तिन्ही पक्ष सोबत आल्यास मराठी, उत्तर भारतीय मतांचं विभाजन होऊ शकतं. हे मत विभाजन टाळण्यासाठी महायुती मुंबईत एकत्र लढू शकते.

मुंबईत ठाकरे बंधूंचा एकत्र मुकाबला करायचा आणि अन्य महापालिकांमध्ये स्वबळ आजमावून पाहायचं, या रणनीतीवर महायुतीच्या गोटात काम सुरु आहे. ठाण्यात शिंदेंच्या शिवसेनेचं, पुणे, नागपूर, नवी मुंबईत भाजपचं वर्चस्व आहे. या शहरांमध्ये दोन्ही ठाकरेंची फारशी ताकद नाही. यामुळे या महापालिकांमध्ये महायुतीमधील तिन्ही पक्ष स्वबळावर लढू शकतात. मुंबईत दोन्ही ठाकरे एकत्र आल्यास तब्बल ५२.१ टक्के मतदार त्यांच्या बाजूनं कौल देऊ शकतात, असं विकली वाईबचा सर्व्हे सांगतो. ठाकरे बंधूंची युती झाल्यास शिंदेंच्या शिवसेनेला २६.२ टक्के मतदार मतदान करु शकतात, अशी आकडेवारी सर्व्हेतून समोर आलेली आहे.

## संक्षिप्त

### श्रीमंत देशांच्या यादीत भारत चौथ्या स्थानी

**मुंबई-** हिंदुस्थानची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरत आहे. श्रीमंत लोकांच्या संख्येच्या बाबतीतही देशाने मोठी झेप घेतली आहे. नाईट फ्रँकच्या ग्लोबल वेल्थ रिपोर्ट-२०२५ मध्ये श्रीमंत देशांची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यात हिंदुस्थान चौथ्या क्रमांकावर आहे. या अहवालात प्रॉपर्टी कन्सल्टिंग फर्मने म्हटले आहे की हिंदुस्थान जागतिक संपत्ती केंद्र म्हणून उदयास येत आहे. देशातील श्रीमंत व्यक्तींची संख्या ८५,६९८ वर पोहोचली आहे. त्यामुळे श्रीमंत लोकांच्या संख्येबाबत हिंदुस्थान जगात चौथ्या क्रमांकावर आला आहे.अहवालानुसार आता श्रीमंत लोकांच्या संख्येच्या बाबतीत हिंदुस्थानच्या पुढे तीन देश आहेत. त्यात अमेरिका पहिल्या क्रमांकावर आहे, तर चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे. जपान तिसऱ्या क्रमांकावर आहे. देशातील श्रीमंत लोकांची संख्या सतत वाढत आहे. नाईट फ्रँकचा नवीन अहवाल याचे एक उदाहरण आहे. हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेची गती अशीच कायम राहिली तर २०२८ पर्यंत देशातील अतिश्रीमंत व्यक्तींची संख्या HNWIs ९३,७५८ पर्यंत वाढण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. अब्जाधीशांच्या बाबतीत हिंदुस्थान जगात चौथ्या क्रमांकावर आला आहे. देशातील अब्जाधीशांची संख्याही अनेक मोठ्या देशांपेक्षा जास्त आहे. अहवालानुसार २०२४ मध्ये, जेथील अब्जाधीशांची संख्या १९१ वर पोहोचली आहे, ज्यामध्ये वार्षिक आधारावर १२% वाढ झाली आहे आणि या अब्जाधीशांची एकत्रित संपत्ती ९५० डॉलर अब्ज आहे.



### सौदीने केला भारतासह १४ देशांचा वर्क व्हिसा ब्लॉक

**नवी दिल्ली-** सौदी अरबने १४ देशांचा वर्क व्हिसा निलंबित केला आहे. यामध्ये हिंदुस्थानचासुद्धा समावेश आहे. सौदीमध्ये सध्या हज यात्रा सुरू असल्याने सौदी सरकारने हा निर्णय घेतला आहे. हा वर्क व्हिसा तात्पुरत्या स्वरूपात निलंबित करण्यात आल्याची माहिती सौदी सरकारने दिली आहे. हा निर्णय ३० जूनपर्यंत लागू असणार आहे. या निलंबनामुळे बांधकाम, आतिथ्य, घरगुती सेवा यांसारख्या क्षेत्रांवर अवलंबून असलेल्या विदेशी कामगारांवर आणि सौदीमधील कंपन्यांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. ब्लॉक वर्क व्हिसा ही सौदी अरेबियातील कंपन्यांना मोठ्या संख्येने विदेशी कामगार नियुक्त करण्यासाठी मंजूर केलेली कोटा आधारित परवानगी आहे. १४ देशांमध्ये भारत, पाकिस्तान, बांगलादेश, इजिप्त, इंडोनेशिया, जॉर्डन, येमेन, सुदान, इराक, इथियोपिया, नायजेरिया, लिबिया, केनिया आणि तुर्की यांचा समावेश आहे.



### मस्क यांना पुन्हा टेस्लाने तारले! संपत्ती पोहोचली ३५६ अब्जांवर



**अमेरिका-** अमेरिकेतील उद्योगपती एलॉन मस्क आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात तणाव निर्माण झाल्याने मस्क हे आता देशोधडीला लागतील असे बोलले जात होते, परंतु ट्रम्प यांच्या वादानंतरसुद्धा मस्क यांच्या संपत्तीत वाढ होत आहे. मस्क यांच्या मालकीच्या टेस्ला कंपनीचे शेअर्स ५ टक्क्यांनी वाढल्याने मस्क यांच्या संपत्तीत १३.९ अब्ज डॉलर्सची वाढ झाली आहे. ब्लूमबर्ग बिलिनेयरच्या माहितीनुसार, मस्क यांची संपत्ती आता ३५६ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. या वर्षी त्यांच्या संपत्तीत ७६.२ अब्ज डॉलरची घसरण झाली आहे. टेस्ला ९९३.९२ अब्ज डॉलर मार्केटकॅपसोबत जगातील सर्वाधिक व्हॅल्युबल ऑटो कंपनी आहे, तर जगातील सर्वात जास्त टॉप व्हॅल्युबल कंपन्यांच्या यादीत ११ व्या नंबरवर आहे. मायक्रोसॉफ्ट ३.५१३ ट्रिलियन डॉलरसह जगातील सर्वात जास्त व्हॅल्युबल कंपनी आहे. यानंतर एनवीडिया ३.४७८ ट्रिलियन डॉलर, अॅपल ३.०४५ ट्रिलियन,अॅमेझॉन २.३०३ ट्रिलियन डॉलर आणि गुगलची पॅरेंट कंपनी अल्फाबेट २.११४ ट्रिलियन संपत्ती आहे. मेटा प्लॅटफॉर्म, सौदी अरामको, ब्रॉडकॉम, टीएसएमसी आणि बर्कशायर हॅथवे या कंपन्या आघाडीवर आहेत.

## निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची स्टॉकहोममध्ये द्विपक्षीय बैठक


**मुंबई-** भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी १० ते १२ जून २०२५ दरम्यान स्वीडनमध्ये होणाऱ्या इंटरनॅशनल आयडिया स्टॉकहोम परिषद : निवडणूक प्रामाणिकतेवर आधारित परिषद दरम्यान विविध देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्था प्रमुखांशी महत्त्वपूर्ण द्विपक्षीय बैठकांमध्ये चर्चा केली. या बैठका भारताच्या निवडणूक व्यवस्थापन व लोकशाही सहकार्य या क्षेत्रातील दीर्घकालीन भागीदारी अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरल्या आहेत.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी अनेक देशांच्या निवडणूक प्रमुख व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत विविध निवडणूक अनुभव, नवोन्मेष आणि सहकार्यावर चर्चा केली.याच सत्रात, संध्याकाळी त्यांनी या परिषदेमध्ये उद्घाटनपर भाषण देऊन संमेलनाचे औपचारिक उद्घाटन केले.

या आंतरराष्ट्रीय संवादांमुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, समावेशकता आणि नवोन्मेषासाठी जागतिक स्तरावर सहयोगाची नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे, असे भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले आहे.

## वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणाची विधीमंडळात दखल

**मुंबई-** वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणाची आता राज्य विधिमंडळानेही गंभीर दखल घेतली आहे. हगवणे प्रकरण आता विधिमंडळाच्या महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीपुढे गेले असून नुकतीच या समितीपुढे या प्रकरणाची प्रथम सुनावणी झाली. ही माहिती सूत्रांकडून महाराष्ट्र टाइम्सला प्राप्त झाली आहे. विशेष म्हणजे, या सुनावणीत राज्याच्या महिला बालविकास विभागासह, राज्याच्या पोलिस महासंचालक आणि गृह विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात आली असल्याचे सूत्रांनी म्हटले आहे. दरम्यान, यासंदर्भात संबंधितांना सविस्तर



अहवाल सादर करण्याची सूचना समितीने केल्याची माहिती पुढे आली आहे. वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाचे पडसाद राज्यभरात उमटले आहेत. या प्रकरणानंतर महिला आयोगाच्या कारभारावरही ताशेरे ओढले जात आहेत. तर विरोधकांनी या प्रकरणी राज्यपाल दरबारीही दाद मागितली होती. त्यानंतर आता हे प्रकरण राज्य विधिमंडळाच्या समितीपुढेही ठेवण्यात आले आहे. विधिमंडळाच्या महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीच्या अध्यक्ष चित्रा वाघ यांच्या अध्यक्षतेखाली समितीपुढे या प्रकरणाची सुनावणी नुकतीच विधान भवनात पार पडली. या सुनावणीत पोलिस महासंचालकांसह इतर साक्ष पूर्ण झाल्याची माहिती पुढे आली आहे. प्रकरणात निलेश चव्हाणला न्यायालयीन कोठडी; नेपाळ सीमेवरून पोलिसांनी आवळल्या होत्या मुसक्या या सुनावणीत राज्य सरकारच्या महिला विभागाचे सचिव अनुपकुमार यादव यांचीही साक्ष घेण्यात आल्याचे कळते. पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांचीही साक्ष या सुनावणीदरम्यान पूर्ण झाली आली असून राज्य महिला आयोगाचे सचिवांचीही साक्ष घेण्यात आल्याचे कळते. या समितीपुढे असलेल्या प्राथमिक अहवालावर ही साक्ष पूर्ण करण्यात आली असून या प्रकरणी प्रकरणी सर्व संबंधितांनी सविस्तर अहवाल सादर करण्याची सूचना करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी सुनावणीत याबाबत गृह विभागासोबत महिला आयोग सविस्तर अहवाल सादर करण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## अल कायदाची अमेरिकेला खुली धमकी

### ट्रम्प, मस्क आणि जेडी व्हान्स हिट लिस्टवर

**अमेरिका-** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांमुळे ते वादग्रस्त ठरत आहेत. तसेच अमेरिकेतही त्यांच्या धोरणांविरोधात निदर्शने करण्यात येत आहेत. आता ट्रम्प हे दहशतवाद्यांच्याही हिट लिस्टवर आले आहेत. अल कायदा या दहशतवादी संघटनेने अमेरिकेला खुली धमकी दिली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, अब्जाधीश उद्योगपती अलॉन मस्क आणि उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांना मारण्याची धमकी देणारा व्हिडिओ अल कायदाने प्रसिद्ध केला आहे. अल कायदाचा म्होरक्या साद बिन आतिफने ही धमकी देणारा व्हिडिओ बनवला आहे.

पुन्हा एकदा अमेरिका अल कायदाच्या निशाण्यावर आहे आणि दहशतवादी नेते साद बिन आतिफने ही धमकी दिली आहे. यावेळी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, उपाध्यक्ष जेडी व्हान्स आणि उद्योगपती एलोन मस्क अल कायदाच्या हिट लिस्टवर आहेत. त्यांनी एक व्हिडिओ बनवला आहे आणि त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. साद बिन आतिफ हा अल कायदाच्या वरिष्ठ



कमांडरपैकी एक आहे. त्यांनी त्यांच्या दहशतवाद्यांसह अमेरिकन मुस्लिमांना या तीन हाय प्रोफाइल व्यक्तींना मारण्याचे आवाहन केले आहे. व्हिडीओमध्ये साद बिन आतिफ डोनाल्ड ट्रम्प यांना उघडपणे धमकी देताना दिसत आहे. 'जर आम्ही जागे झाले तर तुम्ही वाचणार नाहि' अशी धमकी त्याने दिली आहे.

अमेरिकन मुस्लिमांना आणि त्यांच्या साथीदारांना सांगत आहे की अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, उपराष्ट्रपती जेडी व्हान्स आणि एलॉन मस्क दिसतील तिथे त्यांना गोळ्या घाला. अमेरिकेत मुस्लिमांची संख्या इतकी वाढली आहे की जर ते जागे झाले तर हे तिघेही वाचू शकत नाहीत. यासोबतच, तो इतर देशांच्या मुस्लिमांना या युद्धात त्याला पाठिंबा देण्यास सांगत आहे.अल कायदाच्या या दहशतवादी कमांडरचे नाव साद मोहम्मद आतिफ उर्फ साद बिन आतिफ अल-अवलाकी आहे. तो अल

## एका ताटात जेवलो हे कधीही विसरणार नाही!

### सुप्रिया सुळेंचा अजित पवारांना टोला

**बारामती-** 'पक्षवाढीसाठी प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे आहे. ज्यांनी कधी ना कधी आपल्यासोबत काम केले आहे, त्यांची जाणीव माणसाने आयुष्यात नेहमी ठेवली पाहिजे. त्यांच्यावर थेट टीका करत नसल्याचा आरोप केला जातो. मात्र, चार निवडणुकांपैकी तीन वेळा त्यांनी मला मदत केली आहे. एका निवडणुकीत त्यांनी विरोध केला. आम्ही एका ताटात जेवलो. ते हे विसरले असतील; पण माझ्यावर संस्कार आहेत, हे मी कधीही विसरणार नाही,' असा टोला खासदार सुप्रिया सुळे यांनी नाव न घेता अजित पवारांना लगावला. ज्यांनी जो मार्ग निवडला आहे, त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित मेळाव्यात सुळे बोलत होत्या.आजही राष्ट्रवादी ही शरद पवार यांची सांगितली जाते आणि हे वास्तव असल्याचे सांगत सुप्रिया सुळे म्हणाल्या, 'पक्षाची स्थापना आणि गेल्या २६ वर्षांचा प्रवास हा सर्वांच्या कष्टाने झाला आहे. यश-अपयश हे प्रत्येकाच्या आयुष्यात येते, त्यामुळे हतबल होण्याची गरज नाही. आज येथे उपस्थित असणारे आणि नसणारे असे असंख्य कार्यकर्ते आहेत, ज्यांचे पक्षबांधणीत मोठे योगदान आहे. शरद पवार यांनी संघटना कशासाठी उभी केली, याची विचारधारा आपल्याला माहीत असायला हवी. आपले अंतिम लक्ष्य फक्त सत्ता मिळविणे आहे की, सामान्य जनतेची सेवा करणे आहे, याचा विचार महत्त्वाचा आहे.' 'देशाच्या धोरणनिश्चितीमध्ये पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सत्ता येत-जात राहील, पण देशाच्या धोरणनिर्मितीमध्ये काम करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. पक्षाची विचारधारा काय आहे, हे समजावून सांगण्यासाठी दर महिन्याला कार्यशाळा आयोजित केली जाईल,' असेही त्यांनी सांगितले. पुढील महिन्यापासून राज्यभर दौरा करणार असल्याची घोषणा सुळे यांनी यावेळी केली.

## भारत-पोर्तुगाल पुनर्प्रस्थापित राजनैतिक संबंधांना ५० वर्षे पूर्ण

**मुंबई-** पोर्तुगाल व भारताचे संबंध ऐतिहासिक आहेत. मात्र पोर्तुगालने आता भविष्यावर लक्ष केंद्रित केले असून भारताशी व्यापारासह विविध क्षेत्रात सहकार्य वाढवणार आहे. या संदर्भात पोर्तुगाल महाराष्ट्राशी देखील सहकार्य करार करण्याबाबत उत्सुक आहे, अशी माहिती पोर्तुगाल प्रजासत्ताकाचे भारतातील राजदूत जोओ मॅन्युएल मेंडिस रिबेरो डी अल्मेडा यांनी येथे दिली.

राजदूत रिबेरो डी अल्मेडा यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची सोमवारी (दि. ९ जून) राजभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. पोर्तुगालचे मुंबईतील मानद वाणिज्यदूत कॅप्टन सोमेश बत्रा हे देखील बैठकीला उपस्थित होते.यंदाचे वर्ष भारत - पोर्तुगाल देशांसाठी विशेष महत्वाचे असून उभय देशांमधील पुनर्स्थापित राजनैतिक संबंधांना ५० वर्षे पूर्ण होत असल्याचे सांगून भारत व पोर्तुगाल देशांमध्ये व्यापार, पर्यटन, वस्त्रोद्योग, माहिती तंत्रज्ञान आदी क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढविण्याबद्दल प्रयत्न सुरु असल्याचे राजदूतांनी सांगितले. आपल्या मुंबई भेटीत आपण शंभराहून अधिक उद्योग प्रतिनिधींना भेटणार असल्याचे राजदूतांनी सांगितले.पोर्तुगालमध्ये सव्वा लाख भारतीय लोक राहत असून ते तेथील समाजाशी एकरूप झाले आहेत. भारतीय लोकांकडे विविध कौशल्ये असून आपल्या देशाला आज कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

स्कॅन्डिनेव्हियन देशास पोर्तुगाल जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वाधिक सुरक्षित देश असल्याची माहिती देताना पर्यटनाच्या बाबतीत पोर्तुगाल आघाडीवर असल्याचे रिबेरो डी अल्मेडा यांनी राज्यपालांना

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने नागपूरमध्ये मोबाइल मेडिकल युनिट्सद्वारे मोफत आरोग्य सेवा सुरू

**मुंबई-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर शहरातील दुर्लक्षित भागांतील नागरिकांसाठी एक दिलासादायक आरोग्य सेवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यासाठी सॅनोफी इंडिया लिमिटेड, नागपूर महानगरपालिका आणि पिरामल स्वास्थ्य व्यवस्थापन व संशोधन संस्था (पीएसएमआरआय) यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार होऊन दोन मोबाइल मेडिकल युनिट्स (एमएमयू) कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

हा उपक्रम सॅनोफीच्या सामाजिक उत्तरदायित्व (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी - सीएसआर) कार्यक्रमांतर्गत राबविला जात आहे. नागपूरमधील ३० वर्षावरील सुमारे दोन लाख नागरिकांना या माध्यमातून मोफत प्राथमिक आरोग्यसेवा मिळणार आहे. विशेषतः मधुमेह, उच्च रक्तदाब व तोंडाचा कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांचे वेळीच निदान करून आवश्यक उपचार अथवा पुढील रुग्णालयीन सेवेसाठी रुग्णांना पाठविणे हे या युनिट्सचे मुख्य उद्दिष्ट आहे. ही मोबाइल युनिट्स शहरातील आझाद कॉलनी, बडा ताज, बीडी पेठ, बिनाकी, छोटा ताज, धंतेश्वरी नगर, धरम पेठ, डॉ. आंबेडकर नगर, एकात्मता नगर, गिट्टीखदान, गोपाल नगर, जैताळा, जयंती नगर, महात्मा फुले चौक, नंदनवन, पाचपोली आदी विविध भागांतील मार्गावर कार्यरत असून, नागरी गरीब व वंचित समाजघटकांपर्यंत सातत्याने आरोग्यसेवा पोहोचवली जात आहे. यासोबतच आरोग्य विषयक जनजागृती, जीवनशैली सुधारणा आणि व्यसनमुक्ती सल्ला सेवा यांचा समावेश देखील या उपक्रमात करण्यात आला आहे. हा उपक्रम राज्य शासनाच्या सर्वसमावेशक व सुलभ आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत असून, नागपूर महानगरपालिकेच्या सहकार्यामुळे या सेवांची प्रभावी अंमलबजावणी शक्य झाली आहे. भविष्यात या उपक्रमाचा विस्तार करण्यासाठी राज्य शासनासोबत अधिक सघन सहकार्य करण्यात येणार आहे.

## सोन्याच्या दरात वादळी वाढ!


**मुंबई-** आज सकाळी सोन्याच्या भावात वादळी वाढ झाली आहे. सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आज सोन्याचा दर गेला असून आंतरराष्ट्रीय स्तरावरील कारणांमुळे सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. याचे परिणाम सकाळपासूनच आशिया पॅसिफिक बाजारात झाले आहे.'गुड रिटर्न्स 'संकेतस्थळावरील माहितीनुसार सोन्याच्या २४ कॅरेट दरात प्रति ग्रॅम दर तब्बल ८१ रुपयांनी वाढला असून प्रति तोळा किंमत ९८४०० रूपयांवर पोहोचली आहे.तर २२ कॅरेट प्रति ग्रॅम किंमत ७५ रूपयांनी वाढून ९०२० रूपयांवर पोहोचली आहे.तर प्रति तोळा किंमत ९०२०० रूपयांवर पोहोचली आहे.१८



कॅरेट प्रति ग्रॅम किंमत ६१ रूपयांनी वाढली असून ती ७३८० रूपयावर पोहोचली आहे तर १० ग्रॅम म्हणजेच एक तोळा किंमत ७३८०० रूपयावर पोहोचली आहे.देशातील मुंबई,पुणे,दिल्ली, कलकत्ता,बंगलोर अशा अनेक बहुतांश शहरातील सराफ बाजारात २४ कॅरेट प्रति ग्रॅम किंमत ९८४० ते ९८५५ रुपये आहे.सोन्याच्या दरात गेल्या आठवड्यात मोठे चढउतार आले होते. सलग चार दिवस वाढ झाल्यानंतर दोन दिवस बाजारात घसरण झाली आज पुन्हा सराफा बाजारात सोने रिबाऊंड झाले आहे.आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढलेला दबाव पाहता यांचे पडसाद आशियाई शेअर बाजारात पहायला मिळत आहे.

नुकतेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेली अतिरिक्त टेरिफ शुल्कवाढ ही त्यांच्या अधिकाराचे केलेले उल्लंघन असल्याचा ठपका त्यांच्यावर कनिष्ठ न्यायालयाने केला होता.त्याला सरकारने अपील दाखल केल्यानंतर अमेरिकन अपील न्यायालयाने टेरिफवरील शुल्कवाढ थांबवण्याची प्रकिया बंद करुन डोनाल्ड ट्रम्प यांच्या बाजूने निकाल दिला परिणामी टेरिफचा मार्ग आता मोकळा झाला आहे. तसेच फेडरल रिझर्व्ह व्याजदरात कपात करण्यापूर्वी अमेरिकेत येणार असलेल्या रोजगार डेटाची वाट गुंतवणूकदार पाहत आहेत.परिणामी सोन्याच्या गुंतवणूकीत झालेली पर्यायी वाढ झाल्याने मागणीही वाढ झाली परिणामी बाजारात वाढ झाली आहे. सकाळी युएस गोल्ड फ्युचमध्ये ०.५९% टक्के वाढ झाली होती. तर एमसीएक्स वर सोन्याचा निर्देशांकात ०.३२% वाढ झाल्याने किंमत पातळी ९७१२० रूपयावर पोहोचली आहे.

## पंढरपूर वारीसाठी ड्रोन, एआयचा वापर



**सोलापूर-** पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी लाखो वारकरी दरवर्षी पंढरीत गर्दी करतात. या गर्दीच्या नियंत्रणासाठी ड्रोन, एआयचा वापर केला जाणार आहे. त्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून दीड कोटी रुपयांच्या खर्चास मंजुरी दिल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले. आषाढी वारीला कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणातून लाखो वारकरी पायी येतात. या गर्दीच्या नियंत्रणासाठी एआय तंत्रज्ञान आणि ड्रोनचा वापर पोलीस करणार आहेत.

दर तीन ते चार किलोमीटर अंतरावर वारकऱ्यांच्यासाठी विसावा उपलब्ध करून दिला जाणार आहे. या विसाव्याच्या ठिकाणी बेड, पाणी, शौचालय, वैद्यकीय उपचार अशा सुविधा पुरवल्या जातील. वारीमार्गातील अतिक्रमण हटविण्याचे काम सुरू आहे. यंदा पावसाचे प्रमाण अधिक राहणार असल्याने मुरुमीकरण सुरू आहे.

आषाढी वारीनिमित्त चंद्रभागेत स्नान करण्यासाठी प्रचंड गर्दी होते. सध्या पंढरपूर येथील नदीत पाणी उपलब्ध आहे. आवश्यकतेनुसार १८ जून २०२५ रोजी उजनी धरणातून पाणी सोडले जाणार आहे. ते पाणी २५ जून २०२५ पर्यंत चंद्रभागा नदीत पोहोचेल, असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# वाचाळवीर मुनीर

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे पर्यटकांना लक्ष्य करून भारतात जातीय तणाव वाढावा आणि काश्मीरमधील लोकांचा पर्यटनावरील रोजगार नष्ट व्हावा, यासाठीच पाकिस्तानने 'पहलगामकांड' घडवले. त्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर' सुरू करून, तेथील दहशतवाद्यांचे पेकाट भारताने मोडले. हवाई दल आणि क्षेपणास्त्रांनी दहशतवाद्यांचे ९ अड्डे उद्ध्वस्त केले. भारतीय लष्कराने उद्दिष्ट साध्य केले. ९ आणि १० मे रोजी ब्रह्मोससह अन्य क्षेपणास्त्रांच्या साहाय्याने पाकिस्तानच्या ११ लष्करी हवाई तळांवर हल्ला करण्यात आला. या युद्धात पाकिस्तानने 'जे-१०' ही चिनी विमाने, 'पीएल-१५' ही चिनी क्षेपणास्त्रे आणि चीनच्याच हवाई संरक्षण प्रणालींचा वापर केला होता. युद्धात मोठी हानी होऊनही पाकिस्तानची नांगी अजूनही वळवळतेच आहे! त्यापासून पाकिस्तानने कोणताच धडा घेतल्याचे दिसत नाही. नियंत्रणरेषेलगतच्या भागात पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी अलीकडेच दिलेली भेट आणि केलेली वक्तव्ये त्यांचा वाचाळपणाच स्पष्ट करतात. पाकच्या लष्करी पथकाच्या कथित नीतिधैर्याचे व तयारीचे कौतुक करताना, त्यांची जीभ बरीच घसरली. 'भारताने केलेल्या हल्ल्यात ज्यांचा बळी गेला, त्यांचा बदला घेण्यासाठी तुम्ही तोडीस तोड उत्तर दिलेत,' असे कौतुकाचे तारे त्यांनी तोडले! काश्मीर प्रश्नाबद्दलची पाकिस्तानची भूमिका कायम असून, काश्मिरी जनतेला पाठिंबा देतच राहू, अशी दर्पोक्तीही त्यांनी केली. पाकिस्तानच्या लष्कराचे कौतुक करण्यापुरते ठीक; पण या दौऱ्यात त्यांनी काश्मीरचा उल्लेख केल्याने त्यावर भारताकडून तीव्र प्रतिक्रिया येत राहतील. यापूर्वी काश्मीर आपलाच असल्याचा मुनीर यांनी केलेला दावा भारत सरकारने तत्काळ खोडून काढला होता. जम्मू आणि काश्मीर व लडाख हे केंद्रशासित प्रदेश भारताचे अविभाज्य भाग आहेत आणि यापुढेही राहतील, असे भारताने पाकला पुन्हा पुन्हा ठणकावले आहे. भारतविरोधी कारवाईत पाकिस्तानचा विजय झाला असल्याचा १०० टक्के बोगस दावाही मुनीर यांनी यावेळी केला आहे. वास्तविक, 'ऑपरेशन सिंदूर'च्या भयाने पाकिस्तानच्या संसदेत एक खासदार छाती बडवून रडला होता; तर अन्य खासदारांनी, या हल्ल्यात पाकिस्तानचे काय होणार, अशी चिंता व्यक्त केली होती. काही खासदारांनी तर देशातून पलायन करण्याचा इरादा व्यक्त केला होता, हे वास्तव आहे. भारताची सेनादले पाकिस्तानला बेचिराख करतील, अशी भीती वाटल्यानंतर धाबे दणाणलेल्या 'डीजीएमओ'ने भारताच्या प्रतिनिधीला फोन करून, आता हल्ले थांबवाल का? अशी विनंती काकुळतीला येऊन केली होती. त्यानंतर भारताने शस्त्रसंधी केली. ती केल्यानंतर 'पुन्हा पहलगामसारखे कृत्य केल्यास, त्याची यापेक्षाही जबर किंमत मोजावी लागेल,' असा इशाराही संरक्षणमंत्री राजनाथ सिंह तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिला होता. पाकिस्तानबाबतची भारताची भूमिका खासदार व राजकीय नेत्यांच्या प्रतिनिधी मंडळांनी जगभर विविध देशांचा दौरा करून विशद केली. भूमिकेस जगभरातून समर्थन मिळाले. पाकिस्तानने लबाडीचा आणि वकिली थाटाचा युक्तिवाद करूनही, त्या देशावर काही कट्टरतावादी देश सोडल्यास, कोणाचाही विश्वास नाही. आज पाकिस्तानला धोकादायक वाटेवर नेणाऱ्या लष्करप्रमुख मुनीर यांनी कट्टरतावादाचे शिक्षण घेतले आहे. त्यांची मानसिकता जिहादी असून, पाकिस्तानच्या आयएसआय तसेच मिलिटरी इंटलिजन्स (एमआय) या प्रमुख गुप्तचर संस्थांचे नेतृत्व करणारे पाकच्या इतिहासातील ते एकमेव लष्करप्रमुख आहेत. झिया उल हक यांनी पाकिस्तानचे इस्लामीकरण केले आणि अफगाणिस्तानातून रशियन फौजा हटवण्यासाठी अमेरिकेच्या मदतीस पाकिस्तानी मुजाहिद्दीन पाठवले. लष्कराला फक्त पाकिस्तानच्या भौगोलिक अखंडतेचे रक्षण करायचे आहेच; पण देशाच्या वैचारिक सीमांचे रक्षण करणे, हे महत्त्वाचे कार्य असल्याचे सांगत, मुनीर सैन्यात धार्मिक राष्ट्रवादाची पेरणी करत आहेत. ही झिया यांचीच परंपरा आहे. 'जगातील कोणतीही शक्ती पाकिस्तानला धक्का देऊ शकत नाही. जिहाद म्हणजेच पवित्र युद्ध करत आहोत,' अशी दर्पोक्ती मुनीर यांनी यापूर्वी अनेकदा केली आहे. त्याला भारताने वेळोवेळी चोख प्रत्युत्तर दिले आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नसावी; पण हे मुनीर एवढ्यावरच थांबलेले नाहीत. अंतर्गत राजकारणावरही अंकुश ठेवण्याची त्यांची धडपड लपून राहिलेली नाही. माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पाकिस्तान-तहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) पक्षाला राजकीयदृष्ट्या संपवण्याचा प्रयत्न त्यांनीच केला. ९ मे २०१३ रोजी इम्रान यांच्या अटकेनंतर झालेल्या दंगलप्रकरणी सामान्य नागरिकांवर थेट लष्करी न्यायालयात खटले भरण्याची अभूतपूर्व कारवाई त्यांनी केली. इम्रान यांनीच पंतप्रधान असताना मुनीर यांना आयएसआयच्या महासंचालकपदावरून हटवले होते. इम्रान यांच्याप्रमाणेच त्यांच्या पत्नी बुशरा यांना मुनीर यांनी तुरुंगात धाडले. सिंधू पाणीवाटप कराराबाबत भारताने कठोर भमिका घेतली असून, परिणामी काही धरणांच्या पाण्याचा प्रवाह कमी झाला. धरणे कोरडी पडल्यामुळे पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली. विशेषतः, बगलिहार धरणामुळे पाण्याचा पुरवठा कमी झाला. त्याच्या झळा स्थानिक जनता सोसत असताना, मुनीर मात्र थांबायला तयार नाहीत. वास्तविक, पाकिस्तानातील स्थानिक जनतेने रस्त्यावर उतरून शाहबाज शरीफ सरकारला व मुनीर यांनाच या परिस्थितीचा जाब विचारला पाहिजे. काश्मीर खोऱ्यातील पहिल्या रेल्वेसेवेचे, चिनाब नदीवरील जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे आणि देशातील पहिल्या केबलवर स्थिर असलेल्या अंजी पुलाचे पंतप्रधानांच्या उपस्थितीत कटरा येथे लोकार्पण करण्यात आले. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वेजोड प्रकल्प पूर्ण होऊन 'वंदे भारत' रेल्वेला हिरवा कंदीलही दाखवण्यात आला. जम्मू-काश्मीरचा सर्वांगीण विकास करून, बंदूक हाती घेणाऱ्यांनाही शस्त्रे टाकून या प्रक्रियेत सामावून घेतले जात आहे. हा नवा प्रकल्प त्या प्रयत्नांचाच महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. पाकिस्तानने इन्सानियत आणि काश्मिरियतवर हल्ला केला आहे, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याच कार्यक्रमात केला. तो करताना जेव्हा जेव्हा 'ऑपरेशन सिंदूर'चे नाव पाकिस्तान ऐकेल, तेव्हा तेव्हा त्यांना आपल्या लज्जास्पद पराभवाची आठवण होईल, असे खणखणीत बोल ऐकवले. पाकच्या राज्यकर्त्यांनी त्याचा विसर पडू देऊ नये!

---

**गेल्या वीस वर्षांत मुंबईत लोकल अपघातात ५२ हजार लोकांचा मृत्यू झाला तरीही केंद्रात आणि राज्यात सत्तेवर असलेल्या कोणत्याही सरकारला त्याचे गांभीर्य वाटत नाही का? मुंबईच्या उपनगरी रेल्वे अपघातात आणखी किती बळी जायला हवेत म्हणजे सरकार आणि रेल्वे प्रशासनाला त्याची गंभीर दखल घ्यावीशी वाटेल?**

# रोज मरे त्याला कोण...



मुंबईच्या विस्तारीत पूर्व उपनगरातील मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या भीषण दुर्घटनेत चार प्रवाशांचा मृत्यू झाला आणि नऊ जण जखमी झाले. या घटनेने सारी मुंबई हादरली. मुंबईची रेल्वे उपनगरी सेवा म्हणजेच लोकल ही या महानगराची लाइफलाइन आहे. दोन कोटी लोकसंख्येच्या महामुंबईची जनवाहिनी आहे. सर्वात स्वस्त आणि सर्वात जलद अशी ही रेल्वे सेवा आहे. म्हणूनच चर्चगेट आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसटी)पासून विरार-पालघर-डहाणू, कसारा-कर्जत, पनवेल अशी धावणारी लोकल सेवा ही मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

मुंबईकरांच्या सेवेत मेट्रो-मोनो दाखल झाली, हार्बरच्या जोडीला ठाणे-पनवेल ट्रान्स हार्बर आली. नऊ डब्यांचे बारा डबे झाले, आता अनेक गाड्यांना पंधरा डबे आहेत. दर चार ते पाच मिनिटांच्या अंतराने लोकल सेवा आहे. तरीही सर्व देशांतून मुंबईवर लोंढे आदळतच असल्याने वाढती लोकसंख्या व वाढत्या प्रवासी संख्येला उपनगरी रेल्वे सेवा अपुरी पडत आहे.

रोज खचाखच गर्दीतून रेल्वे प्रवास ही तर मुंबईकरांची मोठी परीक्षा असते. रोज धक्काबुक्कीतून लोकल डब्यात प्रवेश करणे आणि आपल्या स्टेशनवर कसे तरी प्लॅटफॉर्मवर उतरणे यासाठी रोज मुंबईकरांना मोठी कसरत करावी लागते. डब्यात चौथी सीट सोडाच पण नीट उभे राहायला मिळावे म्हणूनही देवाकडे प्रार्थना करावी लागते. आपले रोजचेच हाल सांगणार तरी कुणाला? मध्य, पश्चिम व हार्बर-ट्रान्स आणि हार्बर लोकलमधून रोज पंचाहत्तर लाख मुंबईकर प्रवास करतात. हे कोणी मजा म्हणून लोकलमधून फिरत नाहीत. कोणी हौस म्हणून गर्दीत घुसत नाही.

रोजंदारीसाठी, पोटापाण्यासाठी, व्यापार-व्यवसायासाठी, शाळा-कॉलेजसाठी ही गर्दी लोकलमधून जा-ये करीत असते. त्यात भाजीवाले, मच्छीवाले, फेरीवाले, कामगार-कारकुनांपासून ते टायवाले असतात. याच गर्दीत भजन करणारे नि पोथी वाचणारे असतात आणि मालाची आवक-जावक व शेअर्सचे भाव फोनवर विचारणारे असतात. बहुसंख्य प्रवासी बसायला सीट मिळाली नाही तरी उभे राहूनच मोबाईलवर चॅटिंग करीत असतात. लोकलच्या डब्यात हौशे-गवशे आणि नवशेही भरपूर असतात. त्यात विनातिकीटही बिनधास्त प्रवास करीत असतात.

पाकीटमार आणि मोबाईल चोरांचा वावर असतो. भिकारी, फेरीवाले, नशेडे आणि गर्दुल्लेही याच गर्दीत त्यांच्या धुंदीत असतात. डब्यात शिरायला जागा नाही किंवा येणाऱ्या स्टेशनवर उतरायचे म्हणून लोकलच्या दरवाजात लोक उभे असतात पण त्याचबरोबर काही गणेगंपे आणि रंगेल दरवाजात हातवारे करीत त्यांच्या मस्तीत उभे दिसतात. मुंबईचा लोकल कल्लोळ हा शब्दाने वर्णन करता येणार नाही पण या मुंबईकर प्रवाशांकडे रेल्वे प्रशासनाचे आणि राज्य व केंद्र सरकारने म्हणावे तसे लक्ष नाही... गर्दी व चेंगराचेंगरीतून लक्षावधी मुंबईकरांचा रोजचा प्रवास रामभरोसे चालू आहे. लोकलच्या अपघातात रोज सात ते आठ माणसे चिरडली जात आहेत किंवा गाडीखाली सापडून मृत्युमुखी पडत आहेत. काहींचे हात-पाय कायमचे निकामी होत आहेत, पण त्याची कधी चर्चाही होत नाही, कारण रोज मरे त्याला कोण रडे... असे मुंबईचे जीवन आहे.

युद्धात किती मृत्युमुखी पडले? प्रयागराजच्या महाकुंभमध्ये किती जणांनी अखेरचा श्वास घेतला? नवी दिल्ली रेल्वे स्टेशनच्या चेंगराचेंगरीत किती जण ठार झाले? बंगळूरुच्या चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर लाखोंच्या अफाट गर्दीत नेमके किती घुसमटून मेले? कोविड काळात मुंबई, महाराष्ट्रात किती जणांचा मृत्यू झाला? अशा प्रश्नांचा भडीमार ऐकायला मिळाला. पण मुंबईच्या लोकल अपघातात रोज आणि दरवर्षी किती मृत्युमुखी पडतात किंवा गेल्या दहा वीस वर्षांत किती मरण पावले असा प्रश्न कोणी जाहीरपणे किंवा संसदेत विचारत नाही. कारण रोज मरे त्याला कोण रडे... अशीच भावना झाली आहे.

गेल्या वीस वर्षांत मुंबईत लोकल अपघातात ५२ हजार लोकांचा मृत्यू झाला तरीही केंद्रात आणि राज्यात सत्तेवर असलेल्या कोणत्याही सरकारला त्याचे गांभीर्य वाटत नाही का? मुंबईच्या उपनगरी रेल्वे अपघातात आणखी किती बळी जायला हवेत म्हणजे सरकार आणि रेल्वे प्रशासनाला त्याची गंभीर दखल घ्यावीशी वाटेल?

मुंब्रा रेल्वे स्टेशनवरून सकाळी ९.३० च्या सुमारास म्हणजे ऐन गर्दीच्या वेळी दोन फास्ट लोकल धावत होत्या. एक लोकल कसाऱ्याहून मुंबईकडे तर दुसरी मुंबईहून कसाऱ्याकडे धावत होती. दरवाजात उभ्या असलेल्या प्रवाशांच्या बॅगा दोन्ही लोकल्सच्या प्रवाशांना घासल्या गेल्या, त्यातून तेरा जण धावत्या लोकलमधून खाली पडले व त्यात चौघांचा मृत्यू झाला. स्टेशनवर उभ्या असलेल्या प्रवाशांनी या घटनेचे केलेले व्हीडिओ शूटिंग व्हायरलही झाले म्हणून नेमके काय झाले हे समजले. या घटनेनंतर मुंबईतील लोकल अपघाताची रेल्वे मंत्रालयाला सुद्धा दखल घ्यावी लागली.

रेल्वे मंत्र्यांनी दिल्लीत अधिकाऱ्यांची बैठक घेतली. दरवाजात उभे असलेल्या प्रवाशांचा खाली पडून मृत्यू झाला म्हणून मुंबईतील लोकल्सना स्वयंचलित दरवाजे बसवले जाणार, अशी घोषणा झाली. मुंबईत मध्य व पश्चिम रेल्वेच्या उपनगरी मार्गावर एअर कंडिशन्ड लोकल्स धावत आहेत. त्यांना स्वयंचलित दरवाजे आहेत. मुंबईत मेट्रो-मोनो रेल्वे धावत आहेत त्यांनाही स्वयंचलित दरवाजे आहेत. आता विना वातानुकूलित म्हणजेच साध्या लोकल्सना स्वयंचलित दरवाजे बसवले जाणार आहेत. पण त्याला आतापासूनच विरोध सुरू झाला आहे. एअर कंडिशन्डचे तिकीट परवडत नाही म्हणून लोकांचा ओढा साध्या लोकलकडे असतो.

एसी लोकल्सना मागणी चांगली आहे, त्याही गर्दीने भरलेल्या दिसतात. पण खचाखच गर्दी ही साध्या लोकल्सना असते. स्टेशनवर अवघ्या वीस सेकंद थांबणाऱ्या लोकलमध्ये हजारो लोकांची चढ-उतार शक्य आहे का, हा कळीचा मुद्दा आहे. लोकल्सला दरवाजे म्हणजे रोगापेक्षा औषध जालीम असे होऊ नये असे प्रवाशांना वाटते. पण लोकलसंबंधी निर्णय घेणारे कधी लोकलमधून प्रवास करीत नसतात, ते त्यांच्या एसी केबिनमधे बसून प्रवाशांची सुरक्षितता ठरवत असतात, त्यामुळे प्रवाशांच्या नेमक्या भावना रेल्वे प्रशासनाला कळत नाहीत. मुंबईत रेल्वे प्रवासी संघटना डझनभर तरी आहेत. त्यांच्याशी रेल्वे प्रशासनाचा संवाद कितपत आहे? प्रवासी संघटना निवेदने देतात पण त्याचे पुढे काय होते? प्रवासी संघटनांशी रेल्वे प्रशासन कितपत संवाद ठेवते? पत्र देऊन व निवेदने देऊन चर्चेला रेल्वे प्रशासन वेळ देत नाही ही प्रवासी संघटनांची तक्रार असते.

सीएसटीहून शेवटची लोकल पूर्वी रात्री १२.४५ वाजता सुटत असे, आता ती १२.१५ वाजता सुटते. यामुळे प्रवाशांची किती गैरसोय होते, याचा प्रशासनाने कधी विचार केलाय का? एसी लोकल्स वाढवून साध्या लोकल्स रद्द करण्यात येतात तेव्हा प्रवाशांमध्ये असंतोष प्रकट होतो, त्याची दखल प्रशासनाने कधी घेतली आहे का? विशेषत: मध्य रेल्वेच्या उपनगरी गाड्या कधीच वेळेवर धावत नाहीत, रोज त्या उशिरा धावतात व अनेक गाड्या रद्द होतात, हे दुष्टचक्र कधी थांबणार? मेट्रोच्या गाड्या मिनिटांवर धावतात मग टाइमटेबलनुसार मध्य रेल्वेच्या उपनगरी गाड्या का धावू शकत नाहीत? लांब पल्ल्याच्या गाड्या किंवा मेल-एक्स्प्रेसला प्राधान्य देण्यासाठी लोकल्स रखडवल्या जातात तेव्हा प्रवासी संतप्त होतात. राजधानी, शताब्दी, वंदेभारत, अमृत भारत यांना कोणाचा विरोध असण्याचे कारण नाही, पण मुंबईच्या लोकल्स ट्रेनचे वेळापत्रक पाळले गेले पाहिजे हा प्रवाशांचा आग्रह असतो. लोकलच्या प्रत्येक डब्यात विनातिकीट प्रवासी असतात. प्रथम श्रेणीच्या डब्यातही बिनधास्त परप्रांतीय व त्यांचा परिवार प्रवास करीत असतो. गर्दीच्या वेळी तर प्रत्येक डब्यात दहा-वीस विनातिकीट प्रवासी सीट बळकावून बसलेले असतात. अशा वेळी तिकीट तपासनीस कुठे असतात? चालत्या गाडीत तिकीट तपासनीसांना तिकिटे वा पास तपासण्याचा रेल्वेने अधिकार दिलेला आहे, असे फलक डब्यात दिसतात, मग टीसी का दिसत नाहीत? रेल्वे स्टेशनवर विनातिकीट प्रवेशच मिळणार नाही अशी यंत्रणा बसवली तर लोकल डब्यातील अनवॉन्टेड गर्दी कमी होऊ शकेल.

मुंबईच्या विस्तारीत उपगरात लोकसंख्या प्रचंड वाढली आहे, दादर, ठाणे, दिवा, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, कुर्ला, अंधेरी, बोरिवली, वसई-विरार, पालघर, नेरूळ, खारघर-पनवेल येथे लोकसंख्येबरोबर प्रवासी संख्या प्रचंड वाढली आहे, हे लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने नियोजन केले पाहिजे. मुंबईत रेल्वे अपघातात चारजण ठार झाले म्हणून रेल्वे मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करणे हास्यापद आहे. सार्वजनिक जीवनात आज कोणी लालबहादूर शास्त्री नाहीत आणि अटलबिहारी वाजपेयीही नाहीत...

**डॉ. सुकृत खांडेकर**

---

## लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आवश्यक!

मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळील वळणावर रेल्वे अपघात झाला. रेल्वे प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे अपघात घडला, असा एकच सूर जनमानसात आहे. देशभरात नवनवीन रेल्वेगाड्या व रेल्वेमार्ग भारतीय रेल्वे सुरु करत आहे. परंतु, मुंबई लोकल मार्गावरील प्रवाशांच्या समस्येकडे लक्ष द्यायला संबंधित अधिकारीवर्गाकडे वेळ नाही. वास्तविक, मुंबई शहर व उपनगरातील लोकलच्या माध्यमातून भारतीय रेल्वेला उत्तम उत्पन्न मिळते. वाढती प्रवासी संख्या लक्षात घेऊन नऊ डब्यांच्या लोकल बारा डब्यांच्या करण्यात आल्या. तरीही गर्दी आटोक्यात येत नाही, यासाठी काही लोकल पंधरा डब्यांच्या करण्यात आल्या आहेत. तरीही, गर्दी काही कमी होत नाही. लोकल प्रवाशांचे प्राण धोक्यात येत आहेत. कारण, मुंबई शहर व उपनगरातील लोकसंख्या वाढीचा वेग तीव्र आहे. या लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे हाच लोकल अपघात टाळण्याचा सहज व सोपा मार्ग आहे.

**सुधीर कनगुटकर**

## सर्वच लोकल वातानुकूलित करण्याची घाई नको

मुंब्रा या ठिकाणी झालेल्या अपघाताची दखल घेत राज्य सरकारने भाडेवाढ न करता सर्वच लोकलगाड्या वातानुकूलित करण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली. मुंबई ठाण्यातील रेल्वे मार्गावर सध्या काही प्रमाणात वातानुकूलित लोकल गाड्या धावत आहेत ज्या कधीही त्यांच्या नियोजित वेळेत रेल्वे स्थानकांवर येत नाहीत याचा अनुभव चाकरमानी प्रतिदिन घेत आहेत. ट्रेनमधील वातानूकुलीन यंत्रांचे दारात गळणारे पाणी, गर्दीच्या वेळेत स्वयंचलित उघड बंद होणाऱ्या दरवाजांना लागणारा अधिकचा कालावधी यामुळे या गाड्यांच्या वेळापत्रकावर प्रतिदिन परिणाम होत असतो ज्यामुळे रोजच काही गाड्या रद्द कराव्या लागतात तर काही वेळा नेहमीच्या धावणाऱ्या लोकल गाड्यांवर त्याचा परिणाम होतो. आजमितीला वातानुकूलित रेल्वेगाड्यांचे तिकीट दर भरमसाठ असल्यामुळे या गाड्यांनी प्रवास करणाऱ्यांची संख्या तुलनेने अल्प असताना इतक्या समस्या येत आहेत तर भविष्यात नेहमीच्या तिकीट दरात सर्वच गाड्या वातानुकूलित केल्या तर लोकल ट्रेनने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या पाहता केवढी भीषण परिस्थिती उद्भवेल याची कल्पनाही करता येत नाही. लोकल गाड्यांतील प्रवाशांचा भार जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत सर्व गाड्या वातानुकूलित करण्याची घाई करू नये!

**मोक्षदा घाणेकर**

## मोबाइल विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मारकच

बदलत्या काळाची गरज म्हणून मुलांच्या हाती सोपवलेला मोबाइल त्यांच्या हातातून काढून घेण्याची वेळ पालकांवर ओढवली आहे. या मुद्दावर परस्पर विरोध समाजाच्या अनुभवास येतो. कोरोना काळात शाळा बंद होत्या. त्याकाळात मुलांचे शिकणे सुरु ठेवण्यासाठी मोबाइलचा वापर मोठ्या प्रमाणात केला गेला. तसे अभिनव प्रयोग राबवणाऱ्यांचे विशेष कौतुकही झाले. त्यासाठी मुलांच्या हातात मोबाइल सोपवणे अनेकांसाठी अपरिहार्य मानले गेले. कोणत्याही बदलाचे चक्र उलटे फिरवणे अवघड बाब असते. तसेच काही याबाबतीतही झाले. कोरोनाची साथ संपुष्टात आल्यावर शाळा सुरु झाल्या. पण मुलांच्या हातातला मोबाइल अजूनही सुटला नाही. किंबहुना त्यांचा त्यावरचा वेळ वाढत गेल्याचे आढळून येते. आता शाळाही डिजिटल करण्यावर अधिक भर दिला जात आहे. मुले आणि मोबाइलची संगत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मारक ठरत आहे. आणि त्यामुळे मुलांची शिकण्याची क्षमता बाधित होते. शिक्षणतज्ज्ञ, सर्जनशील शिक्षक आणि सुजाण पालकांना हा मुद्दा चिंतेचा वाटू लागला आहे. त्यावर ज्यांच्या त्यांच्या पातळीवर उपाय योजले जाताना आढळतात. राज्यातील काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांकडून मोबाइल वापरणार नाही, त्यावर गेम खेळणार नाही, अशी शपथ दिली जाते. त्यात पालकांना सहभागी करून घेतले जाते. शपथ मोडल्याची पालकांची तक्रार आल्यास प्रार्थनेच्या वेळी त्या विद्यार्थ्याचे नाव जाहीर केले जाते. आणि त्याला सुधारणा करण्यास आठ दिवसांचा कालावधी दिला जातो. सुधारणा झाल्यावर त्याच मुलाचे जाहीर कौतुकही केले जाते. असे निर्णय याआधीही अनेकदा घेतले गेले आहेत. मुलांच्या शिक्षणावर होणाऱ्या विपरीत परिणामांपुरती ही समस्या मर्यादित नाही. ही समस्या सोडवण्यासाठी सतत प्रयत्न करत राहावे लागतील. मुलांमध्ये मूल्ये रुजवण्यासाठी सुजाण पालकदेखील विविध प्रयोग करीत असतात. त्याचाच विस्तारता परीघ म्हणून अशा निर्णयाकडे पाहणे फायदेशीर ठरू शकते. कारण प्रयोग सतत करत राहिले तरच चांगले निष्कर्ष निघू शकतात.

**प्रा. मधुकर चुटे**

## भक्तांची वारी आनंदित करण्यासाठी उपाययोजना

वारी ही केवळ वारकऱ्यांसाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी श्रद्धेचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. अनेक वारकरी भक्त मंडळी पारंपरिक दिंडीच्या माध्यमातून निरपेक्षपणे पायी वारी करतात. धार्मिक श्रद्धा, शिस्तबद्धता आणि भक्तिभावाने पार पडणाऱ्या या वारीत हजारो भाविक सहभागी होतात. हा आध्यात्मिक सोहळा अनुभवण्यासाठी वारीच्या मार्गावर अनेक श्रद्धाळू दर्शनाच्या प्रतीक्षेत असतात. अशा वेळी अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी उद्भवते. काही भागांमध्ये वारकऱ्यांना नैसर्गिक बदल आणि इतर अडचणींना सामोरे जावे लागते.

हे टाळण्यासाठी रस्त्यांवर पादचारी उड्डाणपूल (स्कायवॉक) उभारण्यात यावा, पालखी तळांवरील विद्युत रोहित्र संरक्षित करण्यात यावेत, तसेच शौचालयांसाठी पुरेशा पाण्याची व्यवस्था असावी. पिण्याचे शुद्ध पाणी, विद्युत सुविधा आणि निवाऱ्याची योग्य व्यवस्था या सर्व सुविधा पालखी सोहळ्याच्या मुक्काम काळात वारकऱ्यांना मिळाव्यात.

या अनुषंगाने पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे यांनी लोणंद (जि. सातारा) येथील प्रशासनाला वरील सूचना सादर केल्या. मात्र या उपाययोजना केवळ लोणंदपुरत्याच मर्यादित न राहता संपूर्ण पालखी मार्गावर राबविल्या जाव्यात, ही सर्व विठ्ठल भक्तांची अपेक्षा आहे. वरील उपाययोजना प्रभावीपणे राबविल्यास वारकऱ्यांचा वारी अनुभव अधिक आनंददायी आणि सुसज्ज होईल. वारकरी आपली साधना म्हणून कोणतीही तक्रार न करता सगळी परिस्थिती आनंदाने स्वीकारतात. मात्र, त्यांना सुविधा पुरविल्यास स्थानिक जनता आणि प्रशासनासाठीही ती एक साधनाच ठरेल.

**हृषीकेश हरदास,** वर्धा

## प्रजनन दर वाढविण्याच्या दिशेने सरकारची कूच.!

भारतातील आंध्र प्रदेशातील प्रजनन दराबद्दल सरकारला चिंता वाटू लागली असून घटत्या प्रजनन दरावर उपाय योजना म्हणून मुख्यमंत्र्यांनी मोठ्या कुटुंबांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. कुटुंबाला एक युनिट समजून आर्थिक मदत करण्याचे ठरविले आहे. शून्य गरिबी अंतर्गत सुरू केलेल्या मॉडेल नुसार श्रीमंत लोक गरीब कुटुंबांना दत्तक घेतील त्यामुळे उत्पन्नातील तफावत दूर होऊन संपूर्ण कुटुंबाचे कल्याण होईल. महिलांना पाहिजे तेवढी प्रसूती रजा घेता येईल. शाळेत शिकणाऱ्या प्रत्येक मुलाच्या मातेला पंधरा हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली आहे. एकीकडे देशाच्या लोकसंख्येने १४० अब्जांची मर्यादा पार केली आहे एखाद दुसरा देश वगळता सर्व देशांना लोकसंख्या वाढीने स्त्रस्त करून सोडले आहे आणि आपल्या राज्याचा प्रजनन दर कमी होत असल्याच्या चिंतेने आंध्रचे मुख्यमंत्री राज्याची लोकसंख्या वाढवू इच्छित आहेत. लोकसंख्या वाढल्यावर आंध्रात मुलांचे संगोपन, शिक्षण, उच्च शिक्षण, नोकऱ्या मिळवून देण्याची जबाबदारी विद्यमान मुख्यमंत्र्यांनी जरी घेतली असली तरी पुढील सरकारे त्यास मान्यता देतील का.! असे प्रश्न उपस्थित होऊ शकतात. फक्त सत्तेत राहण्यासाठी आणि आपली लोकप्रियता वाढवण्यासाठी राजकीय नेते, पक्ष अशा प्रकारच्या चुकीच्या पद्धतीने राज्यातील जनतेला भुलवून राज्य कारभार हाताळू लागल्यास राज्यांच्या सर्वांगीण प्रगतीला खीळ बसेल यांत शंकाच नाही. काही मर्यादित लोकांना आर्थिक मदत जरी मिळू शकली तरी त्यासाठी अनेकांच्या खिशातून पैशांची तरतूद करावी लागणार आहे ह्याने समाजात दुरावा निर्माण होऊ शकतो याचे भान राजकीय नेत्यांनी आणि पक्षांनी ठेवले पाहिजे.

**स्नेहा राज**

## मान्सून कधी सक्रिय होणार?

यंदाच्या वर्षी पाऊसमान चांगले आणि सर्वसाधारण असून भारतीय हवामान विभागाने सरासरी १०६ टक्के पाऊस होईल असे वर्तवले आहे तर अनेक हवामान तज्ज्ञांनी आपापल्या माहितीप्रमाणे धो, धो पाऊस बरसेल असे नुकतेच भाकीत केले आहेत. भारत सरकारकडून शेतकऱ्यांच्या माहितीसाठी टीव्ही, रेडिओ, मोबाईल, वर्तमानपत्र यासारख्या माध्यमातून हवामानाचा अंदाज वर्तवला जातो पावसाचा अंदाज सांगितल्यामुळे शेतकरी यावर विश्वास ठेवून पेरणी करतात पण गेल्या काही वर्षांपासून हवामानाचा अंदाज फोल ठरत असल्याचे वरचेवर निष्पण झाले आहे. यंदा २५ मे रोहिणी नक्षत्रांपासून पावसाळा ऋतुस प्रारंभ झाला आहे. या नक्षत्रात वळीव टाईप पाऊस झाला असून मृग नक्षत्र ८ जूनला सुरु झाले आहे याचे वाहन कोल्हा आहे अजून तर हे नक्षत्र कोरडेच राहिले आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला असून पुन्हा एकदा हवामानाच्या अंदाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेतकरी महागडी औषधे, बि-बियाणे, कर्ज काढून शेती पिकवत असतो पण भारतीय हवामान खात्याच्या चुकीच्या अंदाजामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना फटका बसत आहे.

**राजू जाधव**

मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांची अचानक तपासणी

# लेट लतीफ आणि दांडी मारणा-या कर्मचा-यांवर सीईओंचा कारवाईचा आदेश



## विभागातली शिस्त ढासळली

जिल्हा परिषदेतील अनेक विभागांमध्ये कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे कामकाजावर परिणाम होतो आहे. सुट्टी नोंद न करता अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांच्या कामाच्या फाईली तशाच पडून राहतात. विशेष म्हणजे, काही वरिष्ठ अधिकारी आणि विस्तार अधिकारी दौऱ्याच्या नावाखाली कार्यालयात अनुपस्थित राहतात, यांची कुठेही नोंद नसते, ही बाबही गंभीर असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

## कर्मचाऱ्यांचीच मागणी : वरिष्ठांवरही लक्ष द्या

जिल्हा परिषदेतील काही कर्मचाऱ्यांनीही या कारवाईचं स्वागत केलं असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दौऱ्याच्या नावाखाली होणाऱ्या अनुपस्थितीवरही लक्ष द्यावे, अशी मागणी केली आहे.

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - जिल्हा परिषदेतील हलगर्जीपणा आणि कामचुकारपणाला चाप लावण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी आज सकाळीच धडक निरीक्षण केले. या तपासणीदरम्यान वेळेवर कार्यालयात अनुपस्थित असणारे तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता दांडी मारणारे कर्मचारी मोठ्या प्रमाणात आढळून आले. यावर संताप व्यक्त करत सीईओ पत्की यांनी अशा कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाईचे आदेश दिले आहेत.

या कारवाईत सुमारे ५० हून अधिक कर्मचारी अडकल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले असून, लवकरच त्यांना स्पष्टीकरणासाठी नोटीसा बजावल्या जाणार आहेत. सीईओ पत्की यांच्यासमवेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंकज भोयर आणि अन्य वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विविध विभागांत भेट दिल्यानंतर हे वास्तव समोर आले. अनेक कर्मचाऱ्यांनी हलचल रजिस्टरमध्ये नोंद केली नव्हती, सुट्टीचा अर्ज दिलेला नव्हता, तर काही जण फक्त "मी जातोय, सांभाळून घ्या" असे सांगून बेपत्ता होते. ही माहिती अधीक्षकांकडून समजल्यावर सीईओ यांनी डोक्यावर हात मारून संताप व्यक्त केला आणि कारवाईचे आदेश दिले.

# यवतमाळच्या बसस्थानकांवरील चोऱ्यांना लगाम



## दोन सराईत चोरट्यांना अटक; १.२० लाखांची रोख रक्कम जप्त

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - यवतमाळ शहरासह जिल्ह्यातील विविध बस स्थानकांवर प्रवाशांचे पाकीट चोरी करणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून त्यांच्या ताब्यातून ₹,२०,०००/- इतकी रोख रक्कम जप्त केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून वाढत असलेल्या चोरीच्या घटनांनंतर पोलिसांनी राबवलेल्या योजनाबद्ध कारवाईत हे मोठे यश हाती लागले.

विशेष म्हणजे अटक करण्यात आलेले आरोपी अहमदबेग कादरबेग (वय ६०, रा. मुजफ्फरपुरा, अमरावती) आणि सलीम शाहा सबरअली शाहा (वय ५२, रा. अलमास नगर, बडनेरा, अमरावती) हे दोघेही अतिशय सराईत असून, गेल्या वर्षांपासून जिल्ह्यातील बस स्थानकांवर एकत्र येत चोरी करत असल्याची माहिती पोलिसांच्या खबऱ्यांद्वारे समोर आली होती. स्थानिक गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार, अटक आरोपींविरोधात यवतमाळ जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण ६ गुन्ह्यांची नोंद आहे: पोलीस स्टेशन अवधूतवाडी – गु.क्र. १२२१/२४ व १२३७/२४ पो.स्टे. राळेगाव – गु. क्र. ०४/२०२४ पो.स्टे. बाभुळगाव – गु. क्र. ८५७/२४ पो.स्टे. दारव्हा – गु. क्र. १४३/२४ व ३४८/२५ पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून या गुन्ह्यांमध्ये चोरलेली एकूण ₹.२० लाखांची रोख रक्कम जप्त केली आहे. आरोपींना पुढील तपासासाठी पोलीस स्टेशन अवधूतवाडीच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, व पोलीस निरीक्षक सतिश चवरे (स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाई दरम्यान पो.उप.नि. गजानन राजमल्लू, अंमलदार सै. साजिद, रूपेश पाली, प्रशांत हेडाऊ, योगेश डगवार, आकाश सुर्यवंशी व देवेंद्र होले यांनी सक्रिय सहभाग घेतला. स्थानिक गुन्हे शाखेच्या या धडाकेबाज कारवाईमुळे बस स्थानकांवरील प्रवाशांमध्ये एक दिलासा निर्माण झाला असून, चोरट्यांवर वचक बसला आहे.

# राळेगाव उपविभागातील शेतकऱ्यांना विना अट डिएपी खते उपलब्ध करून द्या

## मनसेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - मान्सून तोंडावर आला असल्याने शेती कामाला वेग आला ज्यात पेरण्या करून प्रथम प्रक्रिया पार पडण्यास सुरुवात झाली. कापूस, मका, ज्वारी, बाजरी, सोयाबीन, उस या पिकांच्या आपल्या भागात पेरण्या करण्यास सुरुवात झाली आहे. मात्र पेरणी करताना बरोबरच लागणारे खते राळेगाव उपविभागात नसल्याने शेतकऱ्यांना पेरण्यात अडथळा निर्माण होत आहे. सध्या कृषी केंद्र चालकांकडून डीएपी खताचा काळाबाजार करून कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात आहे. तर याच खतांच्या खरेदी बरोबर लिंकिंग ची एक अट कृषी केंद्र चालकांकडून सुरु करून शेतकऱ्यांची आर्थिक लुट चालू आहे. यामुळे परिसरातील शेतकरी बांधवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे या काळाबाजार करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करून शेतकऱ्यांना विना अट डिएपी खत उपलब्ध करून देण्याची मागणी मनसे जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांनी केली आहे.

खरीप हंगामाच्या तोंडावर डीएपी खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जाऊन ही बाब गंभीर आहे. पिकांच्या वाढीसाठी डीएपी खत अत्यंत आवश्यक आहे. परंतु, सध्याच्या तुटवड्यामुळे शेतकऱ्यांची पेरणी लांबणीवर पडत आहे आणि यामुळे त्यांच्या शेती उत्पन्नावर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. कृषी केंद्र चालक या खताचे साठे करून जादा दराने विकत आहे. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना हे खते महागड्या भावाने खरेदी करणे परवडणारे नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून खताच्या मोठ्या पिशवी सोबत लहान लहान पुड्या खरेदी करण्यासाठी कृषी केंद्र चालकांनी निर्बंध लावलेले आहे. वास्तविक पाहता ह्या पुड्या खत कंपन्याकडून नमुना स्वरूपात निशुल्क येतात. सदर खतासोबत ह्या पुड्या वापरल्यास खतांचा प्रभावी परिणाम पिकांवर होतो असे सांगून अव्वाच्या सव्वा दरात शेतकऱ्यांच्या माथी मारण्यात येते. जर ह्या लहान पुड्या घेतल्या नाही तर शेतकऱ्यांना खत दिल्या जात नाही. शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने शेतीची तयारी केली आहे आणि आता खत उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे सर्व नियोजन कोलमडले आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे. या गंभीर समस्येची दखल घेऊन, आपण तात्काळ राळेगाव उपविभागात डी.ए.पी. खताचा पुरवठा सुरळीत व कोणतीही अट न लावता हे खते शेतकऱ्यांना देण्यात यावे यासाठी कृषी विभागांना आदेश द्यावेत. तसेच तालुक्यातील सर्व कृषी केंद्रावर छापे टाकून साठेबाजी करणाऱ्या कृषी केंद्र चालकांचे परवाने रद्द करावे. जेणेकरून शेतकऱ्यांना वेळेवर खत मिळून त्यांचे संभाव्य नुकसान टाळता येईल. अन्यथा शेतकऱ्यांच्या हितार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेना रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडेल असा ईशारा मनसे जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांनी जिल्हाधिकारी विकास मिना यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

# अपक्ष संचालकाला डावलून कॉँग्रेस पॅनलचा सत्कार

जनमाध्यम प्रतिनिधी





प्रशासकांच्या संमतीने सभागृहाचा वापर राजकीय कार्यक्रमासाठी करण्यात आला.

खा. धानोरकरांवर रजनीकांत बोरेले यांचा गंभीर आरोप

पांढरकवडा - कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ७ जून रोजी पार पडलेल्या निवडणुकीनंतर नव्या वादाला सुरुवात झाली आहे. या निवडणुकीत एकमेव अपक्ष उमेदवार म्हणून विजयी झालेले रजनीकांत बोरेले यांनी, काँग्रेसप्रणित पॅनलच्या १७ उमेदवारांच्या सत्कार सोहळ्यात त्यांना जाणूनबुजून डावलण्यात आल्याचा आरोप केला आहे.

१० जून रोजी बाजार समितीच्या सभागृहात आयोजित सत्कार सोहळ्यात केवळ काँग्रेस पॅनलच्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला, तर अपक्ष उमेदवार असलेल्या बोरेले यांना निमंत्रणही देण्यात आले नाही. बोरेले यांच्या म्हणण्यानुसार, ही कृती द्वेषातून आणि राजकीय आकसातून करण्यात आली आहे. या प्रकरणी त्यांनी निवडणूक प्राधिकरण, सहकार विभागाचे प्रधान सचिव, जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे. विशेष म्हणजे, समितीची सभापती व उपसभापती पदाची निवड प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसताना, बोरेले यांनी खा. प्रतिभा धानोरकर यांच्यावर पदाचा गैरवापर केल्याचा आरोप करत सांगितले की, कृषी उत्पन्न बाजार समिती हे कोणत्याही पक्षाचे कार्यालय नसून, असा कार्यक्रम पक्ष कार्यालयात करायला हवा होता. बाजार समिती कार्यालयाचा गैरवापर रोखण्यासाठी पुढील पाच वर्षे राजकीय व्यक्तींना प्रवेशबंदी करावी, अशी मागणीही बोरेले यांनी केली आहे.

# यवतमाळ नगरपरिषदेचा हलगर्जीपणा : फॉगींग मशीन अदृश्य झाली का?

## नागरिकांचा संताप, प्रशासनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा इशारा

जनमाध्यम प्रतिनिधी





यवतमाळ - शहरात अवकाळी पावसामुळे अनेक भागांत गटारे, नाले चोख न साफ केल्याने साचलेल्या पाण्यातून डेंग्यूचे विषाणू पसरू लागले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यासंदर्भात मनोज गेडाम आणि इतर वंचित नागरिकांनी जिल्हाधिकारी व यवतमाळ नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना लेखी निवेदन देत तात्काळ पावले उचलण्याची मागणी केली आहे.

या निवेदनात नगर परिषदेच्या अकार्यक्षमतेवर संताप व्यक्त करत यंदा देखील पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, गटारी सफाई, मच्छर नियंत्रण, फॉगींग मशीन वापर आदी बाबतीत कोणतीही ठोस कृती न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जाईल असा स्पष्ट इशारा दिला आहे. नगर परिषदेमध्ये मागील तीन वर्षांपासून प्रशासक राज असल्यामुळे मुख्याधिकारी स्वतःला "मुघलकालीन बादशहा" किंवा "ब्रिटीशकालीन गव्हर्नर" समजू लागल्याचा आरोप करत निवेदनात म्हटले आहे की, जनतेच्या आरोग्याशी सर्रास खेळ होत असून कोणतीही प्रशासनिक संवेदना शिल्लक राहिलेली नाही. गेल्या वर्षी अशाच प्रकारे नालेसफाई न केल्यामुळे एका महिलेचा गटारात पडून मृत्यू झाला होता, परंतु त्यातून कोणताही बोध घेण्यात आला नाही. तसेच सफाई कामांची फक्त वरवरची दिखावट करून बोगस बिले काढली जात असल्याचा आरोप आरोग्य विभागावर करण्यात आला आहे.

नगरपरिषदेच्या फॉगींग मशिनचा वापर सध्या होताना दिसत नसल्याने, ती मशिन अदृश्य झाल्याची शक्यता वर्तवून जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः याचा तपास करावा अशी मागणी करण्यात आली आहे. शहरात खासगी व शासकीय रुग्णालयांमध्ये डेंग्यू व इतर संसर्गजन्य आजारांचे रुग्ण वाढत असताना मच्छर नियंत्रणासाठी कोणतीही ठोस कार्यवाही होताना दिसत नाही, हे अत्यंत गंभीर असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गुरुदेव सेवा संघ व नागरिकांच्या वतीने प्रशासनाला इशारा देण्यात आला आहे की, भविष्यात जर डेंग्यू किंवा नाले-गटारे यांच्यामुळे कुणाचा जीव गेला तर संबंधित अधिकाऱ्यांविरोधात थेट सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल. असा इशारा यावेळी नागरिकांनी व सामाजिक कार्यकर्ते मनोज गेडाम यांनी व्यक्त केली आहे.

## वेचक



### १० विद्यार्थ्यांची राष्ट्रीय विद्यापीठांत निवड; १००% शिष्यवृत्तीने गौरव

यवतमाळ : सावित्री ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळच्या १० विद्यार्थ्यांची अझीम प्रेमजी, महिंद्रा व शिवनाडर या देशातील नामवंत विद्यापीठांमध्ये निवड झाली असून त्यांनी १००% शिष्यवृत्ती मिळवून महाविद्यालयाचा राष्ट्रीय स्तरावर गौरव वाढविला आहे. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील हे विद्यार्थी एम.ए. एज्युकेशन, डेव्हलपमेंट व रुरल मॅनेजमेंट अशा अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित झाले आहेत. त्यांच्या यशात महाविद्यालयीन शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य व एकलव्य इंडिया फाउंडेशनचे योगदान मोलाचे ठरले आहे. हे यश ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, उच्च शिक्षणाची दारे आता अधिक खुली झाली आहेत.



### सराटी येथे अज्ञात इसमाने लावली गोठ्याला आग

राळेगाव - राळेगाव पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या सराटी येथील शेतकरी नारायण लक्ष्मन शहारे यांचे शेत गावाला लागूनच असलेल्या गोठ्याला काल रात्री अंदाजे 8.30 वाजता शेतातील गोठ्याला आग लावली या आगीत शेतातील 90 स्प्रिंकलर पाईप मोटर तसेच गुरांचा चारा जळून खाक झाला त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आज रस्त्याने ऐ जा करनाऱ्या नागरिकांना हि आग दिसताच शेतकरी नारायण शहारे यांना फोन करून आगीची माहिती दिली तो पर्यंत गुरांचा गोठा पुर्ण पणे जळून खाक झाला.आज रोजी शेतकरी आशीष शहारे यांनी राळेगाव पोलिस ठाण्यात रितसर तक्रार केली .पुढिल तपास राळेगाव ठाणेदार शितल मालते यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार सुभाष काळे , निलेश पवार हे करित आहे अज्ञात आरोपी विरुद्ध राळेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


### जिल्हा बँकेची एसआटीमार्फत चौकशी करा, विदर्भ शेतकरी संघटनेची मागणी

पुसद - नुकतेच चौकशी करून दोषी असल्या पैकी चार कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात आली होती त्यामुळे विदर्भ शेतकरी संघटनेच्या वतीने उपविभागीय अधिकारी पुसद यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन एसआयटी मार्फत चौकशीची मागणी करण्यात आली आहे. यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आतापर्यंत तपासणी केली असता २५ कोटींच्यावर अनियमितता उघड झाल्याचे सत्य विदर्भ शेतकरी संघटनेच्या समोर आले आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेची एसआयटी मार्फत तत्काळ चौकशी करून जोशी असलेल्या सर्वांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी विदर्भ शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी व शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी पुसद कार्यालया मार्फत निवेदनाव्दारे केली आहे. दि. 4 ऑक्टोबर 2024 रोजी बँकेच्या अनियमिततेची तक्रार याआगोदर तत्कालीन सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याकडे केली होती. दि.25 एप्रिल रोजी सहकार राज्यमंत्री बाळासाहेब पाटील यांना बँकेच्या अनियमिततेची चौकशी एसआयटीमार्फत करावी. अशी तक्रार खडकेकर यांनी दिली होती. त्याचाही अहवाल अद्याप पर्यंत प्राप्त झाला नाही असेही निवेदनात म्हटले आहे. यावेळी विदर्भ शेतकरी संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, उपाध्यक्ष राजेश साळुंखे, सचिव विजय उबाळे, कार्याध्यक्ष भवरसिंग सिसोदिया, अशोक बब्बर आदी उपस्थित होते.

# यवतमाळात 13 जून रोजी वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध "भव्य मानव शृंखला"

## हजारो मुस्लिम नागरिकांचा सहभाग; संविधानाच्या संरक्षणासाठी लोकशाही मार्गाने लढा

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - केंद्र सरकारच्या वक्फ सुधारणा कायदा 2025 विरोधात संपूर्ण देशभरात ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड (AIMPLB) च्या नेतृत्वाखाली जनजागरण आणि विरोध आंदोलन सुरू असून, याच पार्श्वभूमीवर यवतमाळ शहरात शुक्रवार, 13 जून 2025 रोजी एक भव्य मानव शृंखला (ह्युमन चेन) उभारण्यात येणार आहे.

वक्फ बचाओ - दीन बचाओ अभियान अंतर्गत होणाऱ्या या आंदोलनात यवतमाळातील हजारो मुस्लिम नागरिक, युवक आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. दुपारी 2.30 वाजता कळंब चौक ते संविधान चौकपर्यंत ही मानव शृंखला उभारण्यात येणार असून, शारदा चौक, शनी मंदिर चौक, तहसील चौक, नेताजी चौक यांसारख्या प्रमुख ठिकाणांवर ती पोहोचेल. वक्फ सुधारणा कायदा 2025 विरोधात यापूर्वी यवतमाळात बत्तीगुल आंदोलनही पार पडले असून, हे आंदोलन त्यानंतरचे सर्वात मोठे जनआंदोलन ठरणार आहे. AIMPLB यवतमाळ जिल्हा वर्किंग कमिटी आणि वक्फ बचाओ दीन बचाओ अभियान समितीमार्फत मोठ्या प्रमाणात जनजागरण सुरू आहे. या आंदोलनाला यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष मुफ्ती इनामुल्लाह खान, मौलाना शरिक मजाहिरी, डॉ. शेख मुजीब, मुफ्ती सोहेल, हाफिज शेर खान, शकील अहमद खिजर, जिया मिनाई, निसार फारुकी, फरहान मुजतबा आदींसह अनेक सामाजिक कार्यकर्ते व धर्मगुरु सज्ज झाले आहेत. विविध जमात, संघटना आणि नागरिकांना या लोकशाही आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# बाजार समितीच्या सभापतीपदी कृष्णा पाटील देवसरकर तर उपाध्यक्षपदी श्रीपाल आडे

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड - दि. 31 मे रोजी पार पडलेल्या उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत भाजपा प्रणित वसंतराव नाईक सहकारी पॅनलने 18 पैकी 11 जागांवर दणदणीत विजय मिळवून आपले बहुमत सिद्ध केल्याने आज दि 11जून रोजी झालेल्या सभापतीच्या निवडणुकीत कृष्णा पाटील देवसरकर यांना 18 पैकी 11 मते तर उपसभापती पदासाठी श्रीपाल आडे यांनाही 18 पैकी 11 मते मिळवून निवड होऊन सत्ता काबीज करण्यात आली आहे.

कृषीउत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात आज दि 11 जून रोजी निवडणूक निर्णय अधिकारी ओंकार पहूकर यांनी सभापती व उपसभापती निवडणूक प्रक्रिया पार पाडली . सभापती पदासाठी भाजपा प्रणित पॅनेलचे कृष्णा पाटील देवसरकर तर काँग्रेस प्रणित शेतकरी सहकारी पॅनलचे प्रविण पाटील मिरासे या दोघांनी नामांकन दाखल केले होते . यामध्ये कृष्णा पाटील देवसरकर यांना 18 पैकी 11 मते मिळाली तर प्रविण पाटील मिरासे यांना 18 पैकी 7 मते मिळाली . यामध्ये कृष्णा पाटील देवसरकर हे विजयी झाले तर उपसभापती पदासाठी भाजप प्रणित पॅनेलचे श्रीपाल आडे यांनी तर काँग्रेस प्रणित पॅनलचे राजेश कवाने यांना 18 पैकी 7 मते मिळाली. त्यामुळे कृष्णा पाटील देवसरकर हे सभापती तर श्रीपाल आडे हे उपसभापती पदासाठी निवडून आल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी घोषित केले. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमुळे नुकतेच भाजपामध्ये भाजपामध्ये प्रवेश केलेले माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर यांनी भाजपच्या अधिपत्याखाली प्रथमच आपली राजकीय इनिंग सुरू केलेली असताना त्यांना सुरुवातीलाच हे यश प्राप्त झाल्यामुळे व भाजपाने ही सहकार क्षेत्रात पाय रोवले असल्यामुळे भाजपा सह त्यांचे सहकारी पक्ष नेत्यामध्ये व कार्यकर्त्यामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले निवडीनंतर झालेल्या विजयी सभेत भाजप नेते नितिन भुतडा, आमदार किसन वानखेडे ,माजी आमदार विजय खडसे, डॉ विजयराव माने ,डॉ अंकुश देवसरकर, नितीन माहेश्वरी,सुदर्शन रावते, गणेशराव नरवाडे, महेश काळेश्वरकर ,भगवान अग्रवाल, रमेश चव्हाण, रमण पाटील रावते, एड. युवराज पाटील देवसरकर, शाहुराज देवसरकर आदी नेते मंडळी नी विजयी सभेला संबोधित केले.

# मुख्याधिकारी डॉ. पल्लवी सोटे यांच्यावर गंभीर आरोप

## चार नगरसेवकांनी मुख्यमंत्र्यांकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी



बाभूळगाव – नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी डॉ. पल्लवी सोटे यांच्या कार्यकाळात झालेल्या विविध कामांमधील आर्थिक अनियमिततेबाबत उच्चस्तरीय चौकशी व्हावी, अशी मागणी करणारे निवेदन बाभूळगावचे गटनेते व तीन नगरसेवकांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या मार्फत पाठविले आहे.


या निवेदनावर नगरसेवक अनिकेत पोहकार, चंद्रकांत परचाके, अभय तालेड आणि वृंदाताई डॉ. गणेश पिसे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनात नगरपंचायतीच्या कारभारात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला असून, याप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करून संपत्ती जप्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. नगरपंचायतीने डम्पिंग ग्राउंडसाठी खरेदी केलेली तीन एकर जमीन बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत महागात घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रत्यक्षात ५-७ लाख प्रति एकर दर असताना, २३ लाख रुपये एकर दराने जमीन खरेदी करण्यात आली. तसेच, शेतात रस्ताही नसून तेथे पोहोचण्यासाठी अतिरिक्त कोट्यवधींचा खर्च अपेक्षित आहे.

नगरसेवक चंदू परचाके यांचे ठिय्या आंदोलन गेल्या सहा दिवसांपासून सुरू असून, नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. नागरिकांमध्येही चौकशी झाल्यास अनेक मोठे गैरव्यवहार उघडकीस येतील, अशी प्रतिक्रिया उमटत आहे. नगरसेवकांच्या या निवेदनामुळे बाभूळगाव नगरपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, राज्य शासनाकडून कोणती कार्यवाही होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

इतर कामांतील संशयास्पद व्यवहार : दोन कोटी रुपयांत बांधण्यात आलेल्या नगरपंचायतीच्या इमारतीवर पुढे १.४७ कोटी रुपये फर्निचरवर खर्च करण्यात आला. २५ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेसाठी टाकण्यात आलेल्या पाइपलाइनमुळे नव्याने बांधलेले रस्ते खोदण्यात येत असून, सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याचे चित्र आहे. स्थायी समितीला असलेल्या अधिकाराच्या पलीकडील निविदा मंजूर करण्यात आल्या. गरज नसताना भूमिगत ड्रेनेज योजनेचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

# विविध संस्थेद्वारा गुणवंतांचा सन्मान संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी



वणी - येथील नगर वाचनालय, मित्र मंडळ, विदर्भ साहित्य संघ व प्रेस वेल्फेअर असोसिएशन या संस्थे मार्फत दिनांक 10 जूनला नगर वाचनालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी गटशिक्षणाधिकारी उत्तम गेडाम हे उपस्थित होते.बक्षीस वितरक म्हणून भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक निरंजन पवार, अतिथी म्हणून प्रेस वेल्फेअर असोसिएशन चे अध्यक्ष रवी बेलुरकर, नगर वाचनालयाचे सचिव गजानन कासावार हे उपस्थित होते.

वणी शहरातील इयत्ता 10 वी12 वी मध्ये प्रत्येक विद्यालयातून सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या तीन विद्यार्थ्यांचा रोख रक्कम व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.या प्रसंगी बक्षीस वितरक निरंजन पवार यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून आपल्या गावासह आईवडील व देशाचे नाव मोठे करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय भाषण करताना उत्तम गेडाम यांनी गुणवंतांना आपल्या देशातील प्रतिभावंतसोबत जागतिक स्पर्धेत उतरून जगातील प्रतिभावंतांशी स्पर्धा करण्यासाठी समोर यावे.तशी प्रतिभा आपल्यामध्ये आहे.

असे बोलून विविध उदाहरना द्वारे या विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन कासावार यांनी केले. सुत्रसंचालन विदर्भ साहित्य संघ वणी शाखेचे कार्यक्रम प्रमुख राजाभाऊ पाथ्रडकर यांनी केले. आभार प्रदर्शन रवी बेलुरकर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नगर वाचनालयाचे देवेंद्र भाजीपाले, प्रमोद लोणारे, राम मेंगावार, सुनीता राठोड यांनी परिश्रम घेतले.

# प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिक बेहाल

## नालीचे पाणी पात्रिकर कॉलनीतील रहिवाशांच्या घरात

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
शहरातील बसस्थानका मागील वस्तीगृह व बसस्थानक परिसरातील दूषित पाण्यामुळे पात्रिकर कालनीतील लोकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याने नागरिकांनी नगरपरिषद व सार्वजनिक बांधकाम विभागांकडे निवेदन देऊन निराकरण करावे अन्यथा आंदोलन करण्याचाही इशारा दिला.

नगरपरिषदेचा कारभार हा मागील काही वर्षापासून प्रशासनाच्या हातात असल्याने नागरिकांना मोठा त्रास होत आहे. तक्रार दिल्यानंतर दखल घेऊन समस्यांचे निराकरण करण्यासाठी कुणीही जबाबदार अधिकारी नगरपरिषद मध्ये उपस्थित नाही. शहरातील वसतीगृहातील तसेच बसस्थानक परिसरातील संपूर्ण घाणीचे दूषित पाणी पात्रीकर कॉलनीतील नागरीकांच्या घरात घुसत असून जनतेचे आरोग्य धोक्यात येत आहे.



परीसरातील नागरीकानी सार्वजनिक बांधकाम व नगरपालिका प्रशासनाकडे समस्या सोडविण्यासाठी निवेदन दिले. सदर घाणीचे दूषित पाणी हे वनविभाग समोरील नाली व्यवस्थीत नसल्याने व साफसफाई न केल्याने लोकांच्या घरात शिरते म्हणून स्थानिक लोकांनी नगरपरिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देऊन जनतेच्या समस्यांकडे जातीने लक्ष घालत निराकरण करावे अन्यथा आंदोलन करण्याच्या इशारा सदर निवेदनातून नागरीकांनी दिला आहे.


यावेळी सतिश चौधरी, शैलेंद्र दुबे,जयराम टावरी,विशाल आमले,अनिकेत काळे, अक्षय परडके,विलास ठाकरे,प्रेमचंद मीना,शोभा कावलकर, दुर्गा इंगळे, संगिता जाधव,प्रमिला लादे,मनिषा शेळके,सुधाकर झोड, मुकुंद सावंत, श्वेता मेश्राम,हितेश शेळके, ओमप्रकाश टावरी, ज्योती फुलाडी, प्रेरणा सोळंके, ज्योती सराड, वैशाली राऊत व इतर नागरीकानी निवेदन दिले.

# शेवरी मुंडा वनक्षेत्रात वाघाची दहशत

## तीन गाईंची केली शिकार

**धारणी/वार्ताहर**
गुगामल वन्यजीव विभागांतर्गत येणाऱ्या हरिसाल वनपरिक्षेत्रातील शेवरी मुंडा वनक्षेत्रात मागील आठवड्यात वाघाने मुन्नू जावरकर या साठ वर्षे वृद्धाची शिकार करून फक्त त्यांचे हाडाचे अवशेष शिल्लक ठेवले होते. तीच वाघाची दहशत पुन्हा कायम असून पुन्हा त्याच परिसरात हरिसाल गावातील दोन पशुपालकांच्या तीन गाई वाघाने फस्त केल्याची माहिती पशुपालकासह वनविभागाकडून मिळाली आहे.

रस्त्याने शेवरीमुंडा वन क्षेत्रात मागील आठवड्यात मुन्नू जावरकर या साठ वर्षीय वयोवृद्धाची वाघाने शिकार करून त्यांचे फक्त हाडाचे अवशेष जंगलात शिल्लक ठेवले



होते. त्या शिकारीचे भय आदिवासी बांधवांच्या मनातून संपले नसताना त्याच्याच दुसऱ्या दिवशी गुरुवारला हरिसाल येथील पशुपालकांनी त्यांची जनावरे चराईकरिता जंगलात नेले असता पशुपालक रमेश गोसाजी शनवारे यांच्या मालकीच्या दोन गाई, तर नानुबाई रघुनाथ पंडोले यांची एक गाय वाघाने फस्त केल्या आहे. या घटनेची माहिती दोन्ही पशुपालकांनी शनिवारला हरिसाल वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयात दिली.

त्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली केली असता तेथे त्यांना तीन गाईची शिकार केल्याची आढळून आले हरिसाल परिसरातील काही गावांमध्ये त्या नरभक्षी वाघाची दहशत अजूनही कायम असून वनविभाग त्याबाबत काय पवित्रा घेतात, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अकरावीच्या प्रवेशाला आजपासून प्रारंभ

**अमरावती/ का.प्र.**
अकरावीच्या प्रत्यक्ष प्रवेशाला १२ जूनपासून सुरुवात होणार आहे. यामध्ये शून्य प्रवेश, व्यवस्थापन कोटा, संस्था अंतर्गत इनहाऊस कोटा व अल्पसंख्याक कोट्यांतर्गत प्रवेश निश्चित केला जाणार आहे. याचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे.

२६ जूनला पहिली गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे.अकरावीच्या ४११८० जागासाठी २६ मे पासून प्रवेश प्रक्रिया सुरू झाली. २३ हजार ६९४ विद्यार्थ्यांनी मंगळवारपर्यंत नोंदणी केली असतानाच या नोंदणीला दोन दिवसांची म्हणजे ५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यामुळे ५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यातआली होती. त्यामुळे जूनपर्यंत २७ हजार ७८५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. यापैकी २५ हजार ५३२ विद्यार्थ्यांनी शाळा पसंतीदेखील दिली आहे.मुदत वाढीमुळे आता अकरावीचे सुधारित वेळापत्रक शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात



आले आहे. त्यानुसार १२ ते १४ जून दरम्यान शून्य प्रवेश, व्यवस्थापन कोटा, संस्था अंतर्गत इनहाऊस कोटा व अल्पसंख्याक कोटा अंतर्गत प्रवेश निश्चित केले जातील. २६ जूनला प्रथम फेरीची गुणवत्ता यादी प्रसिध्द केली जाणार आहे. २७ ते ३ जुलैदरम्यान प्रथम फेरीच्या गुणवत्ता यादीनुसार प्रवेश निश्चित केले जाणार आहे, अशी माहिती प्रवेश समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी दिली.

# स्मशानभूमीत वडाचे झाड लावून दिला सकारात्मक संदेश

**वरुड/वार्ताहर**
परंपरेला नव्याने अर्थ देत वरुड शहरातील रणरागिणी महिला ग्रुपने यंदाची वटपौर्णिमा आगळीवेगळी पद्धतीने साजरी केली. त्यांनी हिंदू स्मशानभूमीत वडाचे झाड लावून हा सण साजरा करत समाजात सकारात्मक संदेश दिला त्यांच्या या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे .

यावेळी ग्रुपच्या नेत्या सोनल चौधरी यांनी सन साजरे करताना समाजासाठी काहीतरी चांगले करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे महिला कोणत्याही संकटात असतील तर आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहू असे मत व्यक्त केले. यावेळी सोनल अग्रवाल, प्रज्ञा बोडखे, अरुणा बेहरे, माधुरी भगत, वंदना बेलसरे, दीपा जावरकर, प्रतीक्षा खापरे व प्रभाबाई यांनी देखील सहभाग नोंदवला रणरागिणी ग्रुपच्या या उपक्रमामुळे स्त्रीसक्षमीकरणाबरोबर सोबतच पर्यावरण रक्षणाचाही संदेश समाजात पोहोचला असून त्यांची ही सामाजिक जाणीव प्रेरणादायी ठरत आहे .

# मनपास्तरीय पाठयपुस्तक वितरणाचा शुभारंभ

**अमरावती/का.प्र.**
समग्र शिक्षा अंतर्गत शासकीय,जि.प.मनपा, खाजगी व अंशता अनुदानीत शाळांना मोफत पाठयपुस्तक वितरण करण्यात येत असते. त्याच अनुषंगाने महानगरपालिका परीक्षेत्रातील एकुण २०७ शाळांना मनपा स्तरावरुन पाठयपुस्तकाचे वितरण करण्यात येणार आहे. यामध्ये मराठी हिन्दी उर्दु व इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा समावेश आहे. एकुण ४६५९० विद्यार्थीना याचा लाभ मिळणार आहे.

२ लाख ९०हजार पुस्तकांचे

## ४६,५९० विद्यार्थ्यांना मिळणार लाभ



वाटप करण्यात येणार आहे. त्या वाटपाचा शुभारंभ महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या हस्ते म.न.पा.मराठी शाळा क्र. १३ चपराशीपुरा व म न पा उर्दु शाळा क्र.०६ चपराशीपुरा येथुन दि. १० जुन रोजी करण्यात आला आहे. शहरातील सर्व शाळांना शाळा शुभारंभ अनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी पुस्तक प्राप्त होतील याप्रकारचे नियोजन महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे. या शुभारंभ प्रसंगी अमित डेंगरे सिस्टीम मॅनेजर हे आर्वजुन उपस्थित होते. या पाठयपुस्तक वितरणाचे काम डॉ.प्रकाश मेश्राम शिक्षणाधिकारी म.न.पा. यांच्या मार्गदर्शनात करण्यात येणार आहे. या शुभारंभ प्रसंगी गोपाल कांबळे केंद्रसमन्वयक, पंकजकुमार सपकाळ सहायक क्रार्यक्रम अधिकारी, संजय बेलसरे, योगेश राणे, निजामुद्दीन काझी, शुभांगी सुने, सुषमा दुधे विषयतज्ञ या उपस्थित होते.

# शालेय जीवनात उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी 'सक्षम' कार्यक्रम ठरला प्रभावी

**अमरावती/का.प्र.**
युवकांमधील उद्योजकतेला चालना देण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत. याच अनुषंगाने शासनाच्या बरोबरीने सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून गत दोन वर्षांत नागपूर आणि अमरावती जिल्ह्यात शासकीय व अनुदानित शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये 'उद्यम लर्निंग फाउंडेशनच्या' माध्यमातून 'सक्षम' हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. यातून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये उद्यमशील मानसिकता विकास कार्यक्रम प्रभावी ठरल्याचे निष्पन्न झाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून हा उपक्रम राबविण्यात आला होता. उद्यम लर्निंग फाउंडेशन ही मेकिन महेश्वरी यांनी ना-नफा तत्वावर स्थापन केलेली संस्था असून १४



ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये प्रकल्पाधारित शिक्षणातून उद्यमशील मानसिकता व कौशल्ये विकसित करणे तसेच शिक्षकांना अध्यापनाच्या कौशल्यांमध्ये प्राविण्य मिळवून देणे ही या संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या 'सक्षम' कार्यक्रमाची उद्दिष्टे निश्चित केली होती.विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, आत्मविश्वास आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढवण्यास हा कार्यक्रम मदत करणार असून या माध्यमातून राज्यातील १७ हजार शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधून सुमारे ४५ लाख विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. संस्थेने आतापर्यंत १२ राज्यांतील सरकारी शाळा, महाविद्यालय, आयटीआय संस्थांमध्ये २९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना उद्योजकीय शिक्षण दिले आहे.

'उद्यम' मार्फत राज्यात आतापर्यंत नागपूर जिल्हा परिषदेच्या ३० शाळांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्यात आला असून ४० प्रकल्पांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. अमरावती जिल्हा परिषदेच्या २१२ शाळांतील आठ हजार विद्यार्थ्यांसोबत कार्यक्रम राबविण्यात आला असून २०२५-२६ मध्ये ४०० शाळांमध्ये विस्तार करण्यात येणार आहे. राज्यात १५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या सक्षम कार्यक्रमामार्फत २५०० हून अधिक व्यवसाय कल्पना सादर करण्यात आल्या, १५०० प्रोटोटाइप तयार झाले, तर ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्पादनांची विक्री केली. एकूणच विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत सकारात्मक बदल दिसून आला असून, ५०० शिक्षकांना उद्योजकतेसंबंधी प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती उद्यम लर्निंग फाउंडेशनच्या वतीने देण्यात आली आहे.

## खरीप हंगामात गरजू पारधी बंधूंना बियाणांची मदत

**अमरावती/का.प्र.**
प्रज्ञा प्रबोधिनी अमरावतीच्या स्व.नानाजी कृषी सहाय्यता योजने अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील गरजू पारधी बंधूंना खरीप हंगामात सोयाबीन बियाणे निःशुल्क रोटरी क्लब अमरावतीचे सहकार्याने करण्यात आले.हा वितरण सोहळा विवेकानंद छात्रावासात संपन्न झाला. सोहळ्याला रोटरी क्लब चे गव्हर्नर खुराणा, नागपूर,सत्र २०२७-२८साठी होणारे अध्यक्ष किशोर राठी,रोटरी क्लबचे अध्यक्ष अजय पिंपळगावकर याशिवाय रोटरीचे पदाधिकारी शशांक विश्वरूपे, आनंद साठे, घनश्याम राठी, उमेश नावंदर, सुनिल चितळे, राजश्री सरोदे याशिवाय प्रज्ञा प्रबोधिनीचे अध्यक्ष अविनाश देशपांडे, कोषाध्यक्ष जयंत खंदारकर, कार्यकारिणी सदस्य अजय देशपांडे, जयंत देशपांडे, सुनिल वेळूकर, किशोर दुधक्के उपस्थित होते. मंचावर विराजमान असलेले खुराणाजी यांचे स्वागत अविनाश देशपांडे यांनी केले. किशोर राठी व अजय पिंपळगावकर यांचे स्वागत सुद्धा अविनाश देशपांडे यांनी केले.कार्यक्रमास उपस्थित असलेले रोटरीचे पदाधिकारी श्री.शशांक विश्व रूपे,आनंदजी साठे,उमेश नावंदर,सुनिलजी चितळे, घनश्यामजी राठी यांचे स्वागत अजय देशपांडे,सुनिल वेळूकर,जयंत देशपांडे यांनी केले. राजश्री.सरोदे यांचे स्वागत पिंकी भोसले यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष अविनाश देशपांडे यांनी केले. यावेळी शशांक विश्वरूपे,खुराणा व अजय पिंपळगावकर यांनीही आपले यथोचित मनोगत व्यक्त केले. यानंतर १५गरजू पारधी बंधू शेतकऱ्यांना सोयाबीनचे बियाणे रोटरीचे पदाधिकारी खुराणा, किशोर राठी, शशांक विश्वरूपे यांचे हस्ते देण्यात आले. अविनाश देशपांडे यांनी रोटरी क्लबचे पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

# जिद्दीच्या जोरावर 'तो' बनला मर्चंट नेव्ही अधिकारी

**वडिलांचे स्वप्न मुलाने केले पुर्ण!**

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी**
जिद्द मेहनत आणि चिकाटी असली की कोणतीच गोष्ट अशक्य नसते याचाच प्रत्यय अंजनगाव सुर्जी साईधाम येथील रहिवासी दूरसंचार टेलिकॉम चे कर्मचारी विलास पिंपळकर यांनी खरा करून दाखवला आणि त्यांनी पाहिलेल्या स्वप्नाला गवसणी घातली त्या करिता त्याच्या मुलांनीही त्याच पद्धतीने साथ दिली. शिवम विलास पिंपळकर याला अभ्यासाच्या जोरावर नेव्ही मर्चन्टमध्ये अधिकारी पदाकरिता निवड झाली. साईधाम नगर येथील शिवम पिंपळकर यांची वयाच्या २२ वर्षी मर्चंट नेव्हीमध्ये अधिकारीपदी निवड झाली. एका सर्व सामान्य कुटुंबातील युवकाने मर्चंट नेव्ही मध्ये अधिकारी होण्याचा मान मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.दूरसंचार टेलिकॉमचे कर्मचारी विलास पिंपळकर टेलिकॉम टेक्निशियन पदावर अंजनगाव सुर्जी कार्यालयात कार्यरत असलेले माझी नियुक्ती दुबई, साऊथ आफ्रिका येथे झाली असून जहाज चालवण्याची प्राथमिक जबाबदारी शिकणे तसेच नेव्हिगेशन, सुरक्षा आणि समुद्रातील शिस्तबद्ध जीवनशैली आत्मसात करणे यांवर केंद्रित आहे. हे क्षेत्र अत्यंत आव्हानात्मक असून जगभर फिरण्याची संधी चांगला पगार आणि आपल्या देशाचे नाव उज्वल करण्याचे भाग्य मला सर्वांच्याच मार्गदर्शनाने लाभले आहे असे मत शिवम व्यक्त केले आहे.



यांचा मुलगा शिवम याला लहानपणापासून नेव्ही मध्ये विशेष आकर्षण होते. शिवम इयत्ता पहिली पासूनच शाळेत नेत्रदीपक कामगिरी बजावत राहिला इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९२ टक्के तर बारावीत ९० टक्के गुण मिळविले होते.मुलाची जिद्द पाहून आवडीनिवडी ओळखून वडील विलास व आई संगिता पिंपळकर यांनी शिवमची जिद्द पाहून त्यानंतर पुढील शिक्षणासाठी नवी मुंबई येथे टी.एस.चाणक्य, इंडियन मेरिटाइम युनिव्हर्सिटी नवी मुंबई येथे पाठविले.शिवमने बी. एस्सी नॉटिकल सायन्स ची तीन वर्षात पदवी प्राप्त करून वयाच्या अवघ्या २२ वर्षी मर्चंट नेव्ही मध्ये अधिकारी म्हणून निवड झाली. मर्चंट नेव्ही ही आंतरराष्ट्रीय व्यापारी जहाजांची सेवा असून ती संपूर्ण जगभरात वस्तू जसे की कंटेनर्स, तेल, धान्य, यंत्रसामग्री इत्यादींची वाहतूक केली जाणारी जगातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय व्यापारी वाहतूक करणारी शिस्तबद्ध आणि जबाबदारीची सेवा बजावणारी कंपनी आहे.शिवमची अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## संक्षिप्त

### आज जागतिक बालकामगार विरोधी दिन

**अमरावती-**कामगार विभागातर्फे जागतिक बालकामगार विरोधी दिन गुरुवार,१२ जून रोजी साजरा केला जाणार आहे.बालकामगारांच्या समस्येकडे लक्ष वेधणे आणि त्याचे निर्मुलन करण्यासाठी प्रयत्नाची दिशा ठरविणे शक्य व्हावे, हा या बालकामगार विरोधी दिवसाचा उद्देश आहे. जिल्ह्यातील कारखाने, वीटभट्टी, खडीक्रशर, हॉटेल, दुकाने, चहाटपरी, गॅरेज आदी ठिकाणी बालकामगार कामावर ठेवण्यास कायद्याने मनाई आहे. या ठिकाणी १४ वर्षाखालील मुलांना कामावर ठेवल्यास संबंधित आस्थापना मालकाच्या विरोधात बालकामगार प्रतिबंधक व नियमन अधिनियम १९८६ आणि सुधारणा २०१६ अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे, असे कामगार उप आयुक्त कार्यालयातर्फे कळविण्यात आले आहे.

### दृष्टीबाधितांची राज्यस्तरीय खुली निवड बुध्दिबळ स्पर्धा आजपासून

**अमरावती-** 'व्हिजन इंटेग्रीटी डेव्हलपमेंट असोशिएशन अमरावती सह महाराष्ट्र दृष्टीहीन संघ महाराष्ट्र, सक्षम शाखा वर्धा, ऑल मराठी चेस असोसिएशन फॉर द व्हिज्युअली चॅलेंज यांच्या संयुक्त विद्यमाने ऑल इंडिया चेस फेडरेशन ऑफ द ब्लाईन्ड यांच्या मान्यतेने १२ ते १५ जुन २०२५ दरम्यान वर्धा येथे दृष्टीबाधित खेळाडूंची राज्यस्तरीय खुली निवड बुध्दिबळ स्पर्धा - २०२५ आयोजित करण्यात आली आहे.उद्घाटक म्हणुन आर्वी विधानसभा मतदार क्षेत्राचे आमदार सुमित वानखेडे आणि महाकाली शिक्षण संस्था वर्धाचे अध्यक्ष शंकरराव अग्नीहोत्री लाभणार असुन प्रमुख अतिथी म्हणुन सतीश शेंडे, पुंडलिक मसराम, दत्तात्रय जाधव, रवि कुमार, डी.एन, मरडे, शेख नुरुद्दीन, संजय घोडेराव राहणार आहेत.स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील निवडक उत्कृष्ट २०० दृष्टीहीन बुद्धिबळपटू सहभागी होणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांची निवास, भोजन, प्रवास व तत्सम व्यवस्था निशुल्क करण्यात येणार असुन त्यांचा स्पर्धेत सहभाग सुद्धा नि: शुल्क राहणार असल्याची माहिती' अमरावती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रितेश वाघमारे यांनी दिली.१२, १३ व १४ जुन या दरम्यान सहभागी खेळाडूंना बुद्धिबळचे एकुण ०९ राऊंड खेळावे लागणार असुन यामध्ये त्यांनी मिळविलेल्या जास्त पॉईंटसच्या आधारे त्यांची पुढील चेस चॅम्पियनशिपसाठी निवड होणार आहे.



### शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रम

**तिवसा-**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोझरी येथे शिवराज्याभिषेक दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आभासी पद्धतीने उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केले. कार्यक्रमाला आभासी पद्धतीने राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्रालयाचे मंत्री मंगल प्रभात लोढा उपस्थित होते.कार्यक्रमाला तिवसा विधानसभा क्षेत्राचे आमदार राजेश वानखेडे उपस्थित होते. प्रमुख वक्ता म्हणून शेखरजी भातकुले यांनी 'नागरी कर्तव्य व शिष्टाचार'विषयावर मार्गदर्शन करीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.प्रास्ताविक गावंडे यांनी केले मुख्य वक्त्यांनी शिवाजी महाराज हे आजच्या युगातील मॅनेजमेंट गुरु आहेत असे म्हटले. आमदार राजेश वानखडे यांनी महाराजांच्या युद्धनीती बद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन राऊत ,भेंडे , देशमुख , नवनियुक्त सदस्य रुपेश राऊत, भूषण यावले , प्राचार्य वाडके हे उपस्थित होते. संचालन मेंढे व आभार प्रदर्शन बेले यांनी केले.यशस्वीतेकरिता संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

### अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला



**बेलोरा :** आज ११जून रोजी सकाळी ७:३० वा शिवाजी नगर स्वामी समर्थ केंद्र, चांदुर बाजार येथे अंदाजे ४५ वर्षे वयोगटातील अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला आहे. सदर इसमार्च्या डोक्याचे केस आणि दाढी वाढली असून रंग सावळा आहे. उंची ५.५ इंच, अंगात लाल रंगाचे टिशर्ट आणि काळ्या रंगाच्या बाहया, निळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातला आहे. सदर घटनेची नोंद पोलिस स्टेशन ला११जून रोजी सकाळी ०९:२३ वाजता केली आहे. सदर वर्णाच्या इसमास कोणी ओळखत असल्यास त्यांनी पोलस स्टेशन चांदुर बाजार येथे पो. नि. संतोष ताले मो. न. ९७६५६७७३७३व जी.पो.उप.नि विनोद इंगळे मो. न. ९७६७१०९४४७ यांच्याशी संपर्क साधावा.

### रश्मी खंडार यांचे निधन



**चांदूररेल्वे-**शहरातील प्रतिष्ठित शासकीय कॉन्ट्रॅक्टर सचिन खंडार यांची पत्नी व गाडगेबाबा व्यापारी संघाचे अध्यक्ष प्रतापराव खंडार यांच्या स्नुषा रश्मी सचिन खंडार हीचे वयाच्या ३५ वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. तिच्या मागे पती सचिन व दिड वर्षाची मुलगी, सासरे,सासु,दिर असा मोठा आप्त परीवार आहे.

## करावरील व्याज रद्द करण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



**चांदुर रेल्वे/वार्ताहर**
नगरपालिका क्षेत्रातील थकीत मालमत्ता करावर आकारण्यात येणारे २४% व्याज दर रद्द करण्यात यावे, याकरिता शहर भाजपा अध्यक्ष नंदा वाधवानी यांच्या नेतृत्वात मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

शहरातील नगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या नागरिकांच्या घर टॅक्स किंवा इतर थकीत मालमत्तेवर नगरपालिकेकडून दंडात्मक कारवाई म्हणून मागील अनेक वर्षा पासून २४% व्याजदर आकारले जात आहे. नागरिकांच्या थकीत मालमत्ते वरील हे व्याजदर रद्द करण्यात यावे म्हणून १० फेब्रुवारी रोजी निवेदन देण्यात आले होत.पण, याची कोणतीही दखल घेण्यात आली नाही. म्हणून १० जून रोजी पुन्हा थकीत मालमत्तेवरील व्याजदर कमी करून या अगोदर व्याजाच्या स्वरूपात घेण्यात आलेली रक्कम पुढील मालमत्ता करा मध्ये समाविष्ट करण्यात यावी, असे सुद्धा दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. यावेळी भाजपा शहर

# बालकामगार प्रश्नाला प्रत्येक क्षणी विरोध व्हावा

बाल कामगारांची वाढती संख्या हा जगापुढील फार मोठा प्रश्न आहे. जागतिक कामगार संघटनेच्या वतीने (आयएलओ ) २००२ पासून 'जागतिक बालकामगार विरोधी दिन' साजरा केला जातो. संस्थात्मक पातळीवरूनही त्याबाबत आवाज उठवला जातो. हे सारे अत्यावश्यक आहे यात शंका नाही. मात्र तरीही बदलत्या भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये बालकांचे कामगार या नात्याने होणारे शोषण वाढतच आहे ही अतिशय चिंतेची बाब आहे. गेल्या वर्षी 'वॉक फ्री' संस्थेचा जो अहवाल आला त्यात आधुनिक गुलामगिरीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे हे स्पष्ट झाले. अर्थातच त्या आधुनिक गुलामगिरीत बालकामगारच अधिक अडकलेले आहेत हेही खरे आहे. संयुक्त राष्ट्र संघाने २०२५ पर्यंत बालमजुरी प्रथा नष्ट करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते .पण ते उद्दिष्ट पूर्ण करता येईल अशी आज भारतीयच काय जागतिक पातळीवरही परिस्थिती नाही.

आज भारताची लोकसंख्या जगात सर्वात जास्त आहे. १४३ कोटींच्या आपल्या देशामध्ये बाल कामगारांची आजवरच्या जनगणनेतून अधिकृतरित्या पुढे आलेली आकडेवारी धक्कादायक आहेच. २०२१ ची जनगणना अजून झालेली नाही. पण तरीही वास्तवातील आकडेवारी त्याहूनही भयावर चित्र निर्माण करणारी असणार यात शंका नाहीं. आज जगामध्ये साधारणतः २५ कोटींहून अधिक मुले बालकामगार आहेत. त्यापैकी एक तृतीयांश भारतीय आहेत. याचाच अर्थ जगातील तीन बालकामगारांपैकी एक बालकामगार आपल्या देशात आहे. तसेच या एकुणामध्ये २५ टक्के मुलींची संख्या आहे. श्रम आणि रोजगार मंत्रालय, बाल विकास मंत्रालय अनेक योजना आखत असते. पण त्या राबवल्या जातात की नाही याची शंका आहे. कारण बाल कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे हे वास्तव आहे.

समाजकारण, राजकारण, अर्थकारण या सगळ्यामध्ये बाल कामगारांचे स्थान काय आहे, त्यांचे भवितव्य काय आहे याची चर्चा केली जात नाही हे वास्तव आहे. करोनाच्या भयावह परिस्थितीनंतर तर यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. ऑनलाइन शिक्षण पद्धतीच्या आग्रही काळामध्ये इंटरनेटसह इतर सुविधा सर्वत्र पुरेशा उपलब्ध नसल्याने, त्या स्वस्त नसल्याने शिक्षणाच्या प्रक्रियेतून गरीब कुटुंबातील लाखो मुले बाहेर गेलेली आहेत. परिणामी ती बालकामगार बनलेली आहे.

ज्या बालकाने वयाची १४ वर्ष पूर्ण केलेली नाहीत पण ज्याला रोजगार करावा लागतो त्याला बालकामगार म्हणतात अशी सर्वसामान्य व्याख्या आहे. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या प्रकरणांमध्ये कलम १२ ते ३५ यामध्ये मूलभूत अधिकारांची मांडणी केलेली आहे. त्यामध्ये समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, शोषणाविरुद्धचा अधिकार, धर्म स्वतंत्र्याचा अधिकार, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार, संवैधानिक उपाय योजनाचा अधिकार याची चर्चा केली आहे. यापैकी शोषणाविरुद्ध अधिकाराच्या कलम २४ मध्ये बालकामगार ठेवण्यास प्रतिबंध करण्याची स्पष्ट ताकीद आहे. कलम २४ म्हणते १४ वर्षे वयाखालील कोणत्याही बालकाला कोणत्याही कारखान्यात व खाणीत काम करण्यासाठी नोकरीवर ठेवले जाणार नाही. अन्य कोणत्याही धोक्याच्या कामावर त्याची योजना केली जाणार नाही. राज्यघटना हे सांगते मात्र याची अंमलबजावणी



किती होते हा खरा कळीचा मुद्दा आहे.

भारतातील कोणत्याही राज्यात उपहारगृहे, पेट्रोल पंप, वाहन दुरुस्ती दुकाने, फेरीवाले, वृत्तपत्र विक्रेते, फटाके उद्योग या सर्वत्र ठिकाणी बालकामगार मोठ्या संख्येने दिसून येतात. घरोघरी काम करणाऱ्या बाल कामगारांची संख्या ही मोठी आहे. एक गोष्ट स्पष्ट आहे की कोवळी मुले स्वतःहून कामावर दाखल होत नाहीत. त्यांचे पालकही फार राजीखुशीने आपल्या पोटच्या गोळ्यांना कामावर धाडत नाहीत. तरीही बालकामगारांची संख्या वाढती आहे, याचे मुख्य कारण दारिद्र्य हेच आहे. आणि त्याचबरोबर शिक्षणाचा अभावही त्याला कारणीभूत आहे. भारतातील ८० कोटी लोकांना मोफत अन्नधान्य उपलब्ध करून द्यावे लागते असे केंद्र सरकारनेच जाहीर केले आहे. याचा अर्थ तेवढी जनता गरीब आहे. दारिद्र्य रेषेखाली आहे. मग अर्थातच यामध्ये बालकामगारांची संख्या फार वेगाने वाढत आहे स्पष्ट आहे. म्हणून त्याचे गांभीर्य मोठे आहे.

बालकामगार कायद्यामध्ये या वयोगटातील मुलांकडून होणाऱ्या गुन्ह्याची जशी चर्चा आहे तशीच त्या मुलांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांची चर्चा आहे. मुलांना बळजबरीने दारू पाजणे, अंमली पदार्थांची चटक लावणे, तंबाखूचे व्यसन लावणे विविध कारणांसाठी किंवा हेतूसाठी मुलांची खरेदी विक्री करणे, बालसुधारगृहात मुलांना केली जाणारी शारीरिक शिक्षा, सर्व बालसंगोपन केंद्रावर नोंदणीची सक्ती आणि नोंदणी न केल्यास शिक्षेची तरतूद, मुलांना दत्तक घेण्यासंबंधीचा कायदा अशा अनेक गोष्टी या कायद्यात आहेत. पण त्याकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होत.

ज्या वयात खेळायचे, नाचायचे, बागडायचे, शिकायचे, लिहायचे, वाचायचे त्या वयात दोन्ही हात आठ दहा तास कामात गुंतलेले राहणे याचा दुसरा अर्थ एका व्यक्तिमत्त्वाचा विकास पूर्णपणे खुंटवणे असते. म्हणूनच वर्षातला एखादा दिवस (१२ जून) बाल कामगार विरोधी दिन म्हणून साजरा न करता हा विरोध प्रत्येक दिवशी, प्रत्येक क्षणी कसा राहील याची मानसिकता निर्माण केली पाहिजे. संसदीय लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये बालकांचे असे शोषण होणे भूषणावह नसते. म्हणूनच बालकामगार निर्माण होऊ नयेत अशा समाजव्यवस्थेच्या दिशेने जाणारी धोरणे राबवणे, त्याची कटाक्षाने अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. (साभार म.टा)

**प्रसाद माधव कुलकर्णी**

# बालकामगारांची परिस्थिती आणि भवितव्य

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या वतीने २००२ पासून बालकामगार रोखण्यासाठी लोक जागृती वाढविण्याच्या हेतूने जागतिक बालकामगार विरोधी दिन आयोजित केला जातो. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या(आय एल ओ) म्हणण्यानुसार १४ वर्षाखालील जी मुले स्वतःच्या आणि परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी मोल मजुरी तसेच मेहनतीची कामे करून उदरनिर्वाह करतात त्यांना बालकामगार असे म्हटले आहे.बाल कामगारिता सामाजिक कलंक आहे. बाल कामगारिता प्रामुख्याने गरीब देशांमध्ये ठळकपणे आढळून येते.

विकसनशील देशाच्या यादीत असलेल्या भारताची ही समस्या आजही कायम आहे. वेगवान आर्थिक प्रगती करणाऱ्या भारताला बाल कामगारितेवर विशेष लक्ष देणे क्रमप्राप्त ठरते. भारतात बालकामगार विरोधी कायदे झाले असले तरी बालमजूरांच्या संख्येत घट न होता ती कायमच दिसते. याचे मूळ कारण आर्थिक व सामाजिक परिस्थिती होय. आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी महानगरात ट्रॅफिक सिग्नल जवळ काही वस्तू विकणारी मुले,हॉटेल बसस्थानके, रेल्वे स्टेशन, पाणी खाद्यपदार्थाची विक्री करणारी मुले, खानावळीमध्ये टेबल साफ करणारी, शहरात कचरा वेचणारी,तर ग्रामीण भागात वीटभट्टीवर काम करणारी,शेतीत राबणारी या आणि अशा अनेक ठिकाणी लहान मुले मजुरी करताना दिसतात. काही सामाजिक संस्था कार्यकर्त्यांनी तक्रार केली असता अशा ठिकाणी धाडी पडतात.पण काही दिवसांनी परिस्थिती जैसे थे कायम असते.अशांनी हे समस्या मुळात मिटणारी नसून त्याचे खरे मूळ समाजाच्या आर्थिक परिस्थिती मध्ये दडलेले आहे. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावल्यामुळे बालकांच्या बौद्धिक,शारीरिक, विकासाच्या काळात अंग मेहनत करावी लागते हे समाजाच्या असमतोलपणाचे लक्षण होय.

अशा बालमजुरी करणाऱ्या पालकांशी संवाद साधला असता असे निदर्शनास येते की, त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती हलाखीची आहे. स्थलांतरित कुटुंबातीलचं मुले प्रामुख्याने बालमजूरीकडे वळलेली दिसतात.'कमावते हात कमी आणि खाणारी तोंडे जास्त' त्यामुळे मुलांना कामावर पाठविण्याशिवाय गत्यंतर नाही असे दबक्या आवाजात बोलले जाते.अनेक बालकांचे पालक व्यसनाधीन आहे त्यामुळे आपल्या पाल्यांच्या बौद्धिक, शैक्षणिक,सामाजिक परिस्थिती संभाव्य सुधारणा होणे होण्याची शक्यता धूसर असते.बालमन लवचिक असते. त्यांना आपल्या हक्कांची आणि कायद्यांची जाणीव नसल्यामुळे नकळत बालके कामात गुंतली जातात. अल्प मोबदल्यात अधिक काम करून घेणाऱ्यांची मानसिकता समाजात वाढताना दिसून येते. याकडे दुर्लक्ष होता कामा नये. कायद्यांचा कुठलाही जरब नसल्यामुळे बालकांना वेठबिगारी कामात गुंतवणाऱ्या टोळ्या मात्र निर्माण व्हायला नको

परिणामी अशा बालकामगारांना अनेकदा लैंगिक शोषणाला सामोरे जावे लागल्याची अगणित प्रकरणे पुढे आलेली आहेत. सतत स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुली कामासाठी बाहेर पडतात आणि अधिक कामाच्या मोबदल्यापाई कामावर ठेवली जातात. विकृत समाजाच्या मानसिकतेची वक्रदृष्टी त्यांच्यावर पडते.तिथे त्यांचे लैंगिक शोषणास प्रारंभ होतो.बहुतेक मुली ह्या परिस्थितीमुळे वेश्या व्यवसायाकडे लोटल्या गेल्या आहेत. एवढेच नव्हे तर अनेकांची विक्री सुद्धा



होते. धर्मांतरण, फूस लावून पळून नेणे अशी प्रकरणे अलीकडच्या काळात आढळून आली आहे. अनेक बालकांच्या कोवळ्या मनाचा फायदा घेऊन भीक मागण्यास प्रवृत्त केले जाते. तर काहींची वाटचाल अत्यंत धोकादायक अशा गुन्हेगारी प्रवृत्तीकडे होत असते.सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत खितपत पडलेले कुठल्या वळणावर जातात हे बघण्याचे नैतिक कर्तव्य शासन,प्रशासन, सुज्ञ समाजभान ठेवणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांवर येऊन ठेपलेली आहे. बालकामगार विरोधी दिनाच्या निमित्याने याचेही चिंतन व्हायला हवे..!

**शशिकांत मधुकर तोटे**
दारव्हा, जि. यवतमाळ
मो :९१३०८३५४५८

# बालकामगार प्रथा बंद करण्यासाठी जनजागृतीची गरज

संपूर्ण जगभरात बालकामगार विरोधी दिन दरवर्षी १२ जून रोजी पाळण्यात येतो. बालमजुरीला आळा घालण्यासाठी बालकामगार प्रथा कायमची बंद करण्यासाठी मोठ्या प्रमाणात समाजामध्ये सामाजिक जागृती घडून यावी याकरिता १२ जून २००२ पासून जागतिक कामगार संघटनेच्या वतीने बालकामगार विरोधी दिनाची सुरुवात करण्यात आली. संपूर्ण जगभरात जागोजागी सुरू असलेल्या बालमजुरी, बालकामगार प्रथेवर समाजाचे लक्ष केंद्रित करण्याकरिता आणि त्यावर कायमस्वरूपी आळा घालण्याच्या उद्दिष्टासाठी जागतिक बालकामगार विरोधी दिवस पाळला जातो. १४ वर्षांखालील जी मुले स्वत:च्या आणि आपल्या परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी, रोजगार कमवितात त्यांना बालकामगार म्हणतात. ज्या



वयात शाळेत जावून शिकायचे, खेळायचे, बागडायचे त्या वयात हातात झाडू घेऊन साफ-सफाई करायची, भांडी, कपडे धुवायचे, विटा उचलायच्या, दगड फोडायचे अशी अनेक कामे करावी लागतात.

या बालकामगारांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्यावतीने जिल्हास्तरावर राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविण्यात येतो. अमरावती जिल्ह्यात २००४ पासून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पांतर्गत ९ ते १४ वयोगटातील धोकादायक, व्यवसायामध्ये काम करणाऱ्या बालकामगारांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यात येते. प्रकल्पाचा मुख्य उद्देश बालकामगारांचा त्यांच्या कामापासून परावृत्त करून शैक्षणिकदृष्ट्या सक्षम बनविणे व त्यांच्या पालकांचा आर्थिक स्तर उंचावणे, त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हा आहे. अमरावती जिल्ह्यात सध्या एकूण ३७ विशेष प्रशिक्षण केंद्र विविध वस्त्यांमध्ये कार्यान्वित आहेत. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात साधारत: १५० कर्मचारी काम करीत आहेत. या प्रकल्पांतर्गत बालकामगारांना विविध कौशल्य विकास योजनांचा लाभ मिळवून देण्यात येतो.

# पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षण मिळावे

**सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. महिलांप्रमाणेच पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.**

औरंगाबादेतील वाळूंज भागातील पत्नीपीडित पुरुषांच्या आश्रमात काही पत्नीपीडित पुरुषांनी वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पिंपळपूजन करून पिंपळपौर्णिमा साजरी केली. हे पुरुष दरवर्षी पिंपळपौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात. हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात.

काही महिन्यांपूर्वी बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली. या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगामध्ये पाठवले होते. काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली. अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण



नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. आताही काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यातील उरुळी येथे एका तरुणाने याच कारणाने आत्महत्या केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचनात आली. महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. महिलांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याचा अलीकडे मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या माध्यमातून पती आणि सासरच्या लोकांविरुद्ध वैयक्तिक सुड उगवला जात आहे. महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा अशाप्रकारे दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते. पत्नीवर अन्याय करणाऱ्या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. महिलांप्रमाणेच पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# बळीराजा आता तरी, ... बळी पडू नको!

आतापर्यंत महाराष्ट्राच्या इतिहासात शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी अनेक आंदोलने झालीत,पुढेही महाराष्ट्रातच नव्हे तर,देशात हे आंदोलने चालूच राहतील. देशाच्या दिल्ली बॉर्डरवरील हरियाणा,पंजाब आंदोलनावेळी' केजरीवाल सरकारने अनेक महिने मदत केली.तेच खऱ्या अर्थाने शेतकरी आंदोलन होते.केंद्र सरकार हे शेतकऱ्याचे मानगुटीवर बसले आहे,त्या आंदोलनातूनच तर फारसे निष्पन्न निघाले नाही. आता मोझरी गुरुकुंज आश्रम (अमरावती. महाराष्ट्र) येथील स्टंटबाजी आंदोलनाला शेतकरी नेते रघुनाथ दादा पाटील, ॲड सुभाष खंडागळे,प्रकाश पोहरे, धनंजय पाटील काकडे,संजय कोल्हे,शिवाजी नाना नांदखिले, बाबुरावजी बुलढाणा,पंकज भाऊ अनेक मित्रमंडळी व महिलांनी व इतर अनेक संघटनांनी पाठिंबा नाही, असे जाहीर केले.अशी आंदोलने शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी कमी व स्वतःच्या प्रसिद्धीसाठी जास्त असतात.या आंदोलनाला विरोध नाही,तर त्यातील ध्येय,मर्म, उद्दिष्ट हे सर्व समजून घेण्यासाठी विरोध आहे. कारण ती आजची गरज आहे? आजपर्यंत 'आंधळा दळतो व कुत्र पीठ खातो' हीच गत शेतकऱ्यांची झाली आहे.अशी होणारी आंदोलने जनतेलाच आता तपासावी लागेल.

यापूर्वी शेतकऱ्यांच्या ध्येयासाठी,न्यायासाठी व समृद्धीसाठी स्व. शरद जोशी यांनी अनेकदा उपोषणे केलीत. हजारो नव्हे तर लाखो लोकांची मोर्चे, शेतकरी आंदोलने करीत संघर्ष वाढविला. परंतु अशा मागणीतून फक्त तुडके - थोडके- मोडके उत्तरे निघतात व दबावाचे वातावरण झाल्याचे दिसते.हातमिळवणी होऊन अशी आंदोलने विझतात.त्यातून फक्त राजकीय नेते स्वतःचा स्वार्थ साधतात.शेतकऱ्यांच्या नावावर नेते तयार होतात. आणि अशा चिल्लर व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांचे खऱ्या आर्थिक स्वातंत्र्याला मात्र बाधा तयार होते, हेच आजपर्यंतच्या अनेक बाहेरील स्टंटबाजीच्या शेतकरी नेत्याच्या आंदोलनातून सिद्ध झाले.शेतकऱ्यांना कायमची मुक्ती मिळवायची असेल तर शेतकरी विरोधी कायदे रद्द करावे लागतील. शेतकऱ्यांच्या बाजूने आर्थिक धोरणे तयार करावी लागते. त्यासाठी प्रचंड शक्तीने आमदार-खासदार हे शेतीशास्त्र व शेतकरी व्यवस्थेच्या विचाराचे परिपूर्ण असावे लागतील. एक-दोन चिल्लर नेत्यांनी हा प्रश्न मिटणारा नाहीतर त्यातून देश पातळीवर प्रचंड दबाव तयार होईल,तेव्हाच काहीतरी निष्पन्न होईल.यासाठी असंख्य आमदार-खासदार केंद्रात हाऊस मध्ये पाठवावे लागेल.हा प्रश्न रस्त्यावर



न मांडता हाऊसमध्येच मांडावा लागेल. तेव्हाच खऱ्या अर्थाने शेतकरी क्रांती होईल.त्यासाठी खऱ्या अर्थाने आजपर्यंत ४५ वर्ष शेतकरी संघटनेचे बिल्ले लावून कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रात तर सहकार्य केले तेच खरे तुमचे या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे साथीदार आहेत. तेच या आंदोलनाचे खरे सारथी आहेत.स्वार्थी राजकीय स्टंटबाजीसाठी निवडणुका लढतात व मोठ्या राजकीय पक्षाची ताबेदारी,हुकुमदारी स्वीकारून, जनतेला बेवकूफ बनवितात. ही अशी नौटंकी आंदोलने फक्त शासनाच्या तिजोऱ्या लुटण्यासाठी व हाऊस मध्ये जाण्यासाठी, नेतेगिरी केली जातात.

७५ वर्ष काँग्रेस व बीजेपी सरकारने शेतकऱ्यांना मातीत घातले. आत्महत्या घडविल्यात तेव्हा तर एकाही आमदाराने राजीनामा नाही दिला ?त्यावेळी शरद पवार ,उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्या समोर तर तुम्ही नाचत होते? ज्या मतदार काँग्रेस व बीजेपीचे मतदार जनतेची मते विकून अपक्ष राहून,राष्ट्रपती,उपराष्ट्रपती निवडणुकीला सौदेबाजी होत होती. तेव्हा तुकडोजी महाराज, गाडगे बाबा कोठे गेले होते? तेव्हा तर तुम्ही राजकीय मंडळी त्यांच्याशी भिका मागून जगत होती. मंत्री पदाचा राजीनामा घेऊन तर मंत्रिपद, मिळविण्यासाठी या नेत्यांच्या मागे मागे फिरत होते. म्हणूनच म्हणावे वाटते..'बळीराजा आता तरी,...... बळी पडू नको. आणि या स्वार्थी दुकानदारांच्या मागे आता तरी लागू नको. तेव्हाच तुझे व तुझ्या मुलाबाळांचे भविष्य अंधारातून उजेडात येईल.'नाहीतर बळीचे बकरे अजून तुला खेळायला व गुलाम बनवायला तयार आहेत.

असेच एकदा सर्व नेते एकत्र येऊन एक जून २०१७ मध्ये (शेतकरी संपावर, पुणतांबा , जिल्हा अ.नगर.). येथे आंदोलन झाले होते, त्याची घोषणा नाशिक येथे कृषी उत्पन्न बाजार समितीचे आवारात सर्व महाराष्ट्रातील मातब्बर शेतकरी नेते हजर असताना झाली होती. ते एक महाराष्ट्रातील सुकाणू समितीच्या नावाने शेतकरी क्रांतीचे आंदोलन होते. तेच सुकाणू समितीचे आंदोलन फोडणारे सुद्धा हेच काही नेते पुढील विधानसभेच्या निवडणुका पाहून शरद पवारांचे दास व भामटे बनले होते. व महाराष्ट्रात एक क्रांतिकारी आंदोलनाच्या निमित्ताने सुकाणू समितीचा याच चारपाच नेत्यांनी सत्यानाश केला. म्हणजे यातून खरा शेतकरी प्रश्न मार्गी लावायचे की शेतकऱ्यांच्या नावावर स्टंटबाजी करायची हे जनतेलाच आता ठरवावे लागेल ? मोर्शी धरणाचे पाणीपुरवठा चे पाणी कुठे मुरले? गुवाहाटीचे ओके , बोके खोके, कसे काय संपले?, भीक मागून आंदोलन करणारे आज करोडपती,अबजोपती कसे झाले ?कोणत्या खात्यातील किती किती भ्रष्टाचार झाला व का करण्यात आला? हे आकडेवारीने सांगावे.याची सर्व जनतेने शहानिशा करावी. ४५ वर्षे शेतकरी संघटनेचे आंदोलन करणारे नेते,हे स्टंटबाजी नेत्यांचे कसे काय सोबती झाले? व का सोबत घेऊन नाचू लागले, यांनीही स्पष्ट करावे? विधान सभेत तुमचे पाणी कसे जनतेनी मुरविले त्यामुळे शेतकरी संघटनेच्या आंदोलनात सुद्धा पाणी मुरत आहे काय ?.हे आता स्पष्ट झाले पाहिजे ? हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे व कर्मयोगी गाडगेबाबांचे कार्य नव्हे, तर त्यांचे नावे ही फक्त राजकारणाची भंपकबाजी आहे.पुढील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या म्हणजे जिल्हा परिषद, पंचायत समिती , महानगरपालिका व इतरही निवडणुकीच्या माध्यमातून हे असे स्टंटबाजीचे प्रश्न तयार होत असतात. यातून फक्त नेते मोठे होतात, जनता मात्र हात हलवत घरीच बसते. आता यापुढे जनतेने स्वतःचे ध्येयधोरणे वापरून,अशा आंदोलनात सहभागी व्हावे लागेल, व तपासणी,खात्री करून , पाठिंबा द्यावा लागेल. कोणत्याही शेतकरी आंदोलनाला आमचा विरोध नाही , पण ते आंदोलन कोणत्या मार्गाने चालत आहे, याचा मात्र नक्कीच आता जनतेला विचार करावा लागेल. आता आंदोलनाची ध्येयनिष्ठा तपासल्याशिवाय सहकार्य करता येणार नाही.एवढे मात्र निश्चित!

**धनंजय पाटील काकडे**
**शेतकरी-वारकरा, कष्टकरी महासंघ**
**मो.९८९०३६८०५८.**

# विकासासाठी मतदान करा, महायुतीच्या पाठीशी उभे रहा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी अकोल्यात विकास संवाद सभेतून जनतेला आवाहन केले की, 'सर्वांगीण विकासासाठी, घरकुल मिळवण्यासाठी, लखपती दिदी करण्यासाठी आणि आतंकवादाचा समूळ नाश करण्यासाठी भाजपा महायुतीच्या पाठीशी उभे रहा व मतदानाच्या माध्यमातून आशिर्वाद द्या.'

अकोला येथील स्थानिक क्रिकेट क्लब मैदानावर भर पावसात पार पडलेल्या या जंगी सभेत मुख्यमंत्री बोलत होते. त्यांनी अकोला विमानतळासाठी भरघोस निधी देण्याचे आश्वासन दिले आणि शेतकऱ्यांना २४ तास मोफत वीज देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी अकोला शहरातील भूमिगत गटार योजनेसाठी आवश्यक असलेल्या निधीपैकी ३० टक्के रक्कम शासन देईल, अशीही घोषणा केली. त्यांनी राजराजेश्वर मंदिराला 'ब' वर्ग दर्जा देऊन ५० कोटींचा निधी, न्यू तापडिया नगर येथे उड्डाणपुलासाठी निधी, पशुसंवर्धन कार्यालय अकोल्यात सुरु करणे, आणि औद्योगिक वसाहतीसाठी २०० हेक्टर भू-संपादन करण्याची घोषणा केली.





या कार्यक्रमात माजी आमदार किसनराव राऊत यांचे नातू अजिंक्य राऊत, विजय सिरसाट यांनी भाजपात प्रवेश केला. तसेच बुलढाणा जिल्ह्यातील काँग्रेसचे माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश वनारे, सुरेशसिंह तोमर, प्रकाश नरवाडे आदी अनेक पदाधिकाऱ्यांनी भाजपात प्रवेश केला.

कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपा प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले, पालकमंत्री आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आ. रणधीर सावरकर, आ. प्रकाश भारसाकळे, आ. हरिष पिंपळे, आ. वसंत खंडेलवाल, डॉ. रणजीत पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते. सभेसाठी जय्यत तयारी करत सुमारे २००० कार्यकर्ते सहभागी झाले होते. आरोग्यसेवेचे आयोजन डॉ. प्रवीण अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. शहरातील विविध भागांतून मोटरसायकल रॅलीद्वारे नागरिक सभेसाठी दाखल झाले. पावसातही मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ शर्मा यांनी केले, तर आभार प्रदर्शन विजय अग्रवाल यांनी केले.

### विकास संवाद सभेने गर्दीचा उच्चांक गाठला

मुख्यमंत्री फडणवीस यांना शेतकऱ्यांच्या प्रतीक असलेली बैलबंडी भेट देण्यात आली. सभेला अकोल्यातील सर्वच सामाजिक घटकांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संपूर्ण २२ किमी परिसरात भाजपाच्या जनतेतील लोकप्रियतेचे दृश्य उभे राहिले.

## पावसाळ्या पूर्वी नाल्याची सफाई करा; मुंडगाव ग्रामस्थांची मागणी

### मूलभूत सुविधांचा प्रश्न ऐरणीवर, मान्सूनपूर्व कामांचा बोजवारा

■ प्रतिनिधी | अकोट ■

मुंडगाव (ता. अकोट) येथे सध्या मूलभूत सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला असून, मान्सूनपूर्व तयारीतील गोंधळामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. नालेसफाई, कचरा व्यवस्थापन आणि वीजपुरवठा या अत्यावश्यक सेवांमध्ये प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.



सध्या गावात नालेसफाईची कामे अत्यंत धीम्या गतीने सुरू असून अनेक ठिकाणी नाले गाळाने भरलेले आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पाणी तुंबण्याची भीती व्यक्त होत आहे. तसेच, सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा वेळेवर न उचलल्याने दुर्गंधी पसरली आहे.

कचराकुंड्या वेळेवर रिकाम्या न होणे, कचरा उचलण्यासाठी अपुरे मनुष्यबळ आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांची कमतरता ही स्थिती अधिकच बिकट करत आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया यासारख्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनावर दुर्लक्षाचा आरोप करत, तातडीने उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे. 'पावसाळा सुरू होण्यापूर्वी नालेसफाई पूर्ण करावी, नियमित कचरा व्यवस्थापन करण्यात यावे, वीजपुरवठा सुरळीत ठेवावा आणि आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवावी' अशी मागणी नागरिक करत आहेत.

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, जर वेळेत लक्ष न दिल्यास येत्या पावसाळ्यात गावात आरोग्य व नागरी सुविधांच्या दृष्टीने गंभीर संकट ओढावू शकते. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ हालचाल करून गावातील नागरिकांचा विश्वास संपादन करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पवन पाडिया यांच्या नेतृत्वात पायी रॅली



**अकोला :** राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांची शहरातील अकोला क्रिकेट क्लब मैदानात विकास संवाद सभा बुधवारी दुपारी पार पडली. यावेळी स्थानिक चावरे प्लॉट ते सभास्थळापर्यंत माजी नगरसेवक पवन पाडिया यांच्या नेतृत्वात पायी रॅली काढण्यात आली. यावेळी पवन पाडिया, संतोष यादव, मीत पाडिया, अविनाश पाथरोड, शिवम ठाकूर, राकेश यादव, रितेश तिवारी, चेतन भूरमूड, संतोष कांबळे, कृष्णा यादव, अश्विन गायकवाड, संध्या साठे यांच्यासह परिसरातील नागरिक, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**हरविले आहे**

सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, मी दीपक हरिदास गोल्डे वय ५९ रा. भावसारपुरा, बार्शिटाकळी. माझी ओरिजनल ( मूळ ) कागदपत्रे असलेली पिशवी ज्यामध्ये बीएससी ची (टी.सी) शाळा सोडल्याचा दाखला, आणि बीएससी फायनल वर्षाची गुण पत्रिका असे कागदपत्रे होते. सदर पिशवी ३० मे २०२५ रोजी दुपारी बार्शिटाकळी बाजार लाइन ते तहसील कार्यालय बार्शिटाकळी या मार्गावर कुठेतरी गहाळ झाली. सदर पिशवी व कागदपत्रे गहाळ झाल्याप्रकरणी बार्शिटाकळी शहर पोलिस ठाण्यात २ जून २०२५ रोजी रीतसर तक्रार दिली आहे.

सदर पिवळ्या रंगाची पिशवी अथवा कागदपत्रे कोणाला आढळून आल्यास त्यांनी संपर्क साधावा, त्यांना यथोचित बक्षीस देण्यात येईल.

सही
**दीपक हरिदास गोल्डे**
रा. भावसार पुरा, बार्शिटाकळी
मोबा : ८२७५२१९१७१

**जाहीर नोटीस**

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९२७/२०२५ — प्रोसेस नं.८२०७/२०२५
चौ.ता. २४/०६/२०२५ — दिनांक : १३/०५/२०२५

**अर्जदार :** १) रुख्मीणी रामदास इंगळे. २) नितीन रामदास इंगळे ३) निलेश रामदास इंगळे क्र. १ ते ३ रा. कस्तुरबा हॉस्पीटल मागे, रमेश नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ४) सरला उमेश शिरसाट रा. होसारी मिल, नालंदा कॉलनी, भिम नगर, जुने शहर, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामदास नारायण इंगळे
**पत्ता :-** रा. कस्तुरबा हॉस्पीटल मागे, रमेश नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामदास नारायण इंगळे यांचे दि.०९/०७/२०२२ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०६/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०५/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९१७/२०२५ — प्रोसेस नं.७९९८/२०२५
चौ.ता. २३/०६/२०२५ — दिनांक : ०८/०५/२०२५

**अर्जदार :** १) गोपालराव किसनसा रवाळे २) रामदास किसनसा रवाळे दोघे रा. पातूर नंदापूर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १ किसनसा शिवरामसा रवाळे २ जनाबाई किसनसा
**पत्ता :-** रा. पातूर नंदापूर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले की, मयत क.१. किसनसा शिवरामसा रवाळे यांचे दि.१९/०८/१९८४ रोजी पातूर नंदापुर अकोला. ता. जि. अकोला येथे व मयत क. २. जनाबाई किसनसा रवाळे यांचे दि.२१/०१/२००४ रोजी पातूर नंदापूर अकोला, ता जि अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनाक २३/०६/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल.ह्याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०५/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०३रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९१९/२०२५ — प्रोसेस नं.८६१०/२०२५
चौ.ता. ०५/०७/२०२५ — दिनांक : ०९/०६/२०२५

**अर्जदार :** १. जयवंत ज्ञानदेव वसू २. लक्ष्मण ज्ञानदेव वसू दोघेही रा. सुकळी नंदापूर, पो. देवळी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : ज्ञानदेव नरसिंग वसू.
**पत्ता :-** रा. सुकळी नंदापूर, पो. देवळी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ज्ञानदेव नरसिंग वसू. यांचे दि. २०/१२/२००२ रोजी रा. सुकळी नंदापूर, पो. देवळी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९१८/२०२५ — प्रोसेस नं.८२०४/२०२५
चौ.ता. १९/०६/२०२५ — दिनांक : १३/०५/२०२५

**अर्जदार :** १) देवलाल बाबन सारसे रा. सुकळी नंदापुर, पो. देवळी, ता. जि. अकोला ४४४१०२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. बाबन झाबुजी सारसे २. मणकर्णा बाबन सारसे
**पत्ता :-** रा. सुकळी नंदापुर, पो. देवळी, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत क. १. बाबन झाबुजी सारसे यांचे दि.१७/०८/२०१७ रोजी व मयत क. २. मणकर्णा बाबन सारसे यांचे दि. ०७/०३/२०२० रोजी सुकळी नंदापुर, पो. देवळी, अकोला, ता. जि अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०६/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०५/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९२१/२०२५ — प्रोसेस नं.८२०१/२०२५
चौ.ता. १८/०६/२०२५ — दिनांक : १३/०५/२०२५

**अर्जदार :** १) मनोरमा शांताराम कांबे २) शांताराम आनंदराव कांबे दोघेही रा. सुकळी नंदापूर, पो. देवळी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : हरीश शांताराम कांबे
**पत्ता :-** रा. सुकळी नंदापूर. पो. देवळी, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत हरीश शांताराम कांबे यांचे दि. ०७/०९/२०१२ रोजी सुकळी नंदापूर पो. देवळी. अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०६/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०५/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# नगर परिषद कार्यालय बाळापूर जि. अकोला.

प्रसिध्द दिनांक ११/०६/२०२५

## निविदा सुचना

खालील दर्शविण्यात आलेली कामांची निविदा मागविण्यात येत आहेत. कोरी निविदा प्रपत्रे बी-१ ची असून निविदा प्रसिध्द पासून दिनांक १२/०६/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत पर्यंत रोख रक्कम भरून खालील दर्शविल्याप्रमाणे कामाची निविदा मिळतील तसेच दिनांक १९/०६/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत स्विकारण्यात येतील व सिलबंद निविदा दिनांक २०/०६/२०२५ रोजी सका ११ वा. संबंधित निविदाधारक यांचे समक्ष अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत | को-या निविदा प्रपत्र किंमत | इसारा बयाणा रक्कम रुपये | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | बाळापूर शहरातील विविध प्रभागातील रस्त्या लगतचे सि. कों नाल्या बांधणे / दुरूस्त करणे | ९४५४६८ | १००० | १०००० | आदेश मिळल्यापासून मार्च २०२६ पर्यंत |
| 2 | बाळापूर शहरातील विविध प्रभागातील रस्त्या लगतचे आवश्यक त्या ठिकाणी लोंखडी जाळी बसविणे. | ९४२१९१ | १००० | १०००० | |
| 3 | बाळापूर शहरातील विविध प्रभागातील ठिकाणी मुरूम पुरवठा करून पसरविणे. | ९४६६०७ | १००० | १०००० | |
| 4 | बाळापूर शहरातील विविध प्रभागातील ठिकाणी क्रशर डस्ट पुरवठा करून पसरविणे. | ९४७१२९ | १००० | १०००० | |
| 5 | बाळापूर शहरातील विविध प्रभागातील रस्त्याचे डांबरी पॅचेस रस्ते दुरूस्त करणे | ९५०६८७ | १००० | १०००० | |
| 6 | बाळापूर शहरातील विविध प्रभागातील रस्त्या लगतचे सि.कॉ ढापे बांधणे / दुरूस्त करणे. | ९४२५४७ | १००० | १०००० | |
| 7 | नगर परिषद कार्यालयातील किरकोळ कामे करणे | ९४८१४९ | १००० | १०००० | |

**अटी व शर्ती**

१. वरील कामाची निविदा प्रपत्र शुल्क व कामाची अनामत रक्कम ऑफलाईन द्वारे भरणा करावी. अन्य कोणत्याही मार्गाने भरणा केल्यास निविदा ग्राह्य समजण्यात येणार नाही.
२. सदर अंदाजपत्रकामध्ये GST चा स्वतंत्र समावेश करण्यात आलेला आहे. कंत्राटदार यांनी सविस्तर अंदाजपत्रक पाहुनच सादर करण्यांत यावी.
३. निधीच्या उपलब्धतेनुसार पार पडलेल्या कामाचे भुगतान करण्यात येईल. ह्या कारणामुळे झालेल्या विलंबाबत कोणत्याही प्रकारचा व्याज व दावा ऐकल्या जाणार नाही....
४. सदर कामास भाववाढ लागू राहणार नाही.
५. बालकामगार कामावर ठेवता येणार नाही
६. सदर कामाची निविदा मंजुर झाल्यानंतर नियमानुसार शासकीय विमा योजना, कामार कल्याण उपकर, इतर चा भरणा कंत्राटदारास करावा लागेल.
७. सदर कामाची कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्याचे अधिकार तसेच अटी व शर्ती कमी/जास्त करण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद बाळापूर यांनी राखुन ठेवले आहेत.
८. काढण्यात आलेल्या निविदेत किंमतीनुसार राजमुद्राकार (stamp paper) कामाचा करारनामा करून देणे बंधनकारक राहील.
९. अनामत रकमेत सुट मिळण्याबाबत प्रमाणपत्र ग्राह्य धरल्या जाणार नाही.
१०. सदर काम करतांना आवश्यक संरक्षणात्मक उपाय योजना करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेन न केल्यास होणाऱ्या जीवित हानीस व वित्त हानीस कंत्राटदार जबाबदार राहील. केंद्र व राज्य शासनाचे कामगार सुरक्षेविषयक सर्व कायदे व नियम सदर निविदा प्रक्रियेस लागू राहतील.
११. वरील कामाच्या साहित्याच्या गुणनियंत्रक बाबत आवश्यक चाचण्या स्वखर्चाने निविदा धारकांस सादर करावे लागेल.
१२. सदर कामामध्ये लेखा परीक्षणात कोणत्याही प्रकारचे लेखा आक्षेप आल्यास वसुलपात्र रक्कम संबंधित कंत्राटदार यांच्याकडून वसुल करण्यांत येईल.
१३. शासनाकडून निविदेसंबंधित वेळोवेळी निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय संपूर्ण निविदा प्रक्रीयेस लागू राहतील.
१४. B1 टेंडरच्या सर्व अटी व शर्ती सदर निविदा प्रक्रियेस लागू राहतील.

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद बाळापूर**

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक १९६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# घरकुलाची मोफत वाळू मिळवणे म्हणजे 'नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न'

## १० जून ते ३० सप्टेंबरपर्यंत वाळू घाट राहणार बंद



**वर्धा / जनमाध्यम**

घरकूल लाभार्थ्यांना जेव्हा मोफत वाळू दिली जाणार असल्याची घोषणा करण्यात आली. तेव्हाच लबाडाचं आवतन जेवल्याशिवाय खरं नाही असे अनेकजण म्हणत होते. दोन दिवसापासून जिल्ह्यात घरकूल लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्याची प्रक्रिया सुरु झाली. त्यातही अनेक अडचणी अन् आता तर १० जून ते ३० सप्टेंबर दरम्यान वाळू घाट बंद असणार आहेत. त्यामुळे घरकूल लाभार्थ्यांना सध्या तरी मोफत वाळू मिळण्याचा मार्ग बंद झाल्याचे दिसत आहे. घरकूल लाभार्थ्यांना मोफत वाळू मिळणे म्हणजे नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न आल्याची चर्चा होत आहे.

देशभरात जवळपास सर्वांनाच पक्के घर देण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नियोजन आहे. त्यामुळे गावपातळीवर शेकडोच्या संख्येने घरकुलांच्या याद्या मंजूर होत आहे. वर्धा जिल्ह्यातील वाळूघाट बंद असल्याने घरकूल लाभार्थ्यांची वाळूसाठी फरपट सुरु होती. त्यात महाराष्ट्र सरकारने ८ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या बैठकीत नवीन वाळू धोरणास मान्यता दिली. या धोरणानुसार, विविध योजनांतील घरकूल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून दिली जाईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत स्पष्ट केले. तसेच आठ दिवसात घरकूल लाभार्थ्यांना वाळू न मिळाल्याची तक्रार आल्यास संबंधित तहसीलदारावर कारवाई करण्याचीही तंबी दिली. त्यामुळे आता घरकूल लाभार्थ्यांना वाळू मिळणारच असे चित्र निर्माण झाले.

शासन नियमानुसार १० जून ते ३० सप्टेंबर दरम्यान वाळू घाट बंद असतात. त्यामुळे नदीपात्रातून वाळू उपलब्ध करुन देता येणार नाही. तर जप्त वाळूसाठ्यामधून वाळू उपलब्ध करून देता येईल. मागील चार दिवसापासून जिल्ह्यात घरकूल लाभार्थ्यांना मोफत वाळू देण्याच्या हालाचलीने वेग घेतला होता. त्यात वाहतुकीचा खर्च अधिक होत असल्याने पुन्हा घरकूल लाभार्थी संभ्रमात सापडले होते. यामध्ये तोडगा निघतो की नाही तोच १० जून उजाडले. शासन नियमानुसार १० जून ते ३० सप्टेंबर या दरम्यान नदीपात्रातून वाळू उपसा करता येत नाही. त्यामुळे घरकूल लाभार्थ्यांना मोफत वाळू मिळवण्यासाठी ३० सप्टेंबर उजाडण्याची वाट पहावी लागणार आहे.

### काय सांगतोय शासन निर्णय ?

राष्ट्रीय हरित लवादच्या आदेशानुसार नदीपात्रातून १० जून ते ३० सप्टेंबर दरम्यान वाळू उपसा बंद असतो. कारण नदीपात्रात पाणी असल्याने या कालावधीत वाळूघाट बंद ठेवले जातात, त्यामुळे मोफत वाळू मिळवण्यासाठी घस्कूल लाभार्थ्यांना ३० सप्टेंबर उजाडण्याची वाट पहावी लागणार आहे.

# कानगावात अवैध धंदा जोमाने सुरु त्याचा पाठीराखा कोण?

**मोझरी (शेकापूर)/ जनमाध्यम**

अल्लीपूर ठाण्याच्या हद्दीतील कानगाव सर्कलमध्ये सद्या अवैध सट्टापट्टीचा व्यवसाय मोठ्या जोरात सुरू आहे. नव्यानेच रुजू झालेले ठाणेदार घुले यांच्यासमोर हे मोठे आव्हान ठरण्याची दाट शक्यता आहे. शिवाय कर्तव्य कठोर पो.अधीक्षक याकडे कधी लक्ष पुरवणार याची शांतिप्रिय नागरिकांना उत्सुकता आहे, ती वेगळीच!

कानगाव सर्कलचे गाव आहे. येथे नागरिक बँक, सरकारी दवाखाना आणि बाजारपेठेसाठी मोठ्या प्रमाणात येतात. अल्लीपूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या या सर्कलच्या गावात सट्टापट्टी व्यवसाय बिनदिक्कत व धुमधडाक्यात? सुरू आहे.

सट्टा पट्टीचा किंग महाशयाने आपली चार माणसे भक्कम रोजंदारीने नेमली आहेत. या अवैध व समाज विघातक सट्टापट्टीमुळे अनेकांचे संसार उध्वस्त झालेत. अनेक शाळकरी मुलं तसेच महिला देखील?नादी लागल्याचे सहज लक्षात येते. कानगावात पाण्याच्या टाकी शेजारी उंच टेकडीवर एक खोली बांधून त्यात हा व्यवसाय जोमाने सुरू आहे.आठवडी बाजाराच्या दिवशी सट्टापट्टी लावणाऱ्यांची मोठी झुंबड बघायला मिळते. अनेकांच्या हातात पट्टीचे चित्र खुलेआम दिसून येते.

खुलेआम चालणाऱ्या या व्यवसायाकडे पोलीस प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने हा व्यवसाय कोणाच्या पाठबळावर चालतो असा प्रश्न उद्भवतो? नव्याने रुजू झालेले ठाणेदार घुले हे या सत्तापट्टीच्या व्यवसायाला आळा घालतील काय ?असा प्रश्न सुज्ञ नागरिक विचारत आहेत. या अवैध सट्टापट्टीच्या व्यवसायाकडे जिल्हा पोलिस अधीक्षकांनी त्वरित लक्ष द्यावे आणि गोरगरिबाचे आशीर्वाद घ्यावेत , अशी अपेक्षा केल्या जात आहे.

### मेनखात रेती घाटावरील
# अवैध रेती वाहतुकी विरोधात महसूल विभाग ॲक्शन मोडवर

**समुद्रपूर/ जनमाध्यम**

तालुक्यातील मेनखात रेती घाटावर मोठ्या प्रमाणात अवैध रेतीचा उपासा करून वाहतूक होत असल्याची तक्रार तहसीलदार कपिल हाटकर यांना प्राप्त होताच महसूल विभाग ॲक्शन मोडवर आला असून चक्क घाटावर जाणाऱ्या रस्त्यावर जेसीबीच्या सहाय्याने मोठी नाली खोदून रस्ता बंद करण्यात आला आहे.

अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांवर महसूल विभाग लक्ष ठेवून असुन अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्यावर कडक कारवाई करण्यात येईल असे तहसीलदार कपिल हाटकर यांनी सांगितले आहे.मेनखात येथील रेती घाटावरून रेतीची अवैधरित्या रात्रीच्या वेळेस चोरी होत असल्याची तक्रार तहसीलदार कपिल हाटकर यांना मिळताच त्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.मात्र या काळात अवैध रेती वाहतूक करणाऱ्या कारवाई होणार असल्याची भनक लागताच त्यांनी या ठिकाणावरून रेती वाहतूक करणे थांबविले होते.आता या ठिकाणावरून रात्रीच्या वेळी सुध्दा चोरटी रेती वाहतूक होऊ नये यासाठी महसूल विभागाकडून जेसीबीच्या सहाय्याने चक्क वाळू घाटावर जाणाऱ्या रस्त्याला नाली खोदून रस्ता बंद करण्यात आला आहे.



**जेसीबीने नाली खोदून रस्ता केला बंद**

# शेतमालाच्या भावात वाढ होण्याऐवजी घसरण

### शासन व्यापाऱ्याची सांगड शेतकऱ्यांमध्ये रोष

**साहूर/ जनमाध्यम**

शेतकऱ्या मागची नैसर्गिक संकटाची मालिका सुरूच असून त्या संकटात आता शासनासह व्यापाऱ्यांनी भर घातली आहे. अनेक शेतकऱ्यांनी भाव वाढेल या अपेक्षेने आपला शेतमाल घरातच साठवून ठेवला आहे. मात्र गेल्या काही दिवसापासून शेतमालात भाव वाढ होतानाचे लक्षने दिसून येत नसून उलट घसरण होत असल्याने या धास्तीमुळे घरी साठवून ठेवलेला शेतमाल आता व्यापाऱ्याला बेभाव भावात विकत आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाची भाववाढ होत नसल्याने शेतकऱ्याकडून शासनासह व्यापाऱ्यांचा रोष व्यक्त केल्या जात आहे. तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समिती असली तरी व तेथे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत असला तरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जाचक अटीमुळे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतमाल विकण्यास कच काढतो शेतमालाच्या भावात दिवसेंदिवस घसरण होत असल्याने व घरी मुला मुलींचे लग्न व शिक्षण आणि म्हाताऱ्या आई-वडिलांचे आजार व औषधोपचार या अडचणीमुळे शेतकरी आता घरी साठवून ठेवलेला शेतमाल विक्रीला काढत आहे. परिणामतः शेतकऱ्याच्या मजबुरीचा फायदा घेत खाजगी व्यापारी शेतकऱ्याकडून बेभाव शेतमाल खरेदी करत आहे.

खरीप हंगामात सोयाबीन कपाशीचे तर रब्बी हंगामात गहू चना पिकाचे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले. तुरीवरही विविध रोगांचे आक्रमण झाल्याने उत्पादन कमी झाले मात्र शासनाकडून शेतमालाला चांगला भाव मिळाला तर याची कसर भरून निघेल अशी शेतकऱ्याला अपेक्षा होती मात्र शेतमालाचे भाव वाढण्याचे कुठलेही लक्षणे दिसत नसल्याने उलट शेतमालाच्या भावात मोठी घसरण होत असल्याने शेतकरी आता हतबल झाले आहेत. सोयाबीन कापूस तूर गहू चना इत्यादी शेतमालात घसरण होत असल्याने या धास्तीमुळे शेतकरी नाईलाजास्तव आता बाजारपेठेत शेतमाल आणून विक्री करीत आहे. परिणामतः बाजारपेठेत आवक वाढल्याने शेतकऱ्यांच्या मजबुरीचा फायदा घेऊन खाजगी व्यापारी कवडीमोल भाव देऊन शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करीत असल्याचे शेतकरी सांगत आहे.

## अखेर.. कोपरा पिंपळगाव रस्त्याचे काम पूर्ण



चानकी कोपरा-कोपरा पिंपळगाव रोड चे काम अखेर पूर्ण झाले असून येथील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे, गेल्या एक वर्षा पासुन कामाचे टेंडर पास होऊन सुध्दा ठेकेदारानी काम सुरू केले नव्हते यांची माहीती पिंपळगावच्या नागरिकांनी अतुल पन्नासे यांना दिली पन्नासे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना पत्र दिले हे काम येत्या आठ दिवसात करा अन्यथा मोठे आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला होता काही दिवसांमध्येच रोडचे काम पुर्ण झाले असुन पिंपळगाव येतील नागरिकांनी अतुल पन्नासे यांचे आभार मानले आहे.

# मोटार पंप चोरणाऱ्या तिघांना केली अटक



**हिंगणघाट/जनमाध्यम**

तालुक्यातील नांदगाव येथील शेतकऱ्याच्या शेतातील गोठ्यामधून शेती उपयोगी मोटार पंप चोरीला गेल्या प्रकरणी तीन अट्टल चोरट्यांना गुन्हे प्रगटी करण पथकाने अटक केली आहेत.

नांदगाव येथील शेतकरी प्रकाश हरिभाऊ रोकडे यांच्या शेतातील गोठ्यामध्ये शेती उपयोगी मोटार पंप ठेवण्यात आले असता, गोठ्यातील ३२ हजार रुपयांचे साहित्य चोरीला गेले असल्याची तक्रार दिनांक ३१ मार्च रोजी नोंदवली होती. हिंगणघाट पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रगटीकरण पथकाने आरोपींचा शोध घेतला असता, तीन युवक संशयास्पद दुचाकीने फिरताना दिसून आले. तिघांची चौकशी केली असता, त्यांचे जवळून शेती उपयोगी मोटार पंप दिसून आले. याप्रकरणी आरोपी व्यंकटी मारुती दांडेकर वय (२६) टेंमुर्डा, तुषार गहुजी पाल वय (२४) रा टाकळी ता वरोरा जिल्हा चंद्रपूर व हेमंत विनोदराव चौधरी वय (३४) रा शेगाव ता समुद्रपूर जिल्हा वर्धा या तिघांना अटक करण्यात आली. तिघांकडून दुचाकीसह १ लाख ३२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई प्रशांत ठोंबरे, राहुल साठे, आशिष नेवारे, मंगेश वाघमारे यांच्यासह गुन्हे प्रगटीकरण पथकाने केली आहेत.

## पांडूरंग सदाशिव खानखोजे शासकीय आयटीआयात शिवराज्यभिषेक दिन साजरा

**वर्धा/ जनमाध्यम**

पांडूरंग सदाशिव खानखोडे शासकीय आयटीआय वर्धा येथे प्रविण गौड यांच्या प्रमुख उपस्थितीत आयएमसी सदस्य राहुल मुन, सुधीर रेलकर निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे, धर्मेंद्र मुंधडा, आयटीआयचे प्राचार्य कोकुलवार यांच्या उपस्थिती शिवराज्यभिषेक दिन साजरा करण्यात आला.

आत्मनिर्भर भारताच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी स्वदेशी वस्तूंचा वापर जास्तीत जास्त प्रमाणात आपण केला पाहिजे स्वदेशी विचार म्हणजे देशातील उत्पन्नाचा संसाधनाचा आणि तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे, असे धर्मेंद्र मुंधडा मार्गदर्शन करतांना म्हणाले.प्रविण गौड यांनी मातृ शक्तीचे तर राहुल मुन यांनी मराठी माणसानी व्यवसायाकडे वळले पाहिजे व व्यवसायाचे महत्व पटवून दिले. सुधीर रेलकर यांनी कुटूंबातील सदस्याने एकमेकांशी आदराने व सुसंवादाने वागले पाहिजे कुटूंब व्यवस्था टिकून ठेवली पाहिजे असे सांगितले. मुरलीध बेलखोडे यांनी पर्यावरणाचे महत्व यावर मार्गदर्शन केले. श्री. कोकुलवार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आर्दश आपल्या डोळ्यासमोर ठेवून प्रत्येकांने समाजासाठी आणि देशासाठी काम केले पाहिजे असे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटनिर्देशिका श्रीमती वाईकर यांनी केले. संचालन विलास भगत यांनी तर आभार श्री. जवंजाळ यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे कार्यक्रम अधिकारी श्री. कडूकर, सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला संस्थेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहेब..अंगावर कपडे होते आता ते पण घ्या !

## बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनात शेतकऱ्यांचे अभिनव आंदोलन



**वर्धा/ जनमाध्यम**

माजी राज्यमंत्री बच्चूभाऊ कडू यांनी शेतकरी कर्जमाफी सह संबंधित १७ मागण्यांसाठी मोझरी येथे सुरू केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला समर्थन देण्यासाठी आर्वी येथे शेतकऱ्यांनी बाळा जगताप यांच्या नेतृत्वात अभिनव आंदोलन करून समर्थन केले.

शासन प्रशासनाच्या निर्लज्य कारभारामुळे आता फक्त आम्हा शेतकऱ्यांच्या अंगावर कपडे शिल्लक राहिले आहे. आता ते पण तुम्ही घेऊन घ्या अशा शब्दात बाळा जगताप यांनी आपल्या भावना तहसील कार्यालय आर्वी येथे तहसीलदार यांच्या समक्ष मांडत . बाळा जगताप यांच्या सह उपस्थित शेतकऱ्यांनी आपले कपडे सुद्धा प्रशासनाच्या स्वाधीन करत. मोझरी येथे सुरू असलेल्या बच्चूभाऊ कडू यांच्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला समर्थन जाहीर केले.

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी. दिव्यांग व विधवा महिलांना ६००० रुपये मानधन. हमीभावावर २०३ अनुदान. ०७ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीतील इतिवृत्ताप्रमाणे शासन निर्णय काढण्यात यावे. तरुणांच्या हाताला काम व योग्य दाम देण्यात यावे. रोजगार भरती करण्यात यावी. शेतकऱ्याप्रमाणे शेतमजुरांना सुद्धा आर्थिक सहाय्य देण्यात यावे. शेतमजुरांकरीता स्वतंत्र मंडळ स्थापन करण्यात यावे. शहराप्रमाणे ग्रामीण भागात सुद्धा घरकुलाला ५ लाख अनुदान देण्यात यावे. मेंढपाळ, मच्छीमार , ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या अशा एकूण १७ मागण्यांचे समर्थन करण्याकरिता आज तहसील कार्यालय आर्वी येथे बाळा जगताप यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी आंदोलन केले. यावेळी जगताप यांच्यासह सुधीर जाचक, विक्रम भगत, संजय कुरिल,कुणाल चव्हाण, राजेश आगरकर, गुड्डू पठाण, अबरार खान, शेख जफर, अब्दुल राहिल, शेख कलीम, अंकुश गोटेफोडे, प्रवीण वाघ, प्रफुल कुंबोत, मंगेश कोल्हे, धीरज गिरडकर, राजू देऊळकर, किरण लोखंडे, शेख इकबाल यांच्यासह अनेक शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संक्षिप्त

### क्षुल्लक कारणावरून मारहाण

**देवळी**-क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादात तिघांनी एका व्यक्तीलाः अमानुष मारहाण केली. गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही घटना देवळी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चिंचाळा येथे घडली. देवळी तालुक्यामधील चिंचाळा येथील किशोर तेलंग (४२) हा संदीप भुजाडे यांच्या घरी बसला होता. तिथे त्यांचा अमर डुकरे, साहिल डुकरे आणि गुड्डू तेलतुमडे यांच्याशी तोंडी वाद झाला. वादात असलेल्या किशोरने त्याला शिवीगाळ केली. ज्याला तिघांनी आक्षेप घेतला. गुड्डु तेलतुमडे, अमर डुकरे आणि साहिल डुकरे यांनी त्याला काठीने मारहाण केली. ज्यामुळे किशोर जागीच बेशुद्ध पडला. त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले. याप्रकरणी देवळी पोलिस ठाण्यात किशोर तेलंग यांच्या तक्रारीवरून अमर डुकरे, साहिल डुकरे आणि गुड्डू तेलतुमडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### पोलिसांच्या आशिर्वादाने मैदानात भरते यात्रा

**वर्धा**-स्वावलंबी विद्यालयाच्या परिसरात गेल्या अनेक दिवसापासून नशा करणाऱ्यांची यात्रा भरते. याबाबतची माहिती रामनगर ठाण्यातील सर्व कर्मचाऱ्यांना आहे. ठाण्याच्या मागील भागात हे मैदान असताना तेथे अवैध व्यवसाय कसा हे न उलगडणारे कोडे आहे. जनमानसात या उद्योगाला व नशा केंद्राला रामनगर पोलिसांचे समर्थ नसल्याची ओरड आहे. पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षकांनी या प्रकाराकडे लक्ष केंद्रित करावे अशी मागणी या भागातील रहिवाशांनी केली आहे.

### बंधाऱ्यांच्या खोलीकरणाकडे दुर्लक्ष

**वायफड**-शेत शिवारातील नाल्यांवर पाणी अडविण्याकरिता वेगवेगळ्या विभागाच्या वतीने बंधारे निर्माण करण्यात आले आहे. बंधर्यांमध्ये दरवर्षी पावसाळ्यात वाहत येणाऱ्या पाण्यासोबत गाळ येतो. तो गाळ बंधाऱ्याच्या भिंतीजवळ साठविल्याने बंधाऱ्यात पाहिजे त्या प्रमाणात पाणी साठविला जात नाही. वाहत येणारे पाणी वाहून जाते. दरवर्षी उन्हाळ्यात बंधाऱ्यांमधील गाळ काढणे अत्यावश्यक असते त्याकडे कुणीही लक्षपूर्वीत नसल्याने धामणगाव, वाढोडा, वायफड, डोरली, दहेगाव, परिसरातील बंधारे गाळाने तुडुंब भरले आहे.

### शेतातील तिळाचा ढीग पेटविला

**सेलू**-शेतात कापणी करून लावून ठेवलेला तीळाचा ढीग अज्ञात व्यक्तीने पेटविला. घटनेमुळे शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. ही घटना सेलू पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गणेशपूर शेतशिवारात उघडकीस आली. याप्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. उद्धव चंपतराव कोल्हा (६५) रा. क्षीरसमुद्रपूर यांच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. गुन्हेगाराचा शोध घेऊन त्याला तातडीने अटक करावी व शासनाने शेतकऱ्याला आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

### लहान भावानेच केली मोठ्या भावाची हत्या

दिघी रस्त्यालगत शेतातील घटना

**देवळी**- जवळच असलेल्या दिघी रस्त्या लगत असलेल्या शंकरराव येळणे यांच्या स्वतःच्या शेतात असलेल्या हनुमान मंदिराजवळच सख्या भावानेच मोठ्या भावाची स्वतःच्या मुलाच्या सहाय्याने हत्या केली. ही अत्यंत दुखद घटना असून मृतकाचे नाव शंकर नानाजी येळणे वय ६५ वर्ष रा. देवळी असून आरोपी बाबाराव नानाजी येळणे व त्याचा मुलगा निलेश येळणे असे असून ही हत्या कोणत्या कारणासाठी केली याचा अद्याप पर्यंत माहिती मिळाली नाही.

घटनेची माहिती मिळताच डी वाय एस पी राहुल चव्हाण, देवळी पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमोल मंडाळकर, तसेच देवळी पोलीस स्टेशन पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास करीत आहे वृत्त लिहितो अद्याप पर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

### अविश्वास प्रस्तावाविरुद्ध दाद मागणार-विरुटकर

**वर्धा**-साहित्य खरेदीमध्ये मी कोणताही भ्रष्टाचार केलेला नाही. तसेच सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन व प्रोसिडींग बुकवर सह्या घेऊन साहित्य खरेदी केले व ते साहित्य सर्व सदस्यांना दाखविले. यात कोणताही निधीचा गैरप्रकार झाला नाही. मात्र बिनबुडाचे आरोप करीत माझ्यावर अविश्वास प्रस्ताव आणण्यात आला. अविश्वास प्रस्तावावेळी माझे बोलणे शासकीय अधिकाऱ्यांनी ऐकून घेतले नाही. त्यामुळे माझ्यावर अन्याय झाला असून, मी याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे दाद मागणार असल्याचे माजी सरपंच बादल विरुटकर यांनी सांगितले.

### मोटारसायकल स्वाराला लुटले

**वर्धा :** सेवा समाप्ती करून घरी परतणाऱ्या एका व्यक्तीला वाटेत थांबवून त्याचे पैसे आणि मोबाईल लुटण्यात आला. शहरालगतच्या नागठाणा रस्त्यावर ही घटना घडली. झाडगाव येथील रहिवासी संदेश गौतम वाघमारे (३४) हा सेवा समाप्ती नंतर गावी परतत होता. रात्री ११.३० च्या सुमारास नागठाणा रस्त्यावर दोन अज्ञात व्यक्तींनी त्याला अडवीले. त्याच्याकडून ११०० रुपये आणि मोबाईल जबरीने हिसकावीला.

संदेश वाघमारे यांनी सावंगी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक- १९७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# प्रहार प्रमुख बच्चू कडू यांच्या उपोषणाचे शहरात पडसाद

**-संतप्त प्रहार कार्यकर्ते रस्त्यावर - जिल्हाकचेरी परिसरात महायुती सरकारचे पोस्टर जाळले**

**अमरावती/प्रतिनिधीः-** माजी राज्यमंत्री आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या उपोषणाच्या चौथ्या दिवशी प्रहारच्या संतप्त कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारच्या विरोधात आंदोलन केले. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांचे प्रतिकात्मक बॅनर, पोस्टर जाळून तीव्र निदर्शने केली. तसेच यावेळी कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बॅनरवर आंदोलकांनी दुग्गधाभिषेक केला. यासोबतच बॅनर कचरा टाकत रोष व्यक्त केला. त्यामुळे मोठा तणाव निर्माण झाला.

शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसंदर्भात माजी आमदार बच्चू कडू यांनी रविवारपासून गुरुकुंज मोझरी येथे अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाच्या चौथ्या दिवशी कडू यांच्या समर्थनार्थ जिल्ह्यासह राज्यभर प्रहार पदाधिकारी, शेतकरी, दिव्यांग बांधव रस्त्यावर उतरले आहेत. बच्चू कडू यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. मात्र, शासन आणि प्रशासन आजवर कोणतेही ठोस निर्णय घेऊ शकली नाही. त्यामुळे प्रहार पदाधिकाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. शासनाप्रती रोष दिसून येत आहे. अमरावती शहरात याचे पडसाद उमटतांना दिसून आले. बुधवारी सकाळी ९:३० वाजता महानगर प्रमुख बंटी रामटेके, प्रदेश प्रवक्ता जितू दुधाने यांच्यासह कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन केले. यावेळी महायुती सरकार विरोधात तीव्र नारेबाजी केली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचे प्रतिकात्मक बॅनरवर कचरा टाकत ते जाळण्यात आले.

यावेळी आंदोलनात प्रदेश प्रवक्ता जितू दुधाने, महानगर प्रमुख बंटी रामटेके, संपर्क प्रमुख गोलू पाटील, संघटक श्याम इंगळे,



अतुल सिंगण, मनीष पवार, विक्रम जाधव, कुणाल खंडारे, अजय तायडे, नंदू वानखेडे यांच्यासह अन्य प्रहार पदाधिकारी उपस्थित होते.

**आसेगांव मध्ये टॉवरवर चढले कार्यकर्ते**

माजी मंत्री बच्चू कडू यांनी विविध मागण्यासाठी उपोषण सुरू केलं आहे. त्यांच्या उपोषणामुळे प्रहारचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. अमरावती-परतवाडा मार्गावर असणाऱ्या आसेगाव येथे प्रहाराचे अनेक कार्यकर्ते मोबाईल टॉवरवर चढलेत. बच्चू कडू यांनी केलेल्या सर्व मागण्या मान्य झाल्याशिवाय टॉवरवरुन खाली उतरणार नाही, असा इशारा आंदोलकांनी दिला. आंदोलक आक्रमक झाल्यानं प्रशासनाची चांगलीच धावपळ झाली आहे.

**आर्वीत तहसील कार्यालयात अर्धनग्न आंदोलन-**

बच्चू कडू यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ आज प्रहार पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयामध्ये अर्धनग्न आंदोलन केले. साहेब आमचे कपडे घ्या आणि शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या अशा घोषणा देत पदाधिकाऱ्यांनी आपले कपडे काढून आंदोलन केले.आज सकाळी प्रहार पक्षाचे कार्यकर्ते आर्वीतील तहसील कार्यालयात दाखल झाले. त्यांनी तहसील कार्यालयातील तहसीलदार यांच्या केबिनमध्ये जाऊन अचानक आपले कपडे काढण्यास सुरुवात केल्यानंतर तेथील अधिकाऱ्यांना देखील काही समजेनासे झाले. यावेळी एक एक करत त्या ठिकाणी असलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी आपल्या अंगातील शर्ट काढून तहसीलदार यांच्या समोर ठेवले. कपडे तहसीलदार यांच्या समोर ठेवत कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह इतर मागण्यांचे निवेदन त्याठिकाणी उपस्थित असलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यास दिले.यावेळी जगताप यांच्यासह सुधीर जाचक, विक्रम भगत, संजय कुरिल,कुणाल चव्हाण, राजेश आगरकर, गुड्डू पठाण, अबरार खान, शेख जफर, अब्दुल राहिल, शेख कलीम, अंकुश गोटेफोडे, प्रवीण वाघ, प्रफुल कुंबोत, मंगेश कोल्हे, धीरज गिरडकर, राजू देऊळकर, किरण लोखंडे, शेख इकबाल यांच्यासह अनेक शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जुळया शहरात प्रहारचे आंदोलन चिघळणार

**-उपविभागीय अधिकाऱ्यांना घेराव -आज चक्काजाम -हजारो कार्यकर्ते सहभागी होणार**

**अचलपूर/प्रतिनिधीः-** शेतकरी शेतमजूर विधवा दिव्यांग आदींच्या न्याय हक्कासाठी प्रहार चे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू हे मोझरी येथे आमरण उपोषणाला बसले असून त्यांना पाठिंबा देण्यासाठी आज प्रहारच्या कार्यकर्त्यांनी अचलपूर येथील उपविभागीय कार्यालयात ठिय्या आंदोलन केले तर उद्या गुरुवारी चक्का जाम आंदोलनाचा इशारा देण्यात आलेला आहे.

आज उपविभागीय अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये प्रहारच्या कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनाच्या वेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी शुभम कुमार यांच्या उपस्थितीत पोलीस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात लावण्यात आलेला होता. कार्यकर्ते संतप्त झालेले दिसत होते. दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. सरकारने त्वरित निर्णय न



घेतल्यास यावेळी उद्या गुरुवारी चक्काजाम आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

सदर आंदोलनात नगरसेवक संजय तट्टे, माजी नगराध्यक्ष अनिल पिंपळे, माजी नगरसेवक प्रवीण पाटील ,हरिश्चंद्र मुगल अंकुश जवंजाळ,जेडी वानखेडे, प्रशांत आवारे गजानन भोरे,भास्कर मासुतकर, वैभव बोबडे, रामदास खापरे ,निलेश भांडे,अशफाक खा आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

शेतकरी, शेतमजूर ,विधवा महिला, बेरोजगार युवक ,मेंढपाळ ,मच्छीमार बांधवांच्या न्यायहक्कासाठी बच्चू भाऊ विविध मागण्या घेऊन दि.८ जून २०२५ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समाधी स्थळ गुरुकुंज मोझरी येथे आमरण उपोषणास बसले आहेत. परंतु शासनाने व प्रशासनाने याची गांभीर्याने दखल न घेतल्याने व सदर मागण्या पूर्ण न झाल्याने आम्ही उद्या चांदूरबाजार नाका येथे

# वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस

**■गर्मी पासून दिलासा ■दुपारपासून जुळया शहराचा वीज पुरवठा खंडित ■संत्रा बागासह, उन्हाळी ज्वारी, कांदा आदी पिकांचे नुकसान ■झाडे कोसळली, विद्युत तारा तुटल्या**





**अचलपुर/प्रतिनिधीः-** अचलपूर -परतवाडा शहरासह तालुक्यातील बऱ्याच गावात आज दुपारी अडीच वाजेच्या सुमारास विजेच्या कडकडासह वादळी मुसळधार पाऊस अर्धा तास बरसला. दरम्यान , वादळी वाऱ्याने वीज पुरवठा दुपारपासून खंडित झाल्याने नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागला. या पावसाने नागरिकांना गर्मी पासून दिलासा मिळाला असला तरी उरल्या सुरल्या संत्रा बाग , कांदा , उन्हाळी ज्वारी आदी पिकांना अजून फटका बसला आहे. वादळी वाऱ्याने धारणी रस्त्यावर झाडे पडल्याची माहिती आहे . तर परतवाडा येथील वाघामाता जवळ असलेल्या डिल मध्ये उभ्या असलेल्या चार चाकी वाहनावर एक मोठे कडुलिंबाचे झाड पडल्याने ती चपकली व विद्युत पोल वाकल्याची माहिती आहे.गंगा भवन चौकातील सिंध बँकेजवळ मोठे झाड कोसळले तर तालुक्यातील भुगाव मेघनाथपूर गावादरम्यान अमरावती मार्गावर आठ ते दहा निंबाच्या झाडांच्या जाड फांद्या व चार झाडे कोसळल्याने अमरावती परतवाडा मार्गाची वाहतूक ठप्प झाली असल्याची होती.

आज सकाळपासून गरमीचे वातावरण होते. दुपारी दोन वाजेच्या सुमारास वादळ वाऱ्याला सुरुवात होऊन अंधारून आले. अचानक ढग दाटून आले व अडीच वाजता मुसळधार पाऊस सुरू झाला. परतवाडा शहरासह कांडली, एकलासपूर गौरखेडा कुंभी , मल्हारा ,देवमाळी व मेळघाट च्या पायथ्याशी असलेल्या काही गावात पाऊस बरसला. काही दिवसांपूर्वी झालेली गारपीट व पडलेल्या पावसाने संत्रा बागांना, कांदा उन्हाळी ज्वारीला फटका बसला होता. त्याचे तातडीने सर्वेक्षण करावे अशी मागणी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांकडून पुढे येत आहे. आज दुपारपासून विद्युत पुरवठा खंडित झाला असून वृत्त लिहोस्तवर विद्युत पुरवठा सुरळीत झालेला नव्हता. त्याचा परिणाम व्यवसायांवर सुद्धा झाला होता. नागरिकांना समस्यांचा सामना करावा लागला आहे.

> गेल्या एक महिन्यापूर्वी दोन ते तीन वेळेला झालेल्या अवकाळी पावसाने व गारपिटीने उन्हाळी ज्वारी कांदा संत्रा आदी पिकांना याचा फटका बसला असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. आज झालेल्या वादळी पावसानेही शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. शासनाने याचा सर्वे करून त्वरित नुकसान भरपाई द्यावी. याबाबत आम्ही लवकरच उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देणार आहोत.
>
> -श्रीधर शिरसागर (भाजपा),बहुजन शेतकरी नेते अचलपूर

> वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस आल्याने आज दुपारपासून आमचा विद्युत पुरवठा खंडित होता. त्यामुळे आमचा व्यवसाय आज ठप्प झाला होता.
>
> -गोविंद चरपटे
>
> (संचालक),वाघाई कॉम्प्युटर खरेदी विक्री

# लक्ष्मीनारायण संस्थानची पंढरपूर दिंडी शनिवारी करणार प्रस्थान

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक आणि धार्मिक वैशिष्ट्य असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील प्रथम चौदाव्या क्रमांकावर असलेली श्री लक्ष्मीनारायण संस्थानची मानाची दिंडी शनिवार १४ जून रोजी दुपारी चार वाजता भाजी बाजार येथील लक्ष्मीनारायण मंदिरातून प्रस्थान करणार आहे, अशी माहिती आज बुधवारी ११ जून रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत आयोजकांनी दिली.

त्यांनी सांगितले की संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचे वडील विठ्ठल पंत कुलकर्णी हे आषाढी एकादशी निमित्य पंढरपूर येथे पायीवारी करत होते. त्यांच्यानंतर ज्ञानेश्वर व भावंडे यांनी वारीची परंपरा सुरू ठेवली. १८३२ मध्ये गुरु हेमंत बाबांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका पालखीत घालून दिंडी समारोहसह ठाणे ऐश्वर्य व सोहळ्याने पंढरपूरला नेण्याची प्रथा चालू केली. ही



प्रथा आजही सुरू आहे. पालखीला आणखीन वैभव प्राप्त झाले आहे. विदर्भातून आजही अनेक दिंड्या पंढरपूरला जातात.लक्ष्मीनारायण संस्थान यांची १६० वर्षापासूनची परंपरा असून संत ज्ञानेश्वर महाराज पालखीसोबत पंढरपूरला जाते. महाराष्ट्राच्या धार्मिक सांस्कृतिक परंपरेचा वसा विदर्भात सद्गुरु विठ्ठलानंद सरस्वती यांनी जपला होता. संस्थानतर्फे पंढरपूरला दिंडी नेण्याची ही परंपरा अखंडपणे चालू आहे. यंदाचा १९३ वा संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा १९ जून पासून आरंभ होत आहे. लक्ष्मीनारायण संस्थानातून १४ जून रोजी दुपारी पालखी निघणार आहे. तत्पूर्वी दुपारी तीन वाजता मंदिरात हभप पद्माकर महाराज देशमुख यांचे प्रवचन होईल. त्यानंतर दिंडी प्रस्थान सोहळा आरंभ होणार आहे. सोहळ्यात संस्थानच्या खारतळेगाव येथील दत्त मंदिराचे भक्त मोठ्या संख्येने सहभागी होतात. दिंडी प्रस्थान झाल्यावर सर्वप्रथम यापूर्वी अनेक वर्षे दिंडी चालक सेवा दिलेले स्वर्गीय नारायण व्यास यांच्या कुंभारवाडा स्थित निवासस्थानी महाराजांच्या पादुका पूजन होईल. त्यानंतर बजरंग चौक, नीलकंठ चौक, आझाद हिंद मंडळ ,गांधी चौक, राजकमल चौक, राजापेठ अनेक मार्गावर दिंडीचे स्वागत केले जाईल. त्यानंतर दिंडीचे पद्माकर महाराज देशमुख यांच्या चिमोटे लेआउट दस्तूर नगर येथील निवासस्थानी मुक्काम राहील. १५ जूनला रेल्वेने पुणे येथून आळंदीला दिंडी जाईल. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात अमरावतीची दिंडी सहभागी होईल. आळंदी, पुणे, सासवड ,जेजुरी ,निरा ,लोणंद, तरडगाव, फलटण होत पालखी पंढरपूर पोहोचेल. पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेला संस्थानचे अध्यक्ष एड.प्रशांत देशपांडे, माजी महापौर विलास इंगोले, कौस्तुभ लवाटे, माधव पांडे ,एड. राजेंद्र पांडे,एड. रोहित कलोती, भूषण पुसतकर व सर्व विश्वस्त उपस्थित होते.

# आईला जीवे मारण्याची धमकी देऊन अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**शिरखेड पोलीस स्टेशन परिसरातील घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिरखेड पोलीस स्टेशन परिसरात आईला जीवे मारण्याची धमकी देऊन तिच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना १४ एप्रिल २०१९ ते ३१ मे २०२५ दरम्यान घडली. पीडितेच्या तक्रारीवरून १० जून रोजी पोलीस ठाण्यात या प्रकरणाची नोंद करण्यात आली. पोलिसांनी आरोपी तुषार गाढवे (वय २८) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पीडित महिलेने तक्रारीत म्हटले आहे की, आरोपी तुषारला भेटली तेव्हा ती १४ वर्षांची होती. नंतर तुषारने अल्पवयीन मुलीशी प्रेमसंबंध प्रस्थापित केले. १४ एप्रिल २०१९ ते ३१ मे २०२५ दरम्यान आरोपीने अल्पवयीन मुलीशी अनेक वेळा शारीरिक संबंध ठेवले. अल्पवयीन मुलीने नकार दिल्यावर आरोपी तुषारने तिला



आणि तिच्या आईला जीवे मारण्याची धमकी दिली. मुलीने १० जून रोजी शिरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी तुषार गाढवे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# खते व बियाण्यांचा काळाबाजार रोखण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांना घेराव

**-युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर यांच्या नेतृत्वात आंदोलन**

**खल्लार/प्रतिनिधीः-** पावसाचे आगमन होताच शेतकऱ्यांना वेध लागतात ते पेरणीचे. सध्या विदर्भात खूप मोठ्या प्रमाणावर पेरणीची कामे शेतक-यांनी सुरू केली असली तरी बाजारात बियाणे व खतांची कृत्रिम टंचाई असल्याने ज्यांना कपाशी व इतर बियाणे हवी ती खते मिळेनाशी झाली आहेत. तर दुसरीकडे कृषी विक्रेते अजित १५५, अजित १०५ या बियाणांची दलालांच्या मदतीने काळ्याबाजारात विक्री करून मलिदा लाटत आहेत.

दर्यापुरात खते व बियाणांचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार हा दरवर्षीच होत असतो. अशातच दर्यापूर तालुक्यातील प्रतिबंधक असलेले बियाण्यांच्या विक्री करणाऱ्यांवर कार्यवाही करून सुद्धा दर्यापूर मध्ये खूप मोठ्या प्रमाणात प्रतिबंधक बियाण्यांची विक्री होत आहे.

दर्यापूर शहरात व ग्रामिण भागात खूप मोठ्या प्रमाणात हा



प्रकार होत असून सर्वत्र शेतकऱ्यांची खूप मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे. याबाबत युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर यांच्या नेतृत्वात तसेच ज्येष्ठ शिवसैनिक प्रदीप वडतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुका कृषी अधिकारी आरती साबळे यांच्या दालनात प्रवेश करीत कृषि अधिकारी यांना घेराव घालण्यात आला. दर्यापूर तालुक्यात प्रतिबंधक बियाणे विक्री करणाऱ्या दुकानदारावर कारवाई करण्याची मागणी शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी केली आहे . कृषी कार्यालयामध्ये अचानक शिवसेना पदाधिकारी यांचा मोर्चा येताच कृषी अधिकारी व कर्मचारी यांची दमछाक पहावयास मिळाली होती.

यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर, शिवसेना विधानसभा संघटक बबनराव विल्हेकर, शिवसेना शहरप्रमुख गोपाल अग्रवाल, ज्येष्ठ शिवसैनिक प्रदीप वडतकर, सरपंच किशोर टाले, सरपंच संजय कोरडे, सरपंच विजय आढाव, युवासेना जिल्हा चिटणीस, प्रतिक राऊत, युवासेना दर्यापूर तालुकाप्रमुख सागर गिरे, युवासेना दर्यापूर शहर प्रमुख रुपेश मोरे, युवासेना तालुका चिटणीस भरत हिंगणीकर, शिवसेना उप तालुका प्रमुख राजु मानकर, शिवसेना उपशहर प्रमुख दिपक बगाडे, शिवसेना उपशहर प्रमुख खंडू राऊत, उपसरपंच शरद आठवले, भास्कर धोटे, प्रशांत धर्माळे, प्रशांत ठाकूर, संदिप धर्माळे, भावेश कंटाळे, अनिकेत वाघझाळे, संतोष हागे, बादल सवाई, रामसिंग साळुंखे नितीन माहुरे, अमन पटेल, सोनू कपिले, अनिकेत सरडे, गणेश खंडारे, बच्चू पोटे, त्रीजय सावळे, ओम देवतळे, आकाश जवळकर, अमित गावंडे, अल्केश थोरात तसेच शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.

# वरुडच्या खंडेलवाल ज्वेलर्समधून १३ लाखांचे दागिने चोरी

**वरुड/प्रतिनिधीः-** वरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीत केदार चौकात असलेल्या खंडेलवाल ज्वेलर्स या प्रतिष्ठित दागिन्यांच्या दुकानातून तब्बल १३ लाख १ हजार ६०० रुपयांचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी राजेश जोशवा नांगलिया (वय ५७, रा. अकोला) यांनी वरुड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

खंडेलवाल ज्वेलर्सच्या महाराष्ट्रात अनेक शाखा असून सातही शाखांचे जनरल मॅनेजर म्हणून राजेश नांगलिया कार्यरत आहेत. त्यांच्यावर या शाखांची तपासणी व लेखापरीक्षणाची जबाबदारी आहे. ३ जून २०२५ रोजी त्यांनी वरुड येथील शाखेची नियमित तपासणी केली. यावेळी त्यांनी दागिन्यांची ताळमेळ तपासला असता, दुकानातून सोन्याच्या बांगड्या, कानातले झुमके व अन्य दागिने असे एकूण १२७ ग्रॅम सोने (किंमत १३,०१६००) चोरी गेल्याचे दिसून आले. या प्रकरणी दुकानातून कोणत्या प्रकारे चोरी झाली, याबाबत पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत असून दुकानातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# काकरमल येथे शेतकऱ्याने घेतला गळफास

**धारणी/प्रतिनिधीः-** काकरमल गावातील मानसू बाटू बेठेकर (वय ४५) या शेतकऱ्याने आज बुधवारी ११ जून रोजी सकाळच्या सुमारास घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

मिळालेल्या माहितीनुसार, मानसू बेठेकर हे सकाळी नेहमीप्रमाणे शेतावर गेले होते. काही वेळाने ते घरी परतले आणि काही क्षणातच त्यांनी घरात गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना उघडकीस येताच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्राथमिक माहितीनुसार, सततची नापिकी, वाढते



कर्जबाजारीपण, आणि आर्थिक अडचणी या कारणांमुळे त्यांनी आत्महत्या केली असावी, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. पोलीस पाटीलांनी घटनेची माहिती संबंधित प्रशासन व पोलिसांना दिली असून पुढील तपास सुरू आहे.

या घटनेने गावात शोककळा पसरली आहे. सरकारने अशा शेतकरी आत्महत्यांच्या घटना गांभीर्याने घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्रीमती जे.के.चैनानी, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०००/२०२५
**दुर्गा शांतारामजी सोळंके व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२५.०६.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Durga Shantaramji Solanke, Aged about 66 Yrs. Occu.: Household
2. Manoj Shantaramji Solanke, Aged about 40 Yrs. Occu.: Labour
   1 & 2 R/o Near Hanuman Mandir, Devi Nagar, Wadali, Amravati.
3. Sharda Shyam Panage, Aged about 44 Yrs. Occu.: Household
   R/o.Nerar Gulhane Kirana, Near Hanuman Mandir, Devi Nagar, Wadali, Amravati. Tq.Dist. Amravati
4. Pratibha Vidhyanand Timane, Aged about 44 Yrs. Occu.: Household
   R/o.Ladkhed, Tq.Darwha, Dist. Yavatmal

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Shantaram Nagorao Solanke हे दिनांक 30.10.2023 रोजी Amravati येथे मयत झाले. **अर्जदार नं.१** Durga Shantaramji Solanke **व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER FOR GRANT OF LEGAL HEIR CERTIFICATE UNDER THE CLAUSE 2 OF BOMBAY REGULATIONS VIII OF 1827 प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार नं.१** Durga Shantaramji Solanke **व ईतर** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७.०५.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर)
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक २७७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**पाहिजेत**

**डिजिटल न्यूज कार्यालयासाठी निवेदक, संपादक, वृत्त प्रतिनिधी पाहिजे. अनुभवास प्राधान्य.**
**तसेच फ्लॅट विक्रीकरीता अनुभवी मुले / मुली पाहिजेत.**
**कार्यालयासाठी रिसेप्शनिस्ट पाहिजे.**

**संपर्क**
**९८२३२५५०५४, ९८२३५४४४४६**

**विकणे आहे**

**2 B.H.K रो-हाऊसेस आणि 1 BHK फ्लॅट**

**२ बाल्कनी सुविधेसह, सोबतच वातानुकुलीत योगा हॉल, लिफ्टची सुविधा, तळमजला संपुर्ण पार्किंग, आणि सौर ऊर्जा यंत्रणा (आजीवन देखभाल मोफत)**

फ्लॅट्स - शुभम लेआऊट, नेमाणी गोडाऊनच्या मागे, तापडिया मॉलपासून फक्त १.०० कि.मी. अंतरावर

- संपर्क -
9518911428,
8788644334,
9823255054

1 B.H.K. फ्लॅट ११.९० लाख,
2 B.H.K. फ्लॅट १६.९०
रो-हाऊस - १९.९० लाख

पहिले या, आणि पहिले फायदा मिळवा, शहरात सर्वात स्वस्त किंमतीत

# शहराला 'स्वच्छ आणि सुंदर शहर' बनविण्याचा संकल्प - खा.बळवंत वानखडे

**अमरावती/का.प्र.**

शहरातील कचरा, अस्वच्छता आणि प्रत्येक भागातील साचलेले घाणीचे साम्राज्य या विषयांवर सविस्तर चर्चा करुन शहराला देशातील स्वच्छ आणि सुंदर शहर बनविण्याचा संकल्प खा.बळवंत वानखडे यांनी घेतला आणि संबंधीत विभागांना निर्देशित दिले.



खा.बळवंत वानखडे व माजी आ.डॉ.सुनिल देशमुख यांनी महानगरपालिकेला भेट दिल्याबद्दल त्यांचा यावेळी महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी शाल व पुष्पगुच्छ देवून स्वागत व सत्कार केला. यावेळी खा.महोदयांनी अमरावती शहरातील कचरा, अस्वच्छता आणि प्रत्येक भागातील साचलेले घाणीचे साम्राज्य या विषयांवर सविस्तर चर्चा करुन संबंधीत विभागांना निर्देशित करण्यात आले. या बैठकीत पावसाळापुर्वीचे उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे याबाबत मोहीम हाती घ्यावी असे निर्देश खासदारांनी दिले.

वार्डा-वार्डातील साफ सफाई, नाली व नाले सफाई, गटार साफ सफाई करण्याचे निर्देश यावेळी खासदारांनी दिले. सदर परिसरातील नाल्यांची साफ सफाई बाबत खासदार महोदयांनी आढावा घेतला. सदर परिसरातील नाल्या साफ सफाई करण्याची कार्यवाही करणे सुरु असून नाल्याची सफाई योग्य पध्दतीने करण्याचे निर्देश दिले. सदर परिसरातील निघणा-या कच-याचे नियोजन करुन सदर तांत्रीक पध्दतीने कच-याचे विल्हेवाट लावावी. नाल्यात असा कचरा फेकला असल्यास त्यावर प्रशासकीय कार्यवाही त्वरीत करावी.

प्रत्येक अधिका-याने समन्वयाने काम करावे. कर्मचा-यांनी दिलेली जबाबदारी व्यवस्थीतरित्या पार पाडावी. जनतेचे कामे वेळोवेळी करुन त्यांना सहकार्य करावे. या बैठकीत अमरावती शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलु शेखावत, माजी महापौर मिलींद चिमोटे, विलास इंगोले, अशोक डोंगरे, वंदना कंगाले, माजी नगरसेवक बाळासाहेब भुयार, प्रदिप हिवसे, मुन्ना राठोड, प्रमोद पांडे, रफीक पत्रकार, सलिम बेग, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, भैय्या साहेब पवार, अधिकारी, पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते उपस्थित होते.

## नाविन्यपूर्ण अभियानने वटसावित्री साजरी

**अमरावती/का.प्र.**

मनस्विनी फाउंडेशन नेहमीच निसर्ग संवर्धनासाठी विविध उपक्रम घेत असते. त्यात प्लास्टिक पासून मुक्ती, कापडी पिशव्या वाटप, वृक्षरोपण आणि संवर्धन याच शृंखलेत 'मागेल त्याला वृक्ष जगवेल त्याला वृक्ष या अभियानाची वड सावित्रीपौर्णिमाचे औचित्य साधून सुरूवात करण्यात आली. वडाची फांदी न तोडता वडपूजन करून व वटवृक्षाची लागवड करून या अभियानाचा स्थानिक ऑक्सिजन पार्क येथे महिलांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.



**मनस्विनी फाउंडेशचा उपक्रम**

सदर उपक्रम मनस्विनी फाऊंडेशन व वनपरिक्षेत्र कार्यालय वडाळी कडून घेण्यात आला. दरवर्षी वडसावित्री पूजनाच्या दिवशी या उपक्रमाची सुरुवात करत असते व पुढील तीन महिने झाडे लावणे व वर्षभर त्यांची काळजी घेणे असा पूर्ण वर्षभर हा उपक्रम राबविला जातो. स्थानिक ऑक्सिजन पार्क येथे वड, पिंपळ, आवळा, चिंच जांभूळ या सर्व भारतीय मूळ जातीच्या वृक्षांचे वाटप करण्यात आले फाउंडेशन च्या सचिव रजनी आमले यांनी,' झाड लावणं जेवढं महत्त्वाचं आहे तेवढेच त्याची संगोपन करणे देखील गरजेचे आहे ' असे विचार व्यक्त करून पुढील वर्षभराचा लेखाजोखा यावेळेस मांडला. तसेच त्यांच्या बीजपेढी प्रकल्पातील बिजांचे सृष्टी सखा ग्रुपला वितरण करण्यात आले .

यावेळी मनस्विनी फाउंडेशनच्या सर्व सदस्या उपस्थित होत्या. डॉ.दादाराव चव्हाण उपकुलसचिव संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ,रश्मी नावंदर, संगीता शिंदे , लीना वासनिक , गंगा खारकर, संतोष कावरे , पुंडलिक गोसावी यांनी पर्यावरण संवर्धनासंबंधी बहुमूल्य मार्गदर्शन केले. याप्रसंगी पूनम गोमासे, भारती मोहोकार ' डॉ जयश्री नांदूरकर माधुरी धर्माळे, कीर्ती देशमुख, राधा कुरील, राजश्री जढाळे, ज्योती सैरीसे, बरखा बोज्जे, प्रिया इंगोले, मधू लोणारे आरती वानखडे, भाग्यश्री देशमुख, मेघा हिंगासपूरे , सविता ठाकरे, जया माहुरे तृत्ती वाठ, मेघा रिठे, विशाखा मेश्राम, वंदना जामनेकर ,माया अंबाडकर, अनघा होलेभारती बेलसरे यांची उपस्थिती होती.

## गुणवत्ताधारक पाल्यांसाठी पुरस्कार योजना

**अमरावती**- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेने आपल्या सदस्यांच्या गुणवत्ताधारक पाल्यांसाठी प्रोत्साहनपर पुरस्कार योजना जाहीर केली आहे. पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या निर्णयानुसार, २०२४-२५ मध्ये झालेल्या परीक्षांमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक व संस्थेच्या गौरवचिन्हासह पुरस्कृत करण्यात येणार आहे

.या पुरस्कारांसाठी, स.गा.बा.अ.विद्यापीठातील अभ्यासक्रमांमध्ये गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त करणाऱ्या आणि आंतर-विद्यापीठीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीयस्तरीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या पाल्यांनी निर्धारित नमुन्यातील आवश्यक कागदपत्रांसह १४ जून २०२५ पर्यंत पतसंस्थेच्या कार्यालयात अर्ज जमा करण्याचे आवाहन केले आहे. विहित दिनांकाप्रमाणे प्राप्त न झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.असे आवाहन विद्यापीठ पतसंस्थेचे अध्यक्ष.मंगेश वरखेडे आणि सचिव.श्रीकांत तायडे यांनी केले आहे.

## बियाणांसाठी वणवण, अन्नदात्यांची पेरणी पूर्वीची लाचारी

**खल्लार / वार्ताहर**

सध्या खरीप हंगाम सुरू होण्याच्या तयारीत शेतकरी बांधव आपापल्या शेतजमिनीची मशागत करीत आहेत. पावसाच्या आगमनासोबतच त्यांच्या मनात नव्या आशेचा अंकुर उगवत आहे. मात्र हे स्वप्न उभं करण्यासाठी आवश्यक असलेले पहिले पाऊल म्हणजे योग्य, दर्जेदार आणि वेळेवर मिळणारं बी-बियाण दुर्दैवाची बाब म्हणजे आज शेतकऱ्यांना तेच बियाण मिळवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे.



बाजारात बियाण्यांची टंचाई जाणवते आहे. अधिकृत कृषी सेवा केंद्रांवर बियाण्याचा पुरवठा अपुरा आहे. जी काही बियाण आहेत, ती देखील फारच मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहेत. परिणामी, शेतकऱ्यांना खासगी विक्रेत्यांकडे धाव घ्यावी लागते आणि इथेच सुरू होतो काळाबाजार ८५० रुपयांना मिळणार कपाशीच बियाण १२०० ते १५०० रुपयांपर्यंत चढया भावान विकल जातेय विशेष म्हणजे हे बियाण देताना ना कोणती पावती दिली जाते , नाही दर्जाची हमी.

शेतकरी कर्ज काढून, कुटुंबाच्या गरजा बाजूला ठेवून बी-बियाण खरेदी करतो. पण जेव्हा त्यालाच वेळेवर आणि योग्य दरात बियाण मिळत नाही तेव्हा त्याची अवस्था 'अन्नदाता की संघर्षदाता' अशी होते. शेतकऱ्याने जर वेळेत पेरणी केली नाही, तर उत्पादनावर परिणाम होतो, आणि त्यामुळे त्याचे वर्षभराचे संपूर्ण आर्थिक गणितच कोलमडते.

या सगळ्या प्रकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी कृषी विभाग, महसूल प्रशासन, पोलीस यंत्रणा, बिज कंपन्या, सहकारी संस्था, बाजार समित्या आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

पण वस्तुस्थिती अशी आहे की, अनेक ठिकाणी प्रशासनाची उदासिनता आणि यंत्रणेतील ढिसाळपणा हेच या परिस्थितीमागिल मुख्य कारण आहे. तपासणी मोहीमा केवळ कागदोपत्री राहतात आणि शेतकरी प्रत्यक्षात पिळला जातो.ही वास्तूस्थिती आहे.

या परिस्थितीतून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी काही तातडीचे उपाय गरजेचे आहेत. प्रत्येक तालुक्यात बियाण्यांचा ऑनलाईन साठा व वितरण माहिती उपलब्ध व्हावी, प्रत्येक कृषी सेवा केंद्रावर पावतीसह विक्री सक्तीची असावी, नकली बियाण्यांची तपासणी आणि दोषींवर कारवाई नियमित व्हावी, तसेच बियाण्यांच्या दरावर शासनाचा कठोर अंकुश असावा.

शेतकऱ्याच्या या व्यथा शासनाने व लोकप्रतिनिधीनी ऐकल्या पाहिजेत आणि त्यावर कृती केली पाहिजे.

पेरणीपूर्वी जर शेतकऱ्यालाच संघर्ष करावा लागत असेल, तर पिकाचं भविष्यच धोक्यात आहे.

देश कृषीप्रधान आहे हे सांगण्यात आपल्याला अभिमान वाटतो. पण ज्यांच्या श्रमावर ही कृषी उभी आहे. त्या शेतकऱ्यालाच जर बी घेण्यासाठी वणवण फिरावं लागत असेल, तर ही व्यवस्था शरमेने मान खाली घालणारी आहे. अन्नदात्याचा सन्मान म्हणजे फक्त सन्मान पत्र किंवा भाषण नाही, तर त्याला वेळेवर, योग्य दरात व दर्जेदार साधनसामग्री मिळावी याची हमी देणं हाच त्यांचा खरा सन्मान आहे.

**अभिषेक गावंडे**
शेतकरी पुत्र

याचे परिणाम केवळ त्या शेतकऱ्यापुरते मर्यादित राहणार नाहीत, तर अखेर अन्नसाखळीवरच त्याचा परिणाम होणार आहे.

## अप्लास्टिक ॲनिमिया दुर्मिळ पण जीवघेणा आजार

**अमरावती/का.प्र.**

अप्लास्टिक ॲनिमिया हा एक दुर्मिळ पण जीवघेणा आजार आहे, जो केवळ लाल रक्तपेशीच नव्हे तर शरीरातील तिन्ही प्रकारच्या रक्तपेशी - लाल रक्तपेशी (ॅण), पांढऱ्या रक्तपेशी (ॅण) आणि प्लेटलेट्सचे उत्पादन पूर्णपणे थांबवतो. हे सामान्य ॲनिमियापेक्षा पूर्णपणे वेगळे आणि धोकादायक आहे, असे हेमॅटोलॉजिस्ट आणि बोन मॅरो ट्रान्सप्लांट सल्लागार डॉ. राहुल अरोरा म्हणाले.डॉ. अरोरा यांच्या मते, सामान्य ॲनिमिया हा सहसा लोह, व्हिटॅमिन बी१२ किंवा फॉलिक ॲसिडच्या कमतरतेमुळे होतो, ज्यावर सप्लिमेंट्सने उपचार करता येतात. परंतु अप्लास्टिक ॲनिमियामध्ये, बोन मॅरो पूर्णपणे निष्क्रिय होतो. ज्यामुळे शरीराच्या प्रतिकारशक्ती वरही वाईट परिणाम होतो. यामुळे सतत थकवा, चक्कर येणे, वारंवार संसर्ग आणि अचानक रक्तस्राव होणे अशी लक्षणे दिसून येतात. डॉ. अरोरा म्हणाले की, सुरुवातीला या आजाराची लक्षणे सामान्य वाटतात, परंतु हा आजार खूप लवकर गंभीर रूप धारण करू शकतो. याचे रुग्ण विशेषतः किशोरवयीन मुले, तरुण आणि ५५-६० वर्षे वयोगटातील लोकां मध्ये जास्त आढळतात.

ऑटोइम्यून रोग, विशेष प्रकारचे विषाणू (जसे की एपस्टाईन-बार, परबोव्हायरस बी१९) किंवा गर्भधारणेशी संबंधित शारीरिक परिस्थिती देखील याला कारणीभूत ठरू शकतात. उपचारांबद्दल, डॉ. अरोरा स्पष्ट करतात की, ५० वर्षांपेक्षा कमी वयाच्या रुग्णांसाठी, जर सुसंगत अस्थिमज्जा दाता उपलब्ध असेल, तर अस्थिमज्जा प्रत्यारोपण हा सर्वात प्रभावी पर्याय आहे. जर दाता उपलब्ध नसेल किंवा वय जास्त असेल, तर इम्युनोस प्रेसिव्ह थेरपी दिली जाते, ज्यामध्ये घोडा एटीजी (अँटी-थायमोसाइट ग्लोब्युलिन), साय क्लोस्पोरिन आणि अल्ट्राम्बोपॅग सारखी औषधे समाविष्ट आहेत. डॉ. अरोरा म्हणाले की, घोडा एटीजी हे घोड्यांपासून मिळवलेले एक विशेष औषध आहे जे शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीला नियंत्रित करते.

### विद्युत शॉक लागून दगावलेल्या महिलेस
## वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिला धनादेश

**लेहेगाव/ वार्ताहर**

वीज वितरण कंपनी अंतर्गत येणाऱ्या राजुरवाडी येथे २ जून २०२५ रोजी राजूरवाडी येथिल प्रिया जानरावजी पारिषे या महिलेचा पाण्याची मोटर जोडण्याच्या प्रयत्नात अचानक विद्युत शॉक लागल्यामुळे दुर्दैवी मृत्यू झाला होता. या दुर्घटनेमुळे त्या महिलेच्या कुटुंबावर दुःखाचे तसेच आर्थिक संकट निर्माण झाले होते. यांची दाखल घेऊन राजरवाडी शाखा यांनी सामाजिक उदरदायित्व म्हणून त्या महिलेच्या कुटुंबाला वर्गणी करून ६५ हजार ५०० रुपयांचा धनादेश दिला.



प्रिया पारिषे यांचेवर कुटुंबाची जबाबदारी होती. तिचे आई वडील म्हातारे असून त्यांचे वय जास्त असल्यामुळे संपूर्ण कुटुंब अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगात होते. अशा संकटमय प्रसंगी राजुरवाडी वीज केंद्र आणि मोर्शी उपविभाग अंतर्गत कार्यालय महावितरण कार्यालयीन सामाजिक उदयत्त्वाच्या जाणिवेतून मृतकाच्या कुटुंबास आर्थिक व तांत्रिक स्वरूपात मदत करण्याचा निर्णय घेतला. याशिवाय घरातील वायरिंग अत्यंत खराब झाल्यामुळे महावितरण तर्फे सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने घरातील सर्व वायरिंग साठी आवश्यक साहित्य यात स्विच बोर्ड एमसीबी वायर इत्यादी साहित्य विनामूल्य देण्यात आले .जेणेकरून भविष्यात अपघाताची पुनरावृत्ती होणार नाही. याप्रसंगी कार्यकारी अभियंता विजय कासार यांनी उपस्थितांना विद्युत सुरक्षा घरगुती वायरिंग करताना घ्यावयाची खबरदारी व भविष्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले.

आणि घरगुती विद्युत प्रकरणाचा योग्य वापर नेहमी तपासणी याबाबत प्रशिक्षित कर्मचाऱ्याकडून काम करून घेण्याचे महत्व पटवून सांगितले. शॉट लागून दगावलेल्या महिलेला ही मदत केवळ आर्थिक स्वरूपाची नसून सामाजिक बांधिलकी सुरक्षा जागरूकता आणि मानवतेचा एक सकारात्मक नमुना आहे.

याप्रसंगी उपस्थितांमध्ये लेहेगाव वीज वितरण केंद्राचे सहाय्यक अभियंता तथा प्रभारी उपकार्यकारी अभियंता कल्पेश देवांग वितरण केंद्राचे सहाय्यक अभियंता कोकणे साहेब राजरवाडी वीज वितरण केंद्राची कनिष्ठ अभियंता मोना गणवीर केंद्रातील सर्व कर्मचारी यंत्र तांत्रिक कर्मचारी उपस्थित होते.

### डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालयात
## 'एमबीबीएस आणि एमबीबीएसच्या पलीकडे' या विषयावर व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**

आरोग्य भीषज प्रकल्प अंतर्गत केवायएस कर्मयोगी संस्था, सोलापूर येथील डॉ. रोहित तापडिया यांचे अमरावती येथील डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील विद्यार्थ्यांसाठी 'एमबीबीएस आणि एमबीबीएसच्या पलीकडे' या विषयावरन्यू लेक्चर हॉल येथे महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते.



डॉ. रोहित तापडीया यांनी विद्यार्थ्यांना आवश्यक, मौल्यवान आणि अत्यंत प्रेरणादायी माहिती आपल्या व्याख्यानामधून दिली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पुजन, हारार्पण व दिपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रथम वर्षाचा विद्यार्थी सार्थक गंडल यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्नील मोहोड यांनी मानले.

# संक्षिप्त

## नंदलालजी खत्री यांचे अभिष्टचिंतन

**अमरावती**-अनेक अंध अपंगांच्या कार्यात डॉ. गोविंद कासट मित्र मंडळीला सहकार्य करणारे ८२ वर्षीय नंदलालजी खत्री व्यावसाय सामाजिक कार्य धार्मिक आध्यात्मिक कार्य सुधांशुजी महाराजांना श्रद्धास्थाने मानणारे आहेत. राज्यकारणात ते आहेत.



अशा या व्यक्तीचा खत्री परिवार व मित्रपरिवार यांनी हर्ष मंगलम येथे वाढदिवस साजरा केला.याप्रसंगी ॲड. आर.बी अटल, साई राजेशलाल, डॉ. संतोष देवीजी महाराज, माई रामप्रियाजी, जगदीश गुप्ता, मंचावर होते.यावेळी उमेश वैद्य डॉ. पुन्शी डॉ. दारा, जुगल किशोर गट्टाणी जोशीजी क्षितिज संतोष सबलानी एड. नवलानी राजेंद्र महल्ले इत्यादी मंडळी हजर होती.

## राज्यस्तरीय वार्षिक नियोजन बैठक

**खल्लार**-नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत व्यसनमुक्ती वर कार्य करणारी संस्था आहे.या संस्थेने ६७ वर्ष पूर्ण करून महाराष्ट्रातील ३६ जिल्हा संघटकाचे संवाद, समन्वय आणि वार्षिक नियोजन बैठकीचे आयोजन शुक्रवार १३ ते १५ जून पर्यंत सेवांकुर भवन दस्तुरनगर रोड, अमरावती येथे आयोजित करण्यात आले आहे. यावेळी संघटक बैठकीचे उद्घाटन प्रयास संस्थाचे अध्यक्ष डॉ. अविनाश सावजी, नशाबंदी मंडळाचे सरचिटणीस वर्षा विद्या विलास, मुख्य संघटक चिटणीस अमोल मडामे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी ३६ जिल्ह्यातील संघटक, ७ विभाग प्रमुख, नशाबंदी मंडळाचे कार्यालय कर्मचारी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती नशाबंदी मंडळाचे अमरावती जिल्हा संघटक ज्ञानेश्वर जामनिक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचा मेळावा

**अमरावती**-राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने २६ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून पुणे येथील बालेवाडी परिसर स्थित श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उप - मुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष - खा.प्रफुल पटेल, प्रांताध्यक्ष - खा.सुनिल तटकरे, ज्येष्ठ नेते छगनराव भुजबळ आदी मान्यवर नेत्यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या कार्यकर्ते व पदाधिकारी यांना मार्गदर्शन करून आगामी काळात राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाची ध्येय - धोरणे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवून पक्षाला मजबुती प्रदान करण्यासाठी बहुमूल्य असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे विभागीय समन्वयक - आ.संजय खोडके,.आ.सुलभा.खोडके, यश खोडके आपल्या स्थानीय कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यासह प्रामुख्याने उपस्थित होते.



## वसतीगृहात प्रवेशाबाबत सूचना जारी

**अमरावती**-उच्च शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणारे वलगाव रोड स्थित मातोश्री शासकीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात एकूण ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत सूचना जारी करण्यात आली आहे. त्यानुसार इच्छुक व गरजू विद्यार्थ्यांनी वसतीगृहात प्रवेशासाठी संपर्क साधावा, असे आवाहन गृहप्रमुख अनिल तसरे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे. प्रवेशाबाबत सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे.प्रवेश अर्ज घेण्याकरीता विद्यालय, महाविद्यालयात प्रवेश झालयाचा पुरावा सोबत आणावा, या संधीचा गरजू विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मातोश्री शासकीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांचे वसतिगृहाचे गृहप्रमुख अनिल तसरे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्रमांक ९५५२५५१५८४ वर संपर्क साधावा.

## तिसरे एल्गार मराठी गजल संमेलन

**अमरावती**-तिसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गजल संमेलन ७ आणि ८ फेब्रुवारी, २०२६ मध्ये अमरावतीत आयोजिण्यात आले असून संमेलनाची पूर्वतयारी बैठक संमेलनाचे यजमानपद भूषविणारे गज़लरसिक नाना लोडम यांच्या जयराम नगरातील निवासस्थानी पार पडली. संमेलनाच्या निवडक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या पहिल्याच बैठकीत नाना लोडम यांनी संमेलनाची प्राथमिक रूपरेषा मांडली. यावेळी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे होऊ घातलेल्या संमेलनाचे अध्यक्ष, उद्घाटक, प्रमुख पाहुणे, वक्ते, गज़ल मुशायरे, गज़ल मैफिल, परिसंवाद, संमेलनाची स्मरणिका, निवास आणि भोजन व्यवस्था आदी नियोजनावर सविस्तर चर्चा झाली. बैठकीला नाना लोडम यांच्यासह नीलिमा लोडम, गज़लकार अनंत नांदूरकर 'खलिश', नितीन देशमुख, नितीन भट, संदीप देशमुख उपस्थित होते.



## डॉ.जयप्रकाश बनकर यांचे अभिनंदन

**अमरावती**-शेगाव नाका परिसरातील रहिवासी प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. जयप्रकाश बनकर यांची अमरावती जिल्हा अस्तरोग तज्ञ डॉक्टर संघटनेचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. गोविंद कासट मित्र मंडळींनी त्यांचा सत्कार केला. यावेळी मित्रमंडळातील डॉ. गोविंद कासट, डॉ. राजू डांगे व दिलीप सदार हजर होते. यावेळी डॉ. संजय पूर्वे समीर कांबळे डॉ. सचिन देशमुख राजेश राऊत गजानन करुमकर पावन झारखंडे माधुरी इंगळे जया साबळे माधुरी पकडे पल्लवी लहान इत्यादी मंडळी हजर होती. संचलन आभार डॉ. राजू डांगे यांनी मानले.



## राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे गुणगौरव

**अमरावती**- येथील सामाजिक कार्यकर्ते संजय खंडारे यांचा पुतण्या चैतन्य नरेंद्र खंडारे याला इयत्ता दहावी मध्ये ८४.४० टक्के गुण मिळाल्याबद्दल तसेच पायल उमेश खंडारे हिला ६१ टक्के गुण मिळाल्याबद्दल, सर्वोदय कॉलनी येथील चंचल सचिन वानरे हिला ७७.४० टक्के गुण मिळाल्याबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे निवासस्थानी जाऊन सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, देऊन दोघांचा सत्कार करण्यात आला.यावेळी प्रकाश शेलापुरकर, निलेश जामठे, राज चव्हाण, बाळकृष्ण गव्हाळे, मारोती पाचखंडे हे होते.

# सरकारला सळो की पळो करुन सोडू- मनोज जरांगे

**● रविकांत तुपकर,महादेव जानकार,गिरीश गांधी यांनी घेतली बच्चू कडूंची भेट ● बच्चु कडूंचे अन्नत्याग**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांचे नेते बच्चू कडू हे गोरगरीबांसाठी अनेक वर्षांपासून संघर्ष करत आहेत. तुम्ही तब्येतीची काळजी घ्या. तुम्ही एकटे नाहीत, आम्ही तुमच्यासोबत आहोत. बच्चू कडू यांची मागणी सरकारने मान्य नाही केली तर आम्ही रस्त्यावर उतरू, सरकारला सळो की पळो करुन सोडू. बच्चू कडू यांच्या मागण्यांची मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दखल घ्यावी. राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी जात-पात न पाहता रस्त्यावर उतरायला हवं. असं आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केलं आहे. मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारी (दि.११) बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला तसेच आम्ही रस्त्यावर उतरू,फक्त डेडलाईन द्या या शब्दात बच्चू कडूच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवून शेतकऱ्यांनी पूर्ण ताकदीनिशी या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले.

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी माजी राज्यमंत्री तथा शेतकरी नेते बच्चू कडू यांनी अमरावतीतील गुरुकुंज मोझरीत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.आंदोलनाच्या चौथ्या दिवशी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यासह रविकांत तुपकर,महादेव जानकर,गिरीश गांधी यांनी भेट दिली.



महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी जात घरी ठेवून फक्त एक शेतकरी म्हणून शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी बच्चू कडू यांनी उभारलेल्या या आंदोलनात रस्त्यावर उतरले पाहिजे. विदर्भ आणि मराठवाड्यात शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या होत आहे. बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांसाठी जीवाची बाजी लावली आहे. त्यांनी 'अंत्ययात्रा' हा शब्द वापरला आहे. त्यामुळे मी लगेच त्यांना भेटायला आलो. हे फार गंभीर आहे. बच्चू कडू यांनी तब्येतीची काळजी घ्यावी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी आंदोलनाची तात्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य कराव्या अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरल्या शिवाय राहणार नाही,असा इशारा मनोज जरांगे यांनी सरकारला दिला.

आता सर्व शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी तातडीने बैठक बोलावून☞(पान २ वर)

### प्रकृती खालावली-

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांसह दिव्यांग आणि विधवा महिलांच्या प्रश्नांसंदर्भात अन्नत्याग आंदोलनाचे शस्त्र उगारले आहे. दरम्यान त्यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या चौथा दिवशी बच्चू कडूंची प्रकृती खालावली आहे. अशातच आरोग्य विभागाच्या पथकाकडून बच्चू त्यांची तपासणी करण्यात आली. माजी आमदार कडू यांचे वजन ४ किलोने कमी झाले आहे. तर रक्तदाब वाढलेला आहे. तिवसा येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या आरोग्य पथकाकडून बच्चू कडू यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.बच्चू कडू यांनी आपल्या मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार केला आहे.

दरम्यान बच्चू कडूंच्या आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा मिळत आहे. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बच्चू कडू यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. राष्ट्रवादीचे नेते नितेश कराळे मास्तरांनी बच्चू कडू आणि शरद पवारांचे फोन वर बोलणे करून दिले. यावेळी शरद पवारांनी बच्चू कडूंना प्रकृती जपण्याचा सल्ला दिला. राज्यातील इतर नेते देखील बच्चू कडूंच्या आंदोलन स्थळी भेट देत आहेत.

# स्तनदा माता मृत्यू प्रकरणी अचलपूर रुग्णालयात संताप

## मृतदेह स्विकारण्यास कुटुंबीयांचा नकार

**दोषींवर कारवाईची मागणी**


**अचलपूर/प्रतिनिधीः-** चिखलदरा तालुक्यातील सलोना आरोग्य केंद्र अंतर्गत येत असलेल्या नागापूर गावातील रवीना केशव जानकर (वय २७) या स्तनदा मातेचा मंगळवारी उपचारादरम्यान अचलपूर येथील महिला व बाल रुग्णालयात मृत्यू झाला. यामुळे संतापलेल्या कुटुंबीयांनी आज बुधवारी ११ जून रोजी रुग्णालयात हंगामा केला.दोषींवर आधी कार्यवाही करा नाही, तर आम्ही मृतदेह स्वीकारणार नाही असे कुटुंबीय म्हणाले. यामुळे तिथे गोंधळ निर्माण झाला होता. माजी आमदार राजकुमार पटेल हे सुद्धा याच मागणीवर ठाम होते. धारणीचे ठाणेदार अशोक जाधव यांनी पण मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. पण कुटुंबीय आपल्या मागण्यावर कायम होते.



माहितीनुसार नागापूर येथील रवीना जामकर या मातेची १२ दिवसांपूर्वी प्रसूती झाली होती. तिने एका मुलीला जन्म दिला होता. प्रसूतीनंतर तिची प्रकृती ढासळत होती.☞(पान २ वर)

# नांदगाव शहरात घरफोडी, १ लाख ९२ हजाराचा माल लंपास

**नांदगाव खंडेश्वर/ प्रतिनिधीः-** शहरातील छोरीया नगर येथील सागर सव्वालाखे यांच्या घरी मंगळवारी सकाळी तीन वाजताच्या दरम्यान चोरट्यांनी घरफोडी करून सुमारे १ लाख ९२ हजाराचा ऐवज लंपास केला. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचा कोंडा तोडून आत प्रवेश केला. कुलरच्या आवाजामुळे कुठलाही आवाज घरातील मंडळींना आला नाही. जवळच्या खोलीत शिरून लोखंडी कपाटचे लॉकर तोडले. त्यामधून १ लाख ५४ हजाराची रोख रक्कम,चांदीच्या तोरडीचे घुंगरू, सोन्याची अंगठी असा एकूण अंदाजे १ लाख ९२ हजाराचा माल लंपास केला. त्यानंतर चोरट्यांनी आपला मोर्चा शहरातील गजानन नगर परिसरात वळविला व गौरव वितोडे यांच्या घराच्या गेटचे कुलूप तोडून चोरटे वरांडण्यामध्ये घुसले. आरडा ओरड झाल्याने चोरटे पळून गेले. त्यानंतर त्यांनी सतीश पटेल☞(पान २ वर)



## २ हजार ५८८ कोटी ५५ लाखांच्या निधीतून विकासकामे

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध २१ कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

**अकोला जिल्ह्यात विकासाचा प्रवाह गतिमान**

**अकोला /प्रतिनिधीः-** अकोला जिल्ह्यात सुमारे अडीच हजार कोटींहून अधिक म्हणजेच २ हजार ५८८ कोटी ५५ लाख रूपयांच्या निधीच्या विविध २१ विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झाले. सिंचन, रस्ते, रूग्णालय सुधारणा, सांस्कृतिक भवन, तरण तलावासह विविध प्रशासकीय इमारती अशा विकास कामांमुळे जिल्ह्यातील विकासाचा प्रवाह गतिमान होणार आहे.





विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार रवींद्र चव्हाण, आमदार हरिष पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार किरण सरनाईक, आमदार श्याम खोडे, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, पोलीस महानिरीक्षक रामराव पोकळे, जिल्हाधिकारी अजित कुंभार, पोलिस अधिक्षक अर्जित चांडक आदि मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सर्वप्रथम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नवीन, अद्ययावत व सुसज्ज इमारतीचे लोकार्पण झाले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील स्वागत कक्ष, हिरकणी कक्ष, आनंदी कक्ष, आवश्यक दस्तऐवज मिळण्यासाठी किऑस्क सुविधा आदींचे निरीक्षण ☞(पान २ वर)

# चोरीच्या दोन दुचाकीसह चोरटे ताब्यात

## -गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/ प्रतिनिधीः-** चोरीच्या दोन दुचाकीसह चोरट्यांना गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यांचे कडून १ लाख २० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. शेख शहजाद शेख आरिफ (वय २०, रा.फातिमा मस्जिद अन्सार नगर) व अब्दुल अल्ताफ अब्दुल निसार (वय १९, रा.रहमत नगर ) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे.



माहितीनुसार समीर जबीर शेख (वय २०,रा.अकोली हनुमान मंदिर) यांची दुचाकी एम एच २९ एएस ८११९ त्यांच्या घरा शेजारून चोरी गेली होती. या प्रकरणात त्यांनी तक्रार दाखल केली होती. या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने तपास करून आरोपी शेख शहजाद व अब्दुल अल्ताफ यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एक दुचाकी केटीएम व स्प्लेंडर प्लस एमएच २७ डीपी ९४२० असा एकूण एक लाख वीस☞(पान २ वर)

# दर्यापूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस


**-दोन बैलांचा मृत्यू, घरासह गोठ्यांची पडझड**

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहर व तालुक्यात आज बुधवारी (दि.११) दुपारी अडीच वाजताच्या सुमारास वादळी व सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. मृग नक्षत्राच्या पहिल्या पावसाने हजेरी लावली. हवेने रोद्ररुप धारण करीत तालुक्यातील नांद्रुण, रामागड, ऊमरी ममदाबाद व ऊमरी ईतबारपुर या गावांमध्ये घरांची पडझड झाली, टिनपत्रे उडाली. विद्युत तारा पडून खांबही वाकले असून दोन बैलांचा मृत्यू होऊन नुकसान झाले आहे. तसेच वादळी पावसामुळे नांद्रूण व आसपासच्या शेतशिवारात पाणीच-पाणी तुंबल्याने पेरणीपूर्वीच शेतकऱ्यांसमोर संकटं उभे ठाकले आहे.



छाया :-युवराज डोंगरे, खल्लार





या वादळी पावसाने नांद्रूण येथील प्रशांत खेडकर यांच्या राहत्या घराची अंशतः पडझड तसेच दिपक सावळे यांच्या घरावरील टिनपत्रे उडून घरातील सामानाचे ☞(पान २ वर)

# विद्यार्थिनीच्या आत्महत्या प्रकरणी दुसरा आरोपी गजाआड

**गाडगे नगर येथील घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत राहणा-या इंजीनियरिंगच्या दुसऱ्या वर्षातील विद्यार्थीनी आकांक्षा बोबडे मृत्यू प्रकरणात पोस्टमार्टम रिपोर्ट आणि तिच्या मोठ्या बहिणीच्या तक्रारीवरून हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी तिचा मित्र प्रतीक हिवसे याला अटक करण्यात आली आहे. पोलीस रिमांडमध्ये प्रतीक काही बोलायला तयार नाही. घटनेची वस्तुस्थिती जाणण्यासाठी या प्रकरणात पोलिसांनी दुसरा आरोपी प्रथमेश अढाऊ (वय २०) याला अटक केली आहे. प्रतीकचा रिमांड संपल्यावर त्याला एमसीआर मध्ये कारागृहात पाठवले आहे. प्रथमेश अढाऊ (वय २०) याला आज बुधवारी ११ जून रोजी न्यायालयात हजर करण्यात आले. जिथे त्याला पीसीआर मिळाला आहे. पोलीस त्याच्या सोबत विचारपूस करत आहे.



माहितीनुसार ४ जून रोजी गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या आकांशा बोबडचा फासावर लटकलेला मृतदेह पोलिसांच्या हाती लागला होता. आकांक्षाचे मित्र प्रतीक हिवसे आणि प्रथमेश अढाऊ यांनी तिच्या रूमवर पोहचून तिचा मृतदेह फासावरून खाली उतरवला होता. त्यांनी या घटनेची माहिती डायरेक्ट ११२ वर पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळावर पोहोचवून आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात आकांक्षाच्या बहिणीची तक्रार आणि पोस्टमार्टम रिपोर्टच्या आधारावर पोलिसांनी आरोपी प्रतीक हिवसे (रा.लक्ष्मी नगर) याला अटक केली होती. पोलीस रिमांड मध्ये प्रतीकने तोंड उघडले नाही. दुसरीकडे आकांक्षांच्या कुटुंबीयांच्या मागणीवरून पोलिसांनी या ☞(पान २ वर)

# राष्ट्रीय किसान मोर्चाचा आमदारांना घेराव

## - शेतकरी प्रश्नांवर विधानसभेत मौन का?

**अचलपूर/प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांच्या हक्क व न्यायासाठी लढा देणाऱ्या राष्ट्रीय किसान मोर्चाच्या वतीने आज अचलपूर आणि मेळघाट विधानसभा क्षेत्रातील आमदारांना घेराव आंदोलन करण्यात आले. परंतु अचलपूरचे आमदार भेटू शकले नाहीत.



राष्ट्रीय किसान मोर्चाने संपूर्ण महाराष्ट्रातील २८८ आमदारांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत जाब विचारण्यासाठी घेराव आंदोलनाची हाक दिली आहे. आंदोलनाचा आज तिसरा टप्पा होता. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत असण्यामागील मुख्य कारण म्हणजे पिकलेल्या मालाला न मिळणारा हमीभाव, अपुरा वीज पुरवठा आणि कर्जमाफीसंदर्भातील अनिश्चितता. या सर्व मुद्द्यांवर सरकारकडून ठोस पावले उचलली जात नसल्याचा आरोप मोर्चाने केला.

अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे हे या आंदोलनाच्यादिवशी मोर्चेकरांना उपलब्ध झाले नाही. त्यामुळे मोर्चाचे कार्यकर्ते कोल्हा गावात जाऊन त्यांच्या नातेवाईकांना निवेदन देण्यात आले. यावरून मोर्चाने संतप्त प्रतिक्रिया देत म्हटले की, 'शेतकऱ्यांच्या समस्या ऐकायला आमदारांना वेळ नाही, पण मत मागायला ☞(पान २ वर)

# पीडीएमसी समोर तरुणावर चाकु हल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूर वरून ट्रान्सपोर्टचे काम संपवून शहरात आलेल्या तरूण-तरुणी सोबत वाद करून युवकाच्या डोक्यावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना पीडीएफसी रुग्णालयासमोर मंगळवारच्या रात्री समोर आली. चेतन अरुण हरमकर (वय ३७, भाजीबाजार) असे या हल्ल्यात जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे. तर प्रवीण कन्हैयालाल यादव (वय ४६, यादव प्लॉट, चित्रकला महाविद्यालयच्या समोर मोर्शी रोड) असे आरोपीचे नाव आहे.

माहितीनुसार जखमी चेतन हरमकर एका तरुणीसोबत गेल्या दहा वर्षापासून ट्रान्सपोर्टचे काम करत आहे. मंगळवारच्या रात्री पण ते दोघे नागपूर वरून काम करून अमरावतीमध्ये दाखल झाले होते. पीडीएमसी रुग्णालयासमोर चेतन ने पाण्याची बॉटल घेण्यासाठी कार थांबवली. त्याचवेळी मागून दुचाकी वर आरोपी प्रवीण यादव आला. त्याने चेतनला विचारले की इथे काय करत आहे. इथून निघून जा असे☞(पान २ वर)





